
# माणूस

शनिवार १ मे १९८२

दीड रुपया.



पृष्ठ . . . २

## विद्यापीठ परिसराशी आमचेही नाते आहे.

नवरात्रातला सर्वांत महत्त्वाचा दिवस उजाडला. सप्तमी मागे सरली. अष्टमी उगवली....रात्रीचे साडेअकरा वाजले होते. सातोस्करच्या अंगातून घाम निथळत होता. अंगावर काटा फुटला होता. डोळे भीतीने लाल झाले होते. तो प्रचंड घाबरला आणि रस्त्यावरून सैरावैरा पळत सुटला व श्यामकांतच्या घरी आला. ‘ साहेब, त्या अर्जुन गोळेचा खून झाला ! ’ ही बातमी त्याने श्यामकांतला दिली व तो दारातच कोसळला....

## स ब ला

पृष्ठ . . . २८



## माणसे खुनाला का प्रवृत्त होतात ?

पृष्ठ १०

पुणे वार्ता

# तर परिसराची शान जाईल....

काही मोजक्या वस्तू अशा असतात की, ज्या आपल्या मनात चिरकाल टिकणारे नाजुक भावनिक बंध निर्माण करतात. पुणे विद्यापीठाची सध्याची भव्य, प्रासादिक प्रशासकीय इमारत आणि भोवतीचा विलोभनीय नैसर्गिक परिसर याच्यात निर्माण झालेल्या एकात्म स्थलशिल्पाने पुण्यातील आणि पुण्याबाहेरील कित्येकांच्या मनात असे नाजुक बंध निर्माण केले आहेत.

विद्यापीठ परिसराबाबत सर्वसामान्य पुणेकरांच्या मनात असलेली आत्मीयता आणि जिव्हाळा येवढ्या उघडपणे आत्ताच व्यक्त करायचं काय कारण ? जुन्या मुख्य इमारतीच्या समोरच होऊ घातलेली छपन्नलाखाची नवी प्रशासकीय इमारत हे त्याचं कारण आहे. नव्या इमारतीचं बांधकाम सुरू होणार अशी गेल्या महिन्यात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कुणकुण लागली. संकल्पित इमारतीची जागा निश्चित झाली. मग मात्र विद्यापीठ परिसरप्रेमी चांगलेच बेचैन झाले ! ही संकल्पित इमारत ठरलेल्या जागी उभी राहिली तर विद्यापीठ परिसराची शानच नाहीशी होईल आणि हे होऊ द्यायचं नसेल तर आपल्यालाच हात-पाय हलवायला पाहिजेत, या भावनेतून या बेचैन मंडळींनी विद्यापीठ परिसर संरक्षण समिती स्थापन केली ? पूना ट्री लव्हर्स असोसिएशन, 'लोकविज्ञान चळवळ', 'विज्ञानवर्धिनी', इंटरनॅशनल यूथ फेडरेशन फॉर एनव्हरॉनमेंट,' 'एम्प्रेस गार्डन,' 'मराठी विज्ञान परिषद यासारख्या संस्थांचा समितीत सहभाग आहे. नवी प्रशासकीय इमारत संकल्पित जागी होऊ नये यासाठी समितीच्या सभासदांनी ३० मार्चला माननीय कुलगुरूंची प्रथम भेट घेतली.

आता प्रश्न असा उभा रहातो की, ज्या जागेबद्दल येवढ्या युद्धपातळीवर घडामोडी होत आहेत ती जागा नेमकी आहे तरी कुठे ?— खालच्या कॅंटिनकडून हळूहळू चढत आणि वळत वर येणाऱ्या रस्त्याने आपण मुख्य इमारतीकडे येतो, कॅंटिनशेजारचा बसस्टॉप आणि मुख्य बसस्टॉप यांच्यात एक सुरेख 'शॉर्टकट' आहे. या नागमोडी रस्त्याला छेदून आणि या शॉर्टकटला घशात टाकून नवी प्रशासकीय इमारत उभी रहाणार आहे !

विद्यापीठाची सध्याची मुख्य प्रशासकीय इमारत म्हणजे एके काळचा गव्हर्नरचा प्रासाद ! हे इंग्लिश उमरावांच्या निवासस्थानाच्या परंपरेतील भारतातील एक दुर्मिळ वास्तुशिल्प आहे. या इमारतीचे जतन ऐतिहासिक स्मारक म्हणून करावे आणि प्रशासकीय कार्यालये तेथून हलवून संग्रहालयासाठी तिचा उपयोग व्हावा ही विद्यापीठाची योजना अतिशय स्तुत्य आहे. नवी इमारत बांधताना जुन्या वास्तुशिल्पाची आणि भोवतीच्या नैसर्गिक परिसराची एकात्मता लक्षात घेतली नाही तर विद्यापीठाच्या स्तुत्य हेतूलाच धक्का बसतो. नव्या इमारतीच्या संकल्पित जागेमुळे समितीच्या मनात ही भीती निर्माण झाली आहे '

'परिसर' समितीने संरक्षणाची दुसरी 'स्टेप' २ एप्रिलला घेतली. त्या दिवशी मा. कुलगुरूंना एक लेखी छापील निवेदन सादर केलं. कै. शंकर ब्रह्मे यांच्या उपवनशास्त्रावरील मूळ टिपणांवरून हे निवेदन समितीने तयार केलं आठ पानाच्या या प्रदीर्घ अभ्यासपूर्ण निवेदनात उपवनरचनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी या रचनेची उत्क्रांती आणि त्यातून निर्माण झालेली मार्गदर्शक तत्त्वे यांची सविस्तर चर्चा केली आहे. नियोजित इमारत ठरवलेल्या जागी बांधल्यास या मार्गदर्शक तत्त्वांचा भंग होतो हे चार तत्त्वांच्या आधाराने पटवून दिलं आहे. उदा. नियोजित इमारतीचा विस्तार आकारिक आणि अनियमित रचनांच्या सीमेवरच आघात करेल. कारण इमारत ज्या रस्त्याला छेदणार आहे त्या वळसेदार रस्त्याला अनियमित व आकारिक रचनाचा सहजसुंदर मिलाफ होण्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुसरे मार्गदर्शक तत्त्व म्हणजे उपवन आणि स्थलशिल्प यातील दृढएकात्मता. नियोजित इमारत आणि भोवतीची मोकळी जागा ( ही


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : अठ्ठेचाळिसावा

१ मे १९८२

किंमत : दीड रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

असावीच लागते) यामुळे त्या ठिकाणी एका-एकी मोठे उजाड बेट तयार होईल आणि वृक्षराजीच्या घनतेतील सलगतेला (density gradient) भरून न येणारी हानी पोचेल आणि स्थलशिल्प व उपवन याच्यात आज-पर्यंत प्रयत्नपूर्वक जोपासलेल्या एकात्मतेला बाधा येईल. तिसरे मार्गदर्शक तत्त्व आहे, mass आणि void (घनाकार आणि अवकाश) यांच्यातील नात्याचे. नियोजित जागी इमारत बांधल्यास स्थलशिल्पामध्ये विचारपूर्वक साधलेलेmass आणि void चे संतुलन कायमचे नष्ट होईल. याशिवाय नियोजित इमारतीसाठी करावी लागणारी झाडेतोड, इमारतीच्या 'टेरेसिंग'साठी मागच्या बाजूच्या उतारावर करावी लाग-णारी 'कम्पलसरी' झाडेतोड, प्रशासकीय वर्दळीमुळे निर्माण होणारे संभाव्य शॉर्टकटस् व त्यामुळे परिसराची हानी, इमारत-बाधकामाच्या साहित्याची वाहतूक व साठा यामुळे निर्माण होणारी हानी यासारखे असंख्य विचारार्ह मुद्दे या निवेदनात मांडले आहेत.

हे निवेदन कुलगुरूंना देण्यात आलं. विद्या-पीठाची नियोजित बांधकामाबद्दल अधिकृत भूमिका काय आहे ? विद्यापीठ परिसराचा मास्टर प्लॅन कोणी तयार केला ? ही जर कमिटी असेल तर कमिटीतील सभासदाची गुणवत्ता विश्वासार्ह आहे का ? असल्यास त्याचा तपशील—यांची विचारणा करणारं दुसरं पत्रकही कुलगुरूंकडे दाखल झालं. याच पत्रकात विद्यापीठाने याबाबत घाईघाईने निर्णय घेऊ नये व संबंधिताशी परत एकदा चर्चा होण्यासाठी हा 'ओपन इशू' असावा अशीही विनंती केली; परंतु मा. कुलगुरूंनी अजून एकही लेखी उत्तर समितीला पाठवलेले नाही.

सहाजिकच आपली भूमिका विद्यापीठा-कडून योग्य तऱ्हेने समजावून घेतली जात नाही या भावनेने समितीचे सभासद बेचैन झाले आहेत. याबद्दल समितीची एक ढोबळ चूक सहज लक्षात येते की, प्रशासकीय इमारत बाधकामाची माहिती सर्वसामान्य लोकांना नसली तरी त्याबद्दल संबंधितांना हेतूपुरस्सर अंधारात ठेवलेले नव्हते. या इमारतीच्या संबंधी गेल्या दोन वर्षात अशा फुटकळ बातम्या वर्तमानपत्रात येत होत्या, असे असताना देखील तहान लागली की विहीर खणण्यात काय अर्थ आहे ? समितीचे सभासद मात्र इतर सामान्य लोकांप्रमाणेच आम्हाला ही बातमी बांधकामाची पूर्वतयारी सुरू झाल्यावरच समजली, असे सांगतात. 'ही बातमी कळताच आम्ही धावपळ केली आणि परिसर संरक्षण समिती स्थापन केली' असं समितीचे सभासद सांगतात.

संरक्षण समितीच्या भूमिकेबाबत खुद्द कुलगुरूंना काय वाटतं ? हा प्रश्न आपल्या 'जनरल इंटरेस्टचा'! कुलगुरू म्हणाले, 'विद्यापीठ परिसराबाबत या लोकानी जो जिव्हाळा दाखवला तो कौतुकास्पद आहे; पण या 'इश्यू'बद्दल समितीच्या लोकानी काही विचार केला होता की नाही ? पर्यायी जागाबद्दल त्यांच्या काही सूचना असतील असा माझा समज होता; पण पहिल्या भेटीत समितीचे लोक एक शब्दही बोलले नाहीत. विद्यापीठ परिसराची एकूण माहिती, पर्यायी जागा, त्यांची शक्यता या सर्व गोष्टी आम्हीच त्यांना सांगितल्या. त्याचे मत विचारले तर 'आम्ही फक्त तुमची भूमिका समजावून घ्यायला आलो आहोत.' असं उत्तर दिलं. दुसऱ्या भेटीतही तेच. विद्या-पीठाचं पहिलंच निवेदन त्यांच्या सर्व शंकांना उत्तर देणारं होतं, तरीही यांचा एकच ठेका की, 'ही जागा बरोबर वाटत नाही.' आता या बाबतीत समितीजवळ काहीच मुद्दे नाहीत असं मी म्हणायचं का ? तरी देखील समितीशी सहकार्य करण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न केला आहे '

समितीने लेखी निवेदनातून विचारलेल्या प्रश्नांची विद्यापीठाने लेखी उत्तरे का दिली नाहीत ? याबद्दल कुलगुरू म्हणाले, 'त्यांना लेखी पत्रकच हवं असेल तर आम्ही ते केव्हाही देऊ; पण आमची बाजू आम्ही त्यांना तोंडी पटवून दिलेलीच आहे.'

प्रशासकीय इमारत बाधकामाची बातमी नवीन नव्हती असं सांगून कुलगुरू म्हणाले, '५६ लाखाची नवी इमारत विद्यापीठात होणार असल्याचं आम्ही गेल्या दोन वर्षापासून सांगतो आहोत. इमारतीचा 'मास्टर प्लॅन' तयार होऊनही बरेच दिवस झाले. आता खणायला सुरवात केल्यावर विरोध करण्यात काय अर्थ आहे?'

पुढचा प्रश्न इमारतीचा प्लॅन ठरवताना जागा निवडीसाठी संबंधितांच्या (नगररचना-कार,आर्किटेक्ट आणि सामान्य माणसं) यांच्या मताचा विचार केला होता का ? यावर कुलगुरू म्हणाले, 'विद्यापीठ-इमारतीच्या बाधकामाचा आणि सामान्य माणसाचा संबंधच काय ? खुल्या चर्चेसाठी असे विषय कुठेच ठेवत नाहीत. (हे मात्र फक्त आपल्याच देशात! परदेशात अशा खुल्या चर्चा वरचेवर होतात.) समितीचं निवेदन मी वाचलं. निवेदनातली उपवनशास्त्रावरची माहिती वाचून मी चकित झालो. विद्यापीठ परिसराबद्दल समितीला जो जिव्हाळा आहे तो मी 'अॅप्रिशिएट' करतो; पण 'मास्टर प्लॅन' करताना आम्हीही उपवनशास्त्राचा अभ्यास केला. चार-पाच पर्यायी जागांमधून या जागेची निवड केली. अर्थात, हा निर्णय माझा एकट्याचा नाही. आमच्या बिल्डिंग कमिटीने एकमताने हा निर्णय घेतला आहे.'

कुलगुरूंचा बोलण्याचा एकूण रोख 'तुम्ही म्हणजे फारच सेंटिमेंटल बुवा!' असाच होता. त्यांच्या मते, विद्यापीठ परिसराची रचना गेल्या तीस–चाळीस वर्षांत जशी होती तशीच कायम रहावी असं कसं म्हणता येईल? सध्याची 'युनिसेंट्रिक सिमेट्री' आणि 'युनिव्हर्सिटी फंक्शनॅलिटी' यांचा काही संबंध नाही. समितीचे लोक म्हणतात, नवी इमारत जुन्या इमारतीला 'कॉम्पिटिंग' होईल; पण हीच इमारत जुन्या इमारतीला 'सपोर्टिंग' होईल असं का नाही तुम्हाला वाटत ? आम्ही नव्या इमारतीची रचनाच अशी करणार आहोत की, ती जुन्या इमारती-कडे वळून बघते आहे असं वाटावं. (हेही फारच सेंटिमेंटल नाही का ?) नवी इमारत अर्धवर्तुळाकार आकारात होणार. उतारावर इमारत बाधल्यामुळं तिची उंचीही फार भासणार नाही आणि ती आजूबाजूच्या वातावरणात छान मिसळून जाईल !'

मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोकळी जागा आहे. तसंच पाठीमागच्या (गणेशखिंडीच्या बाजूच्या) बाजूच्या दाराजवळही मोकळी जागा आहे. ती पर्यायी जागा का होणार नाही ? असा प्रश्न विचारला तेव्हा कुलगुरु म्हणाले, 'नवी इमारत आम्हाला 'इन-व्हायटिंग प्लेस' करायची आहे. विद्यापीठात प्रशासकीय कामाकरता येणाऱ्या माणसानं

आतल्या परिसराची ओळख करून घेऊन, मुख्य इमारत पाहून,, मगच प्रशासकीय इमारतीत जावं, असं आम्हाला वाटतं. (बाहेरच्या बाहेर काम झालं की फुटा, असं नाही.) दुसरी गोष्ट, आता जागा बदलल्यात, प्लॅन तयार होण्यात पाच–सहा महिने जाणार म्हणजे आठ–दहा लाखाचं नुकसान झालंच !'

थोडक्यात काय, विद्यापीठाची बाजू लढवण्यासाठी कुलगुरूंनी केलेलं 'आर्ग्युमेंट' छानच आहे. 'कन्सट्रक्शन ट्रेड'च्या मते बांधकाम–साहित्याच्या किंमती कितीही वाढल्या तरी दहा लाख नुकसान होणं शक्यच नाही ! तीच गोष्ट प्रशासकीय कामासाठी येणाऱ्या मंडळींना विद्यापीठ परिसराचे आवर्जून दर्शन घडायला हवे, या विधानाची. जो परिसर जतन करायचा आहे त्यालाच या इमारतीमुळे हानी पोचेल आणि आवर्जून बघण्यासारखे फारसे शिल्लकच काही रहाणार नाही, त्याचं काय ? सौंदर्यदृष्टी बाजूला ठेवली तरी विद्यापीठ उपवनाला असलेलं शैक्षणिक मूल्य लक्षात ठेवलंच पाहिजे ! स्थलशिल्प व नगररचनेचा विद्यार्थी, अभ्यासक आणि तज्ज्ञासाठी हा परिसर एक अमोल व चिरकाल जतन करावा असा शैक्षणिक ठेवा आहे. या विद्याशाखांचे विद्यार्थी आणि अभ्यासक आजही वेळोवेळी प्रत्यक्ष येऊन या उपवनाच्या व्यवच्छेदक वैशिष्ट्यांची डोळस अनुभूती घेतात व त्याच्या कलात्मक तंत्राचं ज्ञान जाणून घेतात.

कुलगुरूंच्या म्हणण्यानुसार, फक्त 'सब्जेक्टिव्ह' पातळीवर समितीच्या सभासदांनी या घटनेचा विचार केलेला नाही, हे यावरून सहज लक्षात येतं.

येत्या ४ मेला मा. कुलगुरु आणि समितीचे सभासद याची परत भेट होईल. समितीने आपली बाजू कितीही जोरात मांडली, पटवून दिली तरी नियोजित इमारत ठरलेल्या जागीच होणार ! इमारतीचे आराखडे, एस्टिमेट सगळं तयार आहे. बांधकाम केव्हाही सुरू होईल आणि पी. डब्ल्यू. डी., कॉंट्रॅक्टर, कन्सट्रक्शन एजंट यांची नाडी जुळली तर अंदाजे दोन वर्षात इमारत पूर्णही होईल ! ( फार वाद न घालता एकदा निर्णय घेतल्यावर कामाला लागावं या मताचा मी आहे–इति कुलगुरु).

या सर्व घडामोडीत काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात आल्या, त्या अशा–

१) नियोजित प्रशासकीय इमारत बांधण्यापूर्वी दोन वर्षे या इमारतीसंबंधी सर्वांना माहिती होती असे जरी कुलगुरु म्हणत असले तरी ही माहिती कित्येक संबंधितांना नवीनच आहे.

२) विद्यापीठाने जो 'मास्टर प्लॅन' म्हणून आराखडा केला आहे त्यात इमा-

---

# जागरूक पुणेकर

आपल्या आजूबाजूच्या वातावरणाबद्दल पुणेकर हल्ली फारच जागृत झाले आहेत. नव्याने स्थापन झालेली 'सिटिझन कमिटी' हे त्याचं बोलकं उदाहरण आहे. 'लॉ कॉलेज टेकडी आणि पुण्याचं 'जनरल' वातावरण यांचं रक्षण करा' अशा आशयाच्या मथळ्याखाली सिटिझन कमिटीनं एक निवेदन महाराष्ट्र सरकारला नुकतंच सादर केलं.

पुण्यातल्या टेकड्या, बागा, शांत रस्ते हे जसेच्या तसे रहावेत असं कोणाला वाटणार नाही ? पण असं नुसतं वाटून काही उपयोग होत नसतो. त्यांच्यावर जर नागरिक अतिक्रमण करत असतील तर त्यांचं रक्षण करणं हे आता पुणेकर आपलं कर्तव्य समजायला लागले आहेत. (हेही नसे थोडके ! ) या 'रक्षण' मोहिमेचा पहिला भाग म्हणून हे निवेदन प्रसिद्ध झालं.

निवेदनात एकूण सात मुद्दे माडले आहेत. पहिला मुद्दा म्हणजे टेकड्यांचं रक्षण करा. पुण्याच्या परिसराचं खास वैशिष्ट्य म्हणजे फर्ग्युसन टेकड्या, लॉ कॉलेज टेकड्या, तसंच पर्वती आणि गुलटेकडीचा शांत परिसर. या रमणीय (?) टेकड्यांपैकी पर्वती, गुलटेकडी आणि फर्ग्युसन टेकड्यांचे काय हाल झाले आहेत ते आपल्याला माहीतच आहे. सिटिझन कमिटीचं म्हणणं आहे की, टेकड्यांचे जे अवशेष राहिले आहेत ते तरी नीट सांभाळा.

कमिटीचा दुसरा मुद्दा आहे की, बागाची योग्य निगा राखा ! पुण्यातल्या बागा म्हणजे लहान मुलं आणि पेन्शनर आजोबा याची हक्काची कुरणं आहेत. (तशी ती असायलाच हवीत) याशिवाय क्रॉसकंट्री स्पर्धा, पिकनिक यासारखे प्रकारही सतत चालू असतात. पुण्यातल्या बागांवर पुणेकर आणि पाव्हणे मंडळी प्रेम करतात. यासाठी या बागांची योग्य निगा राखली गेली पाहिजे.

कमिटीचा तिसरा महत्त्वाचा मुद्दा लॉ कॉलेज टेकडीबद्दल आहे. या टेकडीवर शंभर फुटी रस्ता होणार असं ऐकिवात आहे. हा रस्ता बाल भारती, भांडारकर इन्स्टिट्यूट, लॉ कॉलेज, FTII, SNDT मार्गे जाणार आहे. त्यामुळे या संस्थाच्या कामात अडथळे येतील असं कमिटीचं म्हणणं आहे. त्यासाठी हा होऊ घातलेला रस्ता थांबवा असा हा तिसरा मुद्दा.

चिपळुणकर रस्त्यावर 'गरवारे फ्लायओव्हर'मुळे चांगलीच वर्दळ वाढली आहे. हा रस्ता जड वाहनांच्या वाहतुकीसाठी बांधलेला नव्हता; पण आता मात्र या रस्त्यावर जड वाहनांची वाहतूक सर्रास चालू असते. महानगरपालिकेने बांधलेल्या या फ्लाय-ओव्हरमुळे फक्त संभाजी पुलावरच नाही तर चिपळुणकर रस्त्यावरही वाहतूक विस्कळित होते.

वर उल्लेखलेल्या चार मुद्द्याशिवाय वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची एक कमिटी स्थापन करावी आणि त्यात नगररचनाकार, आर्किटेक्ट आणि प्रमुख नागरिक याचा सहभाग करून घ्यावा असे सिटिझन कमिटीने म्हटले आहे.

महाराष्ट्र सरकारच्या हातात हे निवेदन जाऊन पडलं असेल. त्यावर 'विचार'ही चालू असेल. पुण्यातल्या नागरिकांच्या 'वातावरण' प्रेमावर भाळूनच सरकारने त्याचा विचार केला तर गोष्ट वेगळी; पण शक्यतो याबाबत अंतिम निर्णय घेतलेलेच असतात. फक्त त्याची 'अमलबजावणी शिल्लक असते. सिटिझन कमिटीच्या 'सेव्ह पुणे' योजनेला महाराष्ट्र सरकार काय प्रतिसाद देतं ते पाहूच !

◻

रेतीच्या अनुषंगाने होणाऱ्या संभाव्य बदलांची दखल घेतलेली नाही. उदा. इमारतीलगत ४०।५० वाहनांच्या पार्किंगची सोय केली आहे; पण हा आकडा स्कूटर्स, सायकली व इतर वाहने धरून ४००।५०० च्या घरात जातो.

३) नियोजित इमारतीमुळे कँटिनलगतचा बसस्टॉप आणि मुख्य इमारतीकडे जाणारा रस्ता बंद होणार असल्यामुळे पर्यायी स्टॉपची अगर रस्त्यांची 'मास्टर प्लॅन'मध्ये कोणतीही नक्की कल्पना नाही.

४) नियोजित इमारतीसंबंधीचे निर्णय घेण्यासाठी जी 'कमिटी' निर्माण केली आहे त्यातील तज्ज्ञांची नावे, गुणवत्ता, स्थलशिल्पाच्या दृष्टीने त्यांनी केलेला तौलनिक अभ्यास आणि अंतिम निर्णयाचे निकष यासंबंधी लेखी विचारणा करूनही समाधानकारक माहिती विद्यापीठाने दिलेली नाही.

५) विद्यापीठ परिसरात कमालीचा बदल घडवू शकणाऱ्या नियोजित इमारतीबाबत काही मर्यादित लोक सोडता, इतर बहुसंख्य संबधितांचे मतही अजमावून पहाता एकमुखी निर्णय घेतल्याचा दावा करून विद्यापीठाने लोकशाही मूल्यांनाच धक्का दिला आहे.

६) समितीने पाठवलेल्या निवेदनावर 'सेंटिमेंटल' आणि 'सब्जेक्टिव्ह' असे शिक्के मारून या अभ्यासपूर्ण निवेदनाचा अनादर केला.

७) विद्यापीठाने घेतलेला निर्णयच कायम ठेवल्यामुळे या विषयावरील सांगोपांग चर्चेची शक्यताच नाकारली आहे.

या झाल्या काही त्रुटी आणि आक्षेप. दखल घेण्याजोगी एक महत्त्वाची गोष्ट परिसर संरक्षक समितीच्या निमित्ताने पुढे आली. ती म्हणजे विद्यापीठ परिसरात कोणतेही बदल करण्याचे अंतिम अधिकार, विद्यापीठातल्या काही मोजक्या मंडळीकडेच आहेत, असा समज कृपया संबंधितानी करून घेऊ नये.

विद्यापीठ परिसराशी आमचेही नाते आहे.

—मेधा देशपांडे

## मुंबई वार्ता

# फिल्म एक्स्पो एटी-टू

क्रॉस मैदानावर भरणारी प्रदर्शनं वजा-जग हा मुबईकरांच्या खास प्रेमाचा विषय. अगदी रोजच्या दगदगीनं कंटाळलेले असले, तरी फुरसतीच्या वेळी, सुट्टीच्या दिवशी, कुटुंबकबिल्यानिशी लोटणाऱ्या थव्यांची काही कमतरता नसते. 'बच्चा खेले, बच्चे का बाप भी खेले, बच्चे की मां भी खेले' अशा प्रकारच्या त्यातल्या करमणुकी म्हणजे प्रदर्शन कमी, जत्रा जास्ती, असा प्रकार!

याच परंपरेत बसणारं आणखी एक प्रदर्शन एप्रिलच्या सुरुवातीपासून क्रॉस मैदानावर भरलं आहे, 'फिल्म एक्स्पो एटी-टू' प्रदर्शनाच्या आयोजकानी त्याचा गाजावाजा तर पुष्कळ केला. उद्घाटनाला साक्षात अमिताभ बच्चन, क्रॉस मैदानासारखं ठिकाण, सुट्टयाचे दिवस आणि विषय चित्रपटासारखा म्हणजे आम जनतेच्या खास जिव्हाळयाचा!

प्रदर्शनात शिरताना आणि तिथून बाहेर पडताना नजरेत भरतं आणि मनात उरतं, ते कल्पक प्रवेशद्वार! प्रेक्षकाचं लक्ष वेधून त्याला प्रदर्शनापर्यंत आणण्याचं काम ते बरोबर करतं. हॉलीवुडच्या 'मिचेल' कंपनीनं साठ वर्षांपूर्वी बनविलेल्या ७८६ क्रमांकाच्या सिनेकॅमेराची ही भव्य प्रतिकृती आहे. प्लॅस्टर ऑफ पॅरिस, हार्डबोर्ड वगैरेंच्या सहाय्यानं बनवलेला राखाडी रंगाचा आणि खडबडीत अंगाचा हा कॅमेरा म्हणजे खरोखरच काही आब असलेलं ऐतिहासिक स्मारक वाटतं. या कॅमेऱ्याचं नाव सांगणारी छोटी, धातूची वाटणारी काळी पट्टीही तिथे अशा झोकात बसवली आहे की, जणू खरीच भासावी!

प्रवेशद्वार ही एक जमेची बाजू, अशी दुसरी जमेची बाजू म्हणजे, प्रदर्शनातला प्रथमदर्शनी दिसणारा चित्रपट महर्षी दादासाहेब फाळक्यांचा अर्धपुतळा (तोच तो, की ज्याला हार घालताना अमिताभ बच्चनचे डोळे विनाग्लिसरीन पाणावले!) उंच स्तंभावर बसवलेला आणि गंभीर चेहऱ्याचा हा पुतळा प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा असला, तरी अस्सल ब्रॉंझचा वाटतो. हे प्रदर्शन भरलं आहे तेच मुळी दादासाहेब फाळके प्रतिष्ठानाला मदत म्हणून, तेव्हा या पुतळयाचा संदर्भ अगदी जवळचा!

भारतीय चित्रपटाची ८६ वर्षं असं, नाव असणाऱ्या. समोरच्या तंबूपासून प्रदर्शन पहायला सुरुवात करावी असं मी ठरवलं. गर्दी तशी बेताचीच. आतमध्ये भिंतीवर चित्रपटाचे फोटो, पोस्टर्स दाटीवाटीन लावलेले होते. काही चित्रपटक्षेत्रातील व्यक्तींची, काही यंत्राची छायाचित्रं लावली होती. काही जाहिरातीची मुद्रितं अशा साऱ्यानं भिंती भरून गेल्या होत्या. ही सारी कमाई एकट्या फिरोज रंगूनवालांच्या कष्टाची. भारतीय चित्रपटाचा ८५–८६ वर्षांचा इतिहास सांगणारी ही चित्रं आणि छायाचित्रं अगदीच काही संपूर्ण नव्हती, हे खरं; पण तरीही त्यात काही तरी मौज होती, काही आनंद होता. त्या चित्रांमधून दिसत होत्या त्या एका नवोदित कलेच्या उत्क्रांतीच्या अवस्था, राहण्यावागण्याच्या पद्धती, पोषाक, जीवनमूल्य-समाजव्यवस्था यात घडत गेलेले बदल आणि या छायाचित्रात पडलेल्या त्यांच्या छाया. स्मरणरमणीयतेचं एक अद्भुत वलय काही काही चित्रामागे जाणवत होतं. 'कल्याणचा खजिना', 'गोपालकृष्ण', 'सतीसावित्री' अशासारख्या चित्रपटांची मोठी मोठी पोस्टर्स लावली होती. ठेवणीत जपून ठेवल्यामुळे पडलेल्या घड्या, भडक आणि अन–लाइफ–लाइक अशा कृत्रिम रंगातली ती चित्रं. तत्कालीन पद्धतीच्या वेषभूषेनं नटलेली पात्रं. गोल पाच वारी साडी, फुग्याच्या बाह्याचं पोलकं आणि कुरळे केस असणारी सती सावित्री! पण यात काही हास्यास्पद वाटत नाही, वाटते ती आत्मीयता! अरे, ही तर आपलीच परंपरा, असा जिव्हाळ्याचा भाव निर्माण होतो. कदाचित असंही असेल की गोष्टी केवळ जुन्या आहेत, म्हणूनही अशी आपुलकी निर्माण होत असावी!

बऱ्याच गमतीशीर तपशिलाचीही रेलचेल होती. १८९६ साली दाखवला गेलेला 'अराइवल ऑफ अ ट्रेन' हा सुरुवातीच्या चित्रपटांपैकी एक. तो वॅटसन हॉटेलमध्ये

दाखवला गेला होता—ही म्हणजे सध्याची मुबई विद्यापीठाजवळची 'आर्मी अँड नेवी बिल्डिंग.' 'टाइम्स ऑफ इंडिया'त आलेली एक जाहिरात आहे, एका चित्रपटाच्या खेळाची. ११ नोव्हेंबर १८९९ रोजी—द लेटेस्ट सायंटिफिक वंडर ऑफ द अेज—'शकुंतला'—मेड बाय पाटणकर ब्रदर्स. खेरीज ही 'अ मोअर फेथफुल वर्शन' असल्याचीही ग्वाही दिली होती. शेजारी फुग्यांच्या ढगात बसलेल्या शकुंतला आणि तिच्या सख्यांचं चित्र काढलं होतं. तिकिट दर रुपये ३, २ व १ फक्त. म्हणजे आजच्या भावात पिटाचं तिकिट असलं, तरी त्या वेळचा सोफा असणार !

सनसनाटी, मारामारीच्या हिट अँड हॉट चित्रपट बनवणाऱ्याना शुद्धलेखन, व्याकरणाचे नियम किंवा एकूणच व्यवस्थितपणा याचं वावडं असतं. मग ते आजचे असोत की कालचे. एक जाहिरात होती, 'वाडिया ब्रदर्स प्रॉडक्शन, हरिकेन हंसा-डायमंड थ्रीलर नंबर ४. मुख्य काम—फियरलेस नादिया. पंजाबका बेटा घोडा.' शेजारी चोर लोक लावतात तसा काळा चष्मा लावलेला फियरलेस नादियाचा फोटो. 'झाम्बो—द एपमन' ही आजच्या 'टारझन'ची आठवण करून देणारी एक जाहिरात होती. एक छायाचित्र लावलं होतं, 'हिम्मत-ए-मर्द' या १९३४ सालच्या चित्रपटातलं. सध्याची खाष्ट सासू फेम ललिता पवार चक्क वल्कलाची मिडी नेसून एका खडकावर निसर्गाच्या सान्निध्यात इत्यादि इत्यादि बसली आहे आणि हिम्मतदार मर्दाच्या भूमिकेत चंद्रकांत कदमही तिच्या शेजारी तसाच उभा आहे, असं ते छायाचित्र होतं. 'सेक्स अपीलवर जोर असणारा चित्रपट' अशा शब्दात या चित्रपटाची तरफदारी केली गेली होती.

जगभरच्या आणि विशेषत: संपूर्ण भारतातल्या चित्रपटाचं समग्र दर्शन करण्याचं आश्वासन प्रदर्शनानं दिलेलं असलं, तरी काही हिंदी आणि दोन-पाच मराठी, बंगाली, गुजराती, तामीळ चित्रपटापलीकडे फारशी मजल गेलेली नव्हती. तामिळ चित्रपटांच्या बहुतेक सर्व पोस्टर्समध्ये एम. जी. आर. होतेच आणि त्या सर्वांखाली 'द मॅटिनी आयडॉल' आणि 'द नोटेड पॉलिटिशियन' अशी शीर्षकं आलटूनपालटून दिली होती. पुष्कळशी पोस्टर्स चालू (म्हणजे सध्याच्या 'चालू' नव्हे !) हिंदी चित्रपटाची होती. जी सध्या आपल्याला बाहेरही बघायला मिळतात, ती खास रुपयाभराचं तिकिट खर्च करून बघायला कशाला बरं जायचं ? (असं आपलं मला वाटलं !)

इंटरेस्टिंग वाटली ती प्रदर्शनात ठेवलेली यंत्रसामुग्री. प्रसिद्ध वेस्टेक्स कपनीशी संलग्न सिनेरामा, सिनेसिटा वगैरे कंपन्यांनी ही यंत्रसामुग्री माडली होती. 'बर्थ ऑफ अ फिल्म' अशा शीर्षकाखाली चित्रपटनिर्मितीची प्रक्रियाही सचित्र स्पष्ट केली होती. त्यात अपुरेपणा होता हे खरं; पण कल्पना स्वागतार्हच होती. चित्रपट म्हटला की, साच्यातून काढलेली, गाण्या—बजावण्यात बुडवलेली आणि चार निसर्गदृश्यं टाकलेली एक सुमार करमणूक असं एक प्रातिनिधिक चित्र आपल्यासमोर येतं, पण आशयाचा भिकारपणा असला, तरी चित्रपटांचं बाह्यांग अधिकाधिक देखणं करणारं, प्रगत होत जाणार तंत्रज्ञान, हा मानवी बुद्धीचा, प्रतिभेचा खरा आविष्कार आहे. एस. पी. रावांनी मांडलेली काही उपकरणही होती. १९०८ सालचा १०००० वॅटचा स्टुडिओ लॅंप. हंडीच्या आकाराचे मोठे बल्ब. हेलेजीनचे दिवे. फिरत्या रंगाचा, नक्षीदार 'डे-लाइट लॅंप,' काही कॅमेऱ्यांची छायाचित्रं, —सध्या वापरला जाणारा कॅमेरा—याची किंमत २२ लाख रुपये आहे ! शंभर फुटांचा आवाका असणारा कॅमेरा, पाण्याखाली फिल्मिंग करू शकणारा कॅमेरा इत्यादि इत्यादि.

एका कोपऱ्यात जरा अधिक गर्दी होती म्हणून पाहिलं, तर सध्याच्या लोकप्रिय चित्रपटातली दृश्यचित्रं लावली होती.

या तंबूतून बाहेर पडून पाहिलं. बाकी सगळे नुसतेच खाद्यपदार्थांचे आणि किरकोळ विक्रीचे स्टॉल्स. काही तर रिकामेच असलेले स्टॉल्स. प्रदर्शन खल्लास ! म्हणजे जवळजवळ सुरू व्हायच्या आतच संपलेलं !

तेव्हा मग अडाप्पाना जाऊन भेटले. ज्या इंडियन फिल्म लिंकर्स असोसिएशननं हे प्रदर्शन भरवलं आहे, त्याचे अडप्पा सेक्रेटरी. अडाप्पांनी प्रदर्शनाची पडद्यामागची गोष्ट सांगितली. सरकारी पाशात प्रदर्शनाचा गळा आवळला गेला आहे. इंडियन फिल्म लिंकर्स असोसिएशन ही पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूट-प्रमाणे चित्रपटविषयक प्रशिक्षण देणारी आणि त्या प्रशिक्षितांना घेऊन चित्रपट काढणारी संस्था आहे. त्यांच्या या प्रदर्शनाला परवानगी, मुदतवाढ देण्याबाबतीत सरकारनं एवढं तळघात—मळघात धोरण चालवलं आहे की, प्रदर्शनातले स्टॉल्स घ्यायला कॉन्ट्रॅक्टर्स तयार होत नाहीत. त्यामुळं प्रेक्षकांना आकर्षण कमी. गर्दी कमी. जिथे एक लाखाची अपेक्षा होती तिथे रोज जेमतेम ३–४ हजाराच उत्पन्न. त्यामुळं उरलेले बेत डब्यातच. अडाप्पांची कल्पना होती की, प्रदर्शनात रोज बदलता कार्यक्रम ठेवावा. कलास्पर्धा, ब्युटी कॉन्टेस्टस् असाव्यात. शूटिंगची प्रात्यक्षिकं असावीत. मारामारीचं शूटिंग, डिस्कोचं शूटिंग, पाण्याखालचं शूटिंग कसं केलं जातं, या साऱ्याची प्रात्यक्षिकं दाखवावीत. अनेक बड्या बड्या कलाकारानी त्यासाठी यायचंही कबूल केलं होतं. गाजलेले जुने आणि नवे चित्रपट दररोज दाखवावेत. प्रदर्शनाच्या माहितीपत्रकात म्हटलं होतं की, चित्रपटाविषयीची आवड प्रेक्षकामध्ये रुजावी हा या प्रदर्शनामागचा हेतू आहे. आता हे म्हणजे सधन शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्यासारखंच आहे ! चित्रपटाची आवड एवढी बोकाळली आहे की, ती थोडी कमी करता आली तरच बरं ! पण अडाप्पाचं म्हणणं असं की, अडाणी आणि अंगठेबहाद्दर चित्रपट-प्रेक्षकानी तंत्राच्या जाणिवासह अधिक डोळसपणे चित्रपट पहावा आणि समजून घ्यावा हा या प्रदर्शनामागचा हेतू आहे.

तेव्हा एकूण कल्पना उत्तमच आहे. आता ती प्रत्यक्षात येईल तेव्हा खरी ! उद्घाटनाची भरजरी फीत अमिताभ बच्चननी कापली; पण ही सरकारी लाल फीत कोण कापणार ?

—ललिता बर्वे

कामगार वृत्त

# महाराष्ट्र बंद !

## कामगार गोंधळातच !

कामगार संघटना संयुक्त कृती समितीने आयोजित केलेल्या १९ एप्रिलच्या 'महाराष्ट्र बंद'ला हवा तसा प्रतिसाद महाराष्ट्राच्या कोणत्याच भागात न मिळाल्याने हा बंद अनेकांना खूप काही सांगून गेला आहे.

जे अडीच लाख गिरणी-कामगार गेल्या तीन महिन्यांपासून संपावर आहेत त्यांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी आणि सरकारच्या कठोर भूमिकेला कडाडून विरोध करण्यासाठी हा 'बंद' पुकारला होता. बंद पुकारणारी संघटना 'कामगार संघटना संयुक्त कृती समिती' जरी असली तरी प्रामुख्याने कामगार-नेते डॉ. दत्ता सामंत यांनीच हा बद पुकारला आहे, असं सर्वसाधारण वातावरण सर्वत्र तयार झालं होतं. त्यामुळं 'बंद'-बाबत एक फार मोठी हवा निर्माण झाली होती.

बंदच्या निमित्ताने येथील शिवाजी पार्कवर ज्या दोन जाहीर सभा झाल्या त्याला कामगारांनी खूपच गर्दी केली होती. २ एप्रिलची पहिली जाहीर सभा तर अतिशय विराट होती. सभेमध्ये संयुक्त कृती समितीतील काही नेते बोलले, पण जमलेला कामगार डॉ. सामंतांशिवाय कोणाचेच भाषण ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हता. त्यामुळे डॉ. सामंतानीच ती सभा गाजवली.

सभेत 'महाराष्ट्र बंद'चा निर्णय घेतला गेल्यानंतर अनेक कामगार-नेत्यांनी महाराष्ट्रात फिरून 'बंद'चा जोरदार प्रचार केला. सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथे तर डॉ. सामंतांचे प्रचंड प्रमाणात स्वागत झाले. या सर्व अनुभवाच्या आधारेच 'बंद'च्या आदल्या दिवशी, म्हणजे १८ एप्रिलला शिवाजी पार्कवर जी दुसरी जाहीर सभा झाली त्यात खुद्द डॉ. सामंतांनीच 'बंद'ला प्रचंड प्रतिसाद मिळणार, असे सांगितले. याच सभेत खा. जॉर्ज फर्नांडिस यांचे घणाघाती भाषण झाल्याने सभेत व एकूण वातावरणात एक जोष निर्माण झाला. उद्याच्या 'बंद'ला प्रचंड प्रतिसाद मिळणार, असे समजून प्रत्येकजण पुढील कामास लागला.

पण प्रत्यक्षात १९ एप्रियला काय घडले? सर्वांचीच फार मोठी निराशा झाली. कारण 'बंद'बाबत जितके बोलले जात होते ते सर्व अतिशयोक्तीचे असल्याचे येथे दिसून आले. इतकेच नव्हे, तर अनेक सत्य गोष्टी त्यामुळे समोर आल्या.

'कामगार संयुक्त कृती समिती'त इंटकेतर सर्व कामगार संघटना आहेत. यातील प्रत्येक संघटनेने 'बंद'ची हाक दिली होती. हिंद मजदूर सभेने प्रारभी विरोध केला, परंतु नंतर सभेला आपली भूमिका बदलावी लागून संपाला पाठिंबा देणे भाग पडले.

म्हणजे यातील सर्व कामगारांनी 'बंद'मध्ये भाग घेणे अगत्याचे होते. परंतु तसे झाले नाही. बँका आणि विम्यातील कर्मचारीही या संपात उतरतील, असे आधीच जाहीर झाले होते. परंतु येथे तर त्याचा अगदी उलटा परिणाम दिसून आला. बँकातील कोणतेही व्यवहार म्हणावे तसे थंडावले नाहीत. विमा कंपन्यातही वाखाणण्यासारखी गैरहजेरी नव्हती. सरकारी व्यवहार तर नित्याप्रमाणे चालू होते. याचबरोबर ठाणे, बेलापूर पट्टीत असणारे अनेक कारखाने त्या दिवशी नित्याप्रमाणे चालू होते. एकंदरीत कृती समितीतल्या नेत्यांच्या आवाहनाला येथे हवा तसा प्रतिसाद मिळालाच नाही.

दुसरी गोष्ट डॉ. दत्ता सामंताच्या कामगाराची ! अलिकडे डॉ. सामंतांशिवाय कोणीही मुंबई बंद करू शकणार नाही, असा वारंवार अनेकांच्याकडून दावा केला जातो. परंतु हा दावा किती अतिशयोक्तीचा आहे,


**– नवीन दाखल झालेली पुस्तके –**

1. **Defence of The Western Border** – ( II Volume ) – India's Wars with China and Pakistan–Maj. Gen. Sukhwant Singh.
2. **The Desert**–( A Time/Life book–illustrated )–Leopold A. Starker.
3. **Life Goes To Movies**–( Cinema )–
4. **Best of Life**–( eye–cantching pictures )–
5. **Max Perkins :** Editor Genius–( Biography Experiences of the Editor relating to Hemingway, Fitzgerald, Coldwell etc. )–A. Scott Berg.

१. ॥ त्रिफळा ॥–(क्रिकेट)–बाळ ज. पंडित.
२. शृंगारवेल–(कथासंग्रह)–श्री. ज. जोशी.
३. निसर्गयात्रा–(पक्षीनिरीक्षण)–प्रकाश गोळे
४. महात्मा फुले : व्यक्तित्व आणि विचार–गं. बा. सरदार.
५. महाभारताची पार्श्वभूमी–पश्चिम आशिया–अ. ज. करंदीकर.

❋ *'PHOENIX' can aim at higher standards only if you co-operate !*

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

या ' बंद 'मुळे दिसून आले.

कोणत्याही उद्योगसमुहातील ९० टक्के कामगार आपल्याकडे आल्याशिवाय आपण तेथे पाऊलही ठेवत नाही, असे डॉ. सामंत नेहमी म्हणतात. मुंबईतल्या बेस्टमध्येही आपण किती अत्युच्च शिखरावर आहोत, हे डॉ. सामंतांनी १९ जानेवारीच्या 'भारत बंद' दिवशी दाखवून दिले. त्या दिवशी बेस्ट सोडून डॉ. सामंतांनी 'भारत बंद'ला पाठींबा जाहीर केला होता. त्यामुळे साहजिकच बेस्ट चालू राहिल्याने ' भारत बंद 'ला हवा तसा प्रतिसाद मिळाला नव्हता.

याच डॉक्टरांच्या एका गोष्टीमुळे नाराज झालेल्या बेस्टमधील जॉर्ज फर्नांडिसांच्या कामगारांनी जॉर्जचा आदेश धुडकावून डॉ. सामंतांवर सूड उगवण्यासाठी कालच्या ' महाराष्ट्र बंद 'च्या दिवशी मुंबईतील बेस्ट चालू ठेवली ! एकीकडे लोकलगाड्या नित्या-प्रमाणे चालू, तर दुसरीकडे मुंबईतील बेस्टही काही प्रमाणात चालू; यामुळे ' बंद 'वर विपरीत परिणाम झाला. या दोन्ही साधनां-च्याद्वारे कामगार कामावर हजर राहिले !

आता प्रश्न असा उभा राहतो की, ज्या डॉ. सामंतांनी पुढाकार घेऊन हा 'महाराष्ट्र बंद' घडवून आणला त्यात डॉ. सामंतांचे सर्वच्या सर्व म्हणजे शंभर टक्के कामगार सहभागी झाले का ? या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच मिळते. मुंबई आणि ठाणे–बेलापूर पट्टीत डॉ. सामंतांचे जास्त प्राबल्य आहे; पण ह्या ठिकाणी त्यांचे बरेच कामगार कामावर हजर राहिले. जे कामगार कामावर हजर राहिले नाहीत त्यातील बहुतेकांनी आपली आठवड्याची सुट्टी त्या दिवशी घेतली. आता नेहमीच्या सुट्टीच्या दिवशी ते काम करणार आहेत. मग ह्या सर्व गोष्टीला ' प्रचंड प्रतिसाद मिळाला ' असे म्हणणे नक्कीच अतिशयोक्तीचे आहे.

ह्या दिवशी काही भागातील दुकानदारांनी आपली दुकाने प्रथम स्वेच्छेने बंद ठेवली; परंतु दुसऱ्याचे दुकान चालू असलेले पाहून दुपारनंतर एकेकाने आपले दुकान उघडण्यास सुरवात केली. संध्याकळी सहानंतर तर सकाळचे सर्व वातावरण पालटून गेले. बरीच हॉटेल्स सकाळपासूनच उघडी होती.

टॅक्सी मात्र रस्त्यावर तुरळक फिरत असल्याची दिसत होती. टॅक्सीच्या मानाने रिक्षावाल्यांनी'बंद'ला योग्य तो प्रतिसाद दिला नाही.

या एकूण 'बंद'मध्ये मुंबईतील सर्वसामान्य नागरिक मात्र नेहमीपेक्षा खूष दिसत होते. नेहमीच्या गर्दीला त्रासलेल्या मध्य रेल्वे-मार्गावरील प्रवाशाला या दिवशी आरामात लोकलमध्ये चढता आले, इतकेच नव्हे तर कधी न मिळणारी जागा त्याला बसावयास मिळाली ! मध्य रेल्वेमार्गावरून प्रवास कर-णाऱ्या माणसाला याच्यापेक्षा आणखी काय अधिक सुख हवे असणार ?


अशा प्रकारे हा 'बंद' अनेकांना खूप काही सांगून गेला. या 'बंद'मुळे कृती समितीतल्या लोकांनी आपल्यासाठी कसे, काय आणि कुठपर्यंत केले हे डॉ. सामंतांना समजले. ज्या कारणांसाठी आपण डॉ. सामंतांच्या पाठी-मागे आहोत, त्यांना लोकांचा किती पाठिंबा आहे, हे कृती समितीतल्या लोकांनाही यामुळे समजले. सरकारलाही खरोखरच लोकांचा आपणावर फार मोठा रोष आहे, का हे समजले; पण गिरणी-कामगाराला ? गिरणी-कामगाराला मात्र यातील काहीच समजले नाही ! कारण, एक दिवसाचा 'महाराष्ट्र बंद' करूनही सरकार आणि डॉ. दत्ता सामंत आहेत तेथे आहेत ! दोघेही जराही हलायला तयार नाहीत. उलट दोघेही आता ठाण्याच्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी रणांगणात उतरले आहेत ! पाहू या, या सर्व गोंधळात अडीच लाख गिरणी-कामगारांचे काय होते ते!

—मोहन शं. कुलकर्णी

घाटकोपर


# तिसरी आवृत्ती

## संपत आली



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

उत्तरमीमांसा : ४८

स. शि. भावे

# प्रत्येकाचे 'स्वतःपणा'चे उधाण

आज एक मे. महाराष्ट्रदिन! स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस आज बावीस वर्षे पुरी होतात. पहिल्या एकवीस वर्षांचा सामाजिक-सास्कृतिक ताळेबंद उत्तरमीमांसेने गतवर्षी सादर केला होता. त्यात काही आशादायक बदल गेल्या सवंध वर्षात दिसून आलेला नाही. न्यायमूर्ती लेंटिन याचे निकालपत्र हाच एक अपवाद; पण ते काही विधायक यश म्हणता येणार नाही.

सालाबादप्रमाणे महाराष्ट्रात संमेलने, व्याख्यानमाला सुरू झाल्या आहेत. दलित आणि ग्रामीण संमेलने भरत आहेत. आजवर झालेल्या विचार-विनिमयापेक्षा नवीन असा कोणता विचार या संमेलनातून होणार, याची उत्सुकता मनात आहे.

२१ एप्रिलपासून, म्हणजेच भारतीय सौर वैशाख १ पासून पुण्याच्या वसंत-व्याख्यान-मालेचे शंभरावे सत्र सुरू झाले आहे. १ मे ते ३१ मे अशी होणारी ही व्याख्यानमाला आधी ओढून वैशाखमासात बसविली हे चागले झाले; पण सध्याच्या उन्हाळयातील वैशाखाला वसत म्हणता येईल का, याची शंका वाटते. बऱ्याच शतकांपूर्वी, जेव्हा १४ जानेवारीला किंवा नतर १० जानेवारीला मकरसंक्रमण होत असे, त्या वेळी हा वसंतऋतु असणार. तथापि नंतर, मकरसंक्रमणाचा दिवस २१ डिसेंबरपर्यंत अलीकडे आल्यावर, वसतऋतूही अलीकडे येणे क्रमप्राप्त आहे.

वसंतसंपाताचा दिवस सध्या २१ मार्च आहे. सपातदिनाच्या आधी एक महिना व नतर एक महिना, असा वसंतऋतू धरणे योग्य होईल. विषुववृत्ताच्या दक्षिणेस साडेसात अंश, ते उत्तरेस साडेसात अंश, असे दोन महिन्यांचे सूर्याचे भ्रमण सुखाचे होते. नंतरचे साडेसात ते साडेबावीस अंश असे सूर्याचे उत्तरेकडील भ्रमण उष्म्याचे, त्रासदायक आणि असह्य. इतके असह्य की, सूर्य १८-१९ अंशावर असतानाच, उष्म्याच्या परिणतीला, म्हणजे पावसाला सुरुवात होते.

म्हणून सौर फाल्गुन आणि सौर चैत्र मिळून सध्या वसतऋतू मानायला हवा. ज्ञानप्रबोधिनीच्या कालदर्शिकेत वसंतऋतू याच काळात दाखविला आहे, याची अभिनंदनपूर्वक नोंद करायला हवी.

आज एक मे. आजपासून मॅजेस्टिक गप्पा हे पुण्याचे आणखी एक वैशिष्टय सुरू होत आहे. 'गंभीर आणि गमतीदार' याचे सुयोग्य मिश्रण असलेल्या गप्पांचे हे दहावे वर्ष. मॅजेस्टिक गच्चीवर आजपासूनच्या पंधरासोळा सायंकाळी आल्हाददायक साहित्यिक वातावरणाने गजबजतील!

गेल्या वर्षी, ५ मे रोजी, दि. बा. मोकाशीची मुलाखत या गप्पामध्ये झाली होती. यंदा मोकाशी नाहीत. त्याची उणीव जाणवेल. कुरुंदकर आणि अच्युत बर्वे याचीही उणीव जाणवेल!

खऱ्या, भरगच्च पावसाळ्याआधी मान्सूनपूर्व वादळी सरी (वेधशाळेची क्षमा मागून) येतात, तसे मॅजेस्टिक गप्पा आणि वसंत व्याख्यानमाला यांच्याआधी पुण्यात छोटे-मोठे पण महत्त्वाचे असे काही कार्यक्रम झाले.

१७ एप्रिलला सायंकाळी, हेमन्त गोविंद जोगळेकर याच्या 'होड्या' या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. हस्ते : कविवर्य बा. भ. बोरकर. प्रमुख भाषण डॉ. अनुराधा पोतदार.

त्याच सायंकाळी मॅजेस्टिक गच्चीवर, 'हिटलर' या वि. स. वाळिंबे यांच्या ६७० डेमी पृष्ठाच्या दणदणीत पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी जनरल बेवूर, श्री. ग. मुणगेकर, दि. वि. गोखले, व. मा मिरासदार याची भाषणे झाली.

रविवारी १८ एप्रिलला दुपारपासून सायं. ८ पर्यंत 'ग्रंथाली'च्या पुणे केंद्राचा वाढदिवस साजरा झाला. दुपारी 'कादबरी व पत्रकारिता' या परिसवादात अरुण साधू, डॉ. अंजली सोमण व ह. मो. मराठे हे बोलले. अध्यक्ष या नात्याने सूत्रचालन केले श्री. ग. माजगावकर यानी. नंतर ग्रंथनारायणाची अभिनव पूजा झाली. शेवटी ह. वि. मोटे यांची प्रकट मुलाखत रामदास भटकळ व अनंत भावे यानी घेतली. ग्रंथालीला पुढे करून सर्व नव्या-जुन्या लेखक-प्रकाशक-वाचकांनी हरिभाऊंच्या ५० वर्षांच्या साहित्य-सेवेला, (अनंत भाव्याच्या शब्दात) 'सलाम' केला!

हा तपशील म्हणजे केवळ तपशील नव्हे. आता लिहिताना मला आठवले आहे, ते या तीनही प्रसगी झालेल्या भाषणांत व्यक्त झालेले एक सूत्र.

¤

बोरकराच्या भाषणापासून हे सूत्र हळूहळू स्पष्ट होत गेले.

जोगळेकराच्या 'होड्या' विषयी बोलताना ते म्हणाले की, हा कवी म्हणजे एक लाजाळूचे झाड आहे. हा लाजाळूपणा त्याच्या साऱ्याच कवितात दिसतो. ते पुढे असेही म्हणाले, की सध्याचा काळ हा सामाजिक बांधिलकीचा आणि त्या बांधिलकीच्या उद्घोषाचा काळ आहे.

कवी असताना, कविता करताना, अशी बांधिलकी पाळायची म्हणजे नेमके काय करायचे, असा प्रश्न करून ते म्हणाले की, नागरिक म्हणून, व्यक्ती म्हणून प्रत्येकाने आपापल्या सामाजिक तत्त्वाची बांधिलकी निभवावी, गोव्याचा स्वातंत्र्यलढा सुरू झाल्यावरोबर आपण त्यात कसे ओढले गेलो हे त्यानी सागितले. बोरकर हे सागत असताना अनेकाच्या 'पर्यंक-बांधिलकी' चा ( armchair commitment ) आठवण झाली. थोडी गमत वाटली. बरेचसे वाईट वाटले; पण बोरकर इतक्या उत्साहाने बोलत होते की, हा विक्षेप चटकन दूर झाला.

स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष भाग घेणे, तुरुंग सोसणे, हाल सोसणे ही बांधिलकीची कृती झाली. कविता रचणे, चित्र काढणे, त्यालाचा महाल उभारणे-या कृती बांधिलकीच्या कशा होतील?...बोरकर बोलत होते...या कृती-

नंतर खास आपल्या स्वत:च्या, आपल्या मनातल्या मनाच्या आहेत...

माझ्या मनात एक विचार येऊ लागला होता...आपल्याला खरा आराम केव्हा मिळतो? तर अगदी आपले आपण असतो, तेव्हा!

एखादा दिवस असा उजडतो. घरात कोणी नसते. फक्त आपण असतो. लवकर उठा, लवकर अंघोळ आटपा, मंडईत जाऊन भाजी घेऊन या, असे तगादे नसतात. मग आपली चैन असते. या चैनीत आपली ऐट बघावी. या एकटेपणाच्या निवांत ऐटीत आपला आराम खरा बहरतो.

आपण मग खुशाल नऊ–दहा वाजेतो लोळतो. पेपर वाचायला मुद्दाम तासभर लावतो. बिछाना न आवरता तिथेच फतकल मारून दाढी करायला बसतो, किती तरी दिवसांनी साबण लावण्यापूर्वी आपला चेहरा बराच वेळ आरशात न्याहाळत असतो. कल्ले लांबवले तर कसे दिसतील, कोचदार दाढी ठेवली तर कसे होईल याचा खोल, चिंतनशील विचार करतो. निरनिराळ्या कोनांतून चेहरा पाहून आपला (ही) चेहरा देखणा दिसू शकतो. असे पाचसहा कोन शोधून काढतो. याच पाचसहा कोनांतून लोक आपला चेहरा बघतील तर किती छान होईल असा विचार करतो. दाढी पुरी करायलाही आपण वेळ लावतो.

बऱ्याच दिवसांनंतर आपले आपण स्वत:ला सापडलेले असतो आणि स्वत:शी खेळून, स्वत:ला भोगायचा निवांत वेळ आपण लांबवीत असतो. वेळ लांबवून आपण तो निवांतपणाच अधिक निवांत करीत असतो. एखाद्या माजराच्या पिलाने स्वत:शीच खेळत राहावे, तसा...

'कवी कविता करतो -तेव्हा त्याचा स्वत:चा स्वत:शी संवाद चालू असतो.'... बोरकर बोलत होते...'सामाजिक बांधिलकी' अशा संवादात बाहेरून जाणीवपूर्वक घुसविली की त्या संवादाचे मूळ रूपच उद्ध्वस्त होते. जोगळेकरांच्या कवितेत या आक्रमणाची आणि नंतरच्या उद्ध्वस्ततेची कडवट, पण संयत चित्रे आहेत.'...

मला वाटत होते, स्वत:चा स्वत:शी संवाद चालू असतो यात थोडासा बदल करायला हवा. स्वत:चा स्वत:पणाशी संवाद चालू असतो असे म्हणायला हवे.

असा संवाद फक्त कवीचा आणि कविता लिहिताना चालू असतो, असेही नव्हे. आपल्यापैकी प्रत्येकाचा स्वत:चा स्वत:पणाशी संवाद चालू असतो. बोरकरांचे भाषण ऐकताना माझा असा संवाद चालू होता. बोरकर याच संवादाविषयी बोलत आहेत हे लक्षात येऊन माझ्या या संवादाचा सुखावलेपणा वाढला होता.

श्रीमंत-गरीब, सुशिक्षित-अशिक्षित, साक्षर-निरक्षर, पुरुष-स्त्री इत्यादी वर्ग-स्तर-भेदावर हा संवाद असणे अथवा नसणे अवलंबून नसते. या संवादाचे तपशील बदलतात, संदर्भ बदलतात; पण 'स्वत:पणाशी संवाद' ही अनुभूती बदलत नाही आणि या अनुभूतीची गरज बदलत नाही.

काही वेळा अशा संवादासाठी दुसरे माणूसही घेतले जाते; पण संवाद असतो स्वत:शी, स्वत:पणाशी. ते दुसरे माणूस म्हणजे जणू एक भोज्या असतो. कधी मित्र, कधी मैत्रीण. आयांना बहुधा आपली लहान मुले आवडतात. कधी थोरल्या बहिणीला धाकटा भाऊ चालतो. अट एकच असते, स्वत:पणाशी हा जो संवाद चाललेला असतो त्यातमध्ये घुसून अडथळा आणायचा नाही. 'हो ना', 'हो का', 'अरे ना', अशी पुष्टी देऊन, किंवा 'असं ना?', 'आता काय म्हणावं?', असे थोडे डिवचून या संवादाला उधाण आणले तर फारच छान! पण तसे उधाण आणले नाही तरी फारसे अडत नाही. कारण संवाद करणाऱ्याला आधीच उधाण आलेले असते. त्या उधाणाला अडसर मात्र चालत नाही.

... बोरकर बोलत होते. त्यांचे उधाण अजून शमले नव्हते.

मी आश्चर्य करीत होतो. कवीच्या वयाला सत्तरावर वर्षे झाली. त्यांपैकी पन्नास-पंचावन्न वर्षे कविता करण्यात गेली. तरी कवीचे उधाण अजून संपले कसे नाही? आश्चर्य करीत असताना मी बोरकरांकडे एकटक पाहत होतो. बऱ्याच वर्षांपूर्वी त्यांना प्रथम पाहिले, तेव्हा जी चमक त्यांच्या डोळ्यात दिसली तीच चमक या वेळीही त्यांच्या डोळ्यांत होती. भव्य कपाळाला आठ्या पाडणारा त्यांच्या नर्तनशील भुवयांचा लवचिक ताणही होता तसाच या वेळी होता.

कवीच्या डोळ्यातली ती चमक आणि त्याच्या भुवयांचा तो ताण, हे पाहून अनुभवताना माझ्या आश्चर्याचे उत्तर मला मिळाले. असे कळले की ही डोळ्यातली चमक आणि भुवयांचा ताण म्हणजेच हा कवी! त्याचे बाकीचे शरीर, बऱ्याच प्रमाणात बाकीचे मन, आपल्यासारखे आहे, चारचौघांसारखे आहे; पण चमक आणि ताण यात खरे बोरकरपण आहे.

मला बिरबलाची गोष्ट आठवली. सत्ताविसातून नऊ वजा केले की बाकी शून्य उरते. तसे, व्यक्तीतून तिचे 'स्वत:पण' वजा केले की बाकी शून्य उरते. त्याची सामाजिकता म्हणजे ही बाकी असते. ती त्याची अपरिहार्य गरज असते; पण त्याचे मूल्य नसते. कारण, कोणतीही गरज, ती कितीही तीव्र असो केवळ गरज म्हणून मूल्य होऊ शकत नाही.

माझ्या विचाराचा ताळा असा येऊ लागला की, स्वत:चा स्वत:पणाशी संवाद हाच व्यक्तीच्या जगण्याचा अर्थपूर्ण आकृतिबंध असतो; पण हा ताळा मला चटकन मान्य करता येईना. हे व्यक्तिसापेक्ष मूल्य मान्य करायचे तर ते प्रतिगामीपणाचे होईल अशी भीती वाटली. अशा वेळी आपण सारे जे करतो ते मी मान्य केले. तो प्रश्नच मी 'तूर्त पुढे ढकलला'.

...बोरकरांचे भाषण संपले होते. त्यांच्या उधाणाचा या वेळचा आविष्कार संपला होता; पण आतले उधाण कायमच होते. धीम्या गतीने ते माझ्याकडे आले. नेहमीच्या


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

रुबाबात त्यानी माझ्या पाठीवर थाप मारली आणि विचारले, "काय ? कसा लागला होता सूर ?" मी काहीच बोललो नाही. त्याच्या उधाणाच्या अनुभवाने मी उत्तेजित झालो होतो हे त्याना माझ्या नजरेतून कळले असावे. शाब्दिक उत्तराची अपेक्षा त्यांनी केली नाही.

हे 'स्वत:पण' स्वत:ला नकळतही कसे सतत व्यक्त होत असते. वि. स. वाळिंबे याच्या 'हिटलर'वर शनिवारी संध्याकाळीच चर्चा झाली या चर्चेत हे 'स्वत पण' येण्याचे काही तसे कारण नव्हते. चर्चाही वस्तुनिष्ठ झाली. पण त्या चर्चेतील युक्तिवादातूनही हे स्वत.पण डोकावत होते.

एक युक्तिवाद असा केला गेला की ज्यूच्या छळवादाचे, हत्याकाडाचे खापर फक्त हिटलरच्या डोक्यावर फोडले जाते, हे बरोबर नव्हे. रशियासकट सारे यूरोपीय ख्रिश्चन आणि मुसलमान देश ज्यू जमातीच्या विरुद्ध होते. हिटलर हा काही अपवाद नव्हता तर तो सर्वसाधारण ज्यू-द्वेषवृत्तीचा एक प्रतिनिधी होता.

हा युक्तिवाद सरळ दिसतो, पटतोही. एकट्या हिटरला दोष देऊ नये हे म्हणणेही योग्य होते. हिटलर जे उघड उघड करीत होता, ते इतर राष्ट्रे लपून-लपवून करीत होती आणि ते अधिकच आक्षेपार्ह होते. हे सारे खरे; पण वक्त्यांच्या बोलण्यातून (कोण ते आता नेमके आठवत नाही) हिटलरवर काहीसा जास्त अन्याय झाला आहे अशी भावनात्मक खंत डोकावत होती

माझ्या मनात आले, हे याचे 'स्वत.पण' दिसते आहे. याच्या ऐन तरुण वयात कोणत्या ना कोणत्या पैलूने हिटलर याचा हीरो असला पाहिजे. असा कोणी एकदा हीरो वाटला की वाटणाऱ्याकरता तो नेहमीच हीरो असतो. त्या हीरोसाठी मनात एक कायमची खाच तयार होऊन राहते. "A hero is a hero at all times" या प्रसिद्ध वचनाचा असाही अर्थ घ्यावा असे मला नेहमी वाटते.

अशा खाचा 'स्वत:पणा'चा भाग बनत जातात. फोनोग्राफच्या तबकडीवरील खाचांसारख्या. या वक्त्याचे तसेच झालेले दिसत होते हिटलरवरील आक्षेपांचा डोंगर थोडा-जरी कमी झाला तर त्यांच्या 'स्वत.पणा'ला बरे वाटणार आहे, असे जाणवत होते. त्यामुळे त्याच्या युक्तिवादातले तथ्यही समजत होते आणि वेगळी गंमतही वाटत होती. असेही वाटले की अशी वेगळी गंमत वाटणे हे माझे 'स्वत:पण' असेल.

¤

दुसऱ्याच दिवशी, रविवारी, ग्रंथालीने घडवून आणलेल्या ह. वि. मोटचांच्या प्रकट मुलाखतीत मोटयाच्या 'स्वत.पणा'चे जे दर्शन झाले, ते, आमच्या एका स्नेह्याच्या आवडत्या शब्दात सांगायचे तर (खरोखरीच) 'विलोभनीय' होते.

मुलाखतीच्या जरा आधी मोटयानी मला बोलावून घेतले. ते म्हणाले, 'तुम्ही आलात यानं मला फार बरं वाटलं; पण मला काही चागलं बोलता यायचं नाही ७४ वर्षांच्या आयुष्यातली माझी ही पहिली जाहीर मुलाखत आहे.'

बोलताना मोटे अस्वस्थ होते, अधीर होते. बोलण्यात उत्कंठा होती. किती किती क्षेत्रात हिमतीने साहस करणारे आणि स्वत:च्या खास अटीवर उदंड यश मिळवणारे मोटे. मराठीत उत्कृष्ट प्रकाशनासाठी नुकतेच सुरू झालेले पहिले वि. पु भागवत-प्रकाशन-पारितोषिक त्याना मिळालेले. या निमित्ताने मोटयांबद्दलचे मन.पूर्वक कौतुक व्यक्त करण्याकरिता जमलेले निवडक शे-दोनशे चिकित्सक रसिक. त्यांच्या कौतुकाच्या नजरा मोटयावर खिळलेल्या आणि बहुधा या साऱ्या प्रकट होणाऱ्या कौतुकानेच अस्वस्थ झालेले मोटे-अगदी गोंधळलेल्या लहान मुलासारखे लोभस दिसत होते.

पण मुलाखतीसाठी मंचावर बसले मात्र, हरिभाऊ बदलले, अवघ्या दहा मिनिटात बदलले. मुलाखत घेणारे रामदास भटकळ व अनंत भावे याना त्यांनी जवळजवळ काही काम शिल्लक ठेवले नाही. त्यानी स्वत.च माइकचा ताबा घेतला, प्रेक्षकाना प्रश्न विचारून त्याचाही ताबा घेतला. पहिलीच मुलाखत असल्याने व सवय नसल्याने, नीट बोलता येत नाही म्हणून अ. गं मंगरूळकर अन् वामनराव देशपांडे यांची खास कुमक घेऊन आलो आहे हेही त्यानी आम्हाला सागितले. आम्हाला त्यांनी घरगुती विश्वासाच्या वातावरणात नेले. गप्पा मारताना आमच्याशी अन् स्वत.शीही, खूप मस्ती केली आणि 'शाब्बास पठ्ठे' असे आम्ही म्हणावे इतपत आम्हा सर्वांना जिंकले.

हरिभाऊंचे विचार, त्यांची तत्त्वे साऱ्यांना पटली असे नव्हे. हरिभाऊंनी स्वत.च, 'उदाहरण म्हणून माझ्या जीवनक्रमाकडे बघू नका' असा इशारा वारंवार दिला. आम्हाला साऱ्यांना आवडले, ते त्यांच्या असण्या-बसण्यात, बोलण्यात, कमी-अधिक होता होता मध्येच गुरकावणाऱ्या त्यांच्या आवाजात, माइकमुळे त्यांची होत असलेली अडचण श्रोत्यांना पुन्हा पुन्हा सांगण्यात, निरनिराळी नावे घेऊन, ती नावे हजर आहेत की नाहीत याची खात्री करून घेण्यात आणि त्याना डिवचण्यात-अशा साऱ्या विभ्रमात जे आपोआप व्यक्त होत होते ते खास 'हरिभाऊपण !'

तशा हरिभाऊंनी स्वत.च्या अनेक खुब्या सागितल्या. 'सर्वमंगल क्षिप्रे'मध्ये आपण त्या वाचल्याही आहेत पन्नास वर्षांत तेहतीस निवडक प्रकाशने, 'प्रतिभे'चे तीन वर्षे सपादन, अभ्यासह चित्रपटक्षेत्रात केलेल्या उलाढाली, वडिलांचा अन् स्वत:चा अशा एकूण पैशाशी केलेला जुगारी खेळ, नवा लेखक शोधणे, असा लेखक सापडला की हरप्रयत्नानी त्याला जिंकून आपलासा करण्याची शिकारी कुशलता-असे सारे त्यांनी स्वतःच सागितले. 'मनाच्या जखमा साहित्याने निवतात. म्हणून पुन्हा पुन्हा साहित्याकडे परतून आलो,' असा मनाचा गाभाही खुला केला. 'ह्या नव्या पोरानी मला बोलते केले आहे अन् नवीन साहित्य-प्रवृत्ती चागल्या आहेत-पण मला 'आता त्यात रस नाही' अशी स्वत च्या 'कदाचित कालबाह्यते'ची कबुलीही दिली.

पण मला आणि मला वाटते साऱ्याना जाणवत होते, आवडत होते, मनात खोल डसत होते, ते हरिभाऊंच्या 'स्वत.पणा'चे उधाण! जवळजवळ दोन तास आणि नंतरही त्या उधाणाने आम्हाला भारून टाकले होते.

¤

वृद्धानी कसे जगावे अशी पृच्छा गेल्या मीमासेत केली होती. बोरकर आणि हरिभाऊ यानी एक उत्तर दिले. स्वत:पणाचे उधाण कायम राखून, वृद्ध न होता जगावे हे त्याचे उत्तर होते.

□

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ चौधरी चरणसिंग यांचे लोकदल

केवळ ताकदीचा आणि राजकीय सामर्थ्याचा विचार करायचा झाला तर चौधरी चरणसिंग यांचे लोकदल हा एक अजूनही बऱ्यापैकी ताकद असलेला राजकीय पक्ष आहे. उत्तर प्रदेश, बिहार, हरयाना, हिमाचल प्रदेश आदी भागामध्ये पक्षाची ताकद चांगल्यापैकी आहे. या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या आमदार–खासदारांची संख्याही तशी काही कमी नाही. बंडखोरीबद्दल प्रसिद्ध असलेल्या अनेक बडया नेत्याचा या पक्षामध्ये समावेश आहे. जॉर्ज फर्नांडिस, मधू लिमये यासारखी मंडळी या पक्षाच्या वळचणीला उभी आहेत आणि असे असले तरी इंदिरा कॉंग्रेस हा पक्ष जसा इंदिराजीचा आहे त्याचप्रमाणे लोकदल हे सर्वस्वी चौधरी चरणसिंग यांच्या मालकीचे आहे. अनेक गमती–जमती करून आपल्या पक्षावरील मालकी हक्क ते सिद्ध करत असतात. परवा अचानक त्यांना विरक्तीचा झटका आला ! एक फतवा काढून त्यांनी आपण क्रियाशील राजकारणातून निवृत्त होत असल्याचे घोषित करून टाकले. राजकीय वातावरणावरील त्यांचे भाष्य आणि त्याचा हा निर्णय याना शासननियंत्रित आकाशवाणी–दूरदर्शनपासून सर्वत्र प्रसिद्धी मिळाली. अर्थात अशी निवृत्ती घोषित केली तरी आपण लोकसभेमधील आपली जागा सोडणार नाही हे पण चौधरींनी स्पष्ट केले होते. एकदा जागा सोडली की, पुन्हा आत येणे किती तापदायक आहे हे बहुधा गढवाल पोटनिवडणुकीची वाट पहात बसणाऱ्या बहुगुणांवरून त्यांना चांगले उमगले असावे. भारतीय जनतेसाठी आवश्यक वाटणारी जनसेवेची कामे करण्यासाठी, तसेच आर्थिक विषयावरील ग्रंथलेखनासाठी आपण आपले उर्वरित आयुष्य खर्ची घालू असेही चौधरींनी सागून टाकले. विरोधी पक्षामधील या एवढया मोठ्या नेत्याने निवृत्तीची घोषणा केली; पण त्यावर कोणाही जबाबदार नेत्याने कसल्याही प्रतिक्रिया दिल्या नाहीत. निवृत्तीची घोषणा होऊन दोन दिवस होताच हजार–पाचशे चमचे मंडळी चौधरींच्या बंगल्याबाहेर गोळा झाली. आणीबाणीच्या काळात इंदिराजी जसे बंगल्यावर येणाऱ्या या मंडळीना सामोरे जाऊन भाषणे ठोकत त्याप्रमाणे जमा झालेल्या या जमावासमोर चौधरी चरणसिंग यांनी आपले मनोगत व्यक्त केले. काही कार्यकर्त्यांनी चौधरी चरणसिंग यांच्यासारख्या नेत्याची राजकारणाला किती नितांत गरज आहे हे तपशीलवार सांगितले. मग पक्षाच्याच काही मूठभर नेत्यांनी चौधरींच्या नावाने थोडाफार गिल्ला केला आणि राष्ट्राचे भले व्हावे या उदात्त हेतूने अल्पकाळ का होईना; पण पंतप्रधानपद उपभोगणाऱ्या या थोर नेत्याने पुन्हा एकदा क्रियाशील राजकारणात उडी घेतली. आता उडी मारण्याची त्यांची उमर राहिली नसल्याने त्यांनी क्रियाशील राजकारणामध्ये पुन्हा प्रवेश केला असे आपण म्हणू ! चरणसिंग यांच्या अशा या तळयात–मळयात पद्धतीच्या व्यक्तिगत हालचाली चालू असताना पक्षीय पातळीवर पुन्हा एकदा आघाडीचे प्रयत्न सुरू झाले होते. शरद कॉंग्रेस, जनता आणि लोकदल यांच्या या प्रयत्नाला प्रारंभी चौधरीचे आशीर्वाद होते. त्यांचे नेतृत्व मान्य करणारी कोणतीही आघाडी त्यांना मंजूर होती; परंतु जनता, शरद कॉंग्रेस व लोकदल एकत्र येण्याच्या या प्रक्रियेमध्ये आपल्या नेतृत्वाची आहुती पडण्याची शक्यता आहे हे लक्षात येताच त्यांनी या हालचालीना सुरुंग लावला. दरम्यान या पक्षांच्या वतीने चंदीगढ येथे एक अधिवेशन बोलावण्यात आले होते. चौधरीचा विरोध असूनही लोकदलाच्या काही ज्येष्ठ नेत्याचा या आघाडी–प्रयत्नाला पाठिंबा होता. आपला विरोध असूनही काही मंडळी लोकदलाला आघाडीच्या दावणीला नेऊन बांधत आहेत हे लक्षात येताच लोकदलाचे मालक चौधरी चरणसिंग संतप्त झाले. त्यानी देवीलाल, बिजू पटनायक आणि कुंभाराम आर्य या तीन नेत्याना पक्षातून काढून टाकले. लोकदलामध्ये फूट पडली आणि लोकदलाचा हा फुटीर गट, शरद कॉंग्रेसचा असाच एक फुटीर गट व चंद्रशेखर याच्या नेतृत्वाखालील ओरिजिनल जनता पक्ष याचे काही साटे-लोटे होणार असे वाटत असतानाच काही सेवक मंडळींनी चौधरीबरोबर चर्चा वगैरे केली. त्यामध्ये कर्पुरी ठाकूर, जॉर्ज फर्नांडिस, प्रकाशसिंग बादल आणि केव्हाही शरद कॉंग्रेसला रामराम ठोकण्याच्या मूडमध्ये असलेले देवराज अर्स यांचा समावेश होता. चर्चेनंतर मालकानी पुन्हा आपल्या निर्णयाचा विचार केला आणि ज्याची पक्षातून हकालपट्टी केली होती त्या सर्व मंडळीना पुन्हा एकदा पक्षात सामावून घेतले. लोकदलाच्या व्यासपीठाचा असा मनमानी वापर करणारे हे चौधरी चरणसिंग, इंदिराजीच्या हुकूमशाही विरुद्ध टीका करतात आणि भारतात जर थोडी-फार लोकशाही तग धरून असेल तर ती आपल्यामुळेच, असा टेंभा मिरवतात ! आता एवढे सगळे रामायण झाले तरी चौधरी चरणसिंग आणि त्यांचे लोकदल यांचे सहकार्य मिळाले तर ते सर्वांनाच हवे आहे. उत्तर हिंदुस्थानातील मोठ्या भागामधील मते खेचण्याची शक्ती त्यांच्याजवळ आहे. सबब, आपल्याबरोबर आले तर चौधरी सर्वांनाच हवे आहेत. विरोधी पक्षाची कोणतीही आघाडी उभी करायची असली तर त्याचे नेतृत्व केवळ चौधरीच करू शकतात, असा शरद कॉंग्रेसच्या देवराज अर्स यांचा विचार असल्याने आपला पक्ष काही वेगळा विचार करतो आहे हे लक्षात येताच देवराजजी चक्क पक्ष सोडण्याच्या मूडमध्ये आहेत. लोकदलामधील अलीकडील हालचाली पाहिल्या की, पक्षीय राजकारण किती उथळ आणि व्यक्तिसापेक्ष झाले आहे, याची कल्पना येते. असे असले तरी निवडणुकीच्या नौबती झडू लागल्यावर राजकीय डावपेचाची आखणी सर्वांनाच करावी लागते. काल हाकललेल्या नेत्यांना आज पक्षामध्ये प्रवेश देणारा निर्णय कितीही हास्यास्पद वाटत असला तरी तो निर्णय अशाच राजकीय डावपेचांचाच एक भाग आहे. चौधरींनी लोकदलामध्ये स्वतःच फूट पाडली आणि ती लगोलग सांधूनही घेतल्याने जनता, शरद कॉंग्रेस आणि लोकदलामधील एक गट यांच्या आघाडीला सुरुंग लागला आहे, हरियाना व हिमाचल प्रदेश या दोन राज्यामध्ये आता लोकदल आणि भाजप यांच्यामध्ये सामंजस्य होण्याचा संभव आहे आणि लोकदलाच्या

व्यासपीठावर एकत्र आलेली जॉर्ज फर्नांडीस, मधू लिमये आदी मंडळीची मोठी फौज या लोकदल–भाजप युतीचा पुरस्कार करून मताच्या गोण्या खेचणार आहे. लोकदलाचे सहाय्य मिळाले तर ते हवेच असल्याने भाजपचे लोकदलाबाबतचे धोरण नेहमीच बोटचेपे राहिले आहे. अनेक ज्येष्ठ नेत्यांची टिंगलटवाळी करणारे, त्यानी केलेल्या पक्ष बदलाबद्दल ताशेरे झाडणारे भाजपचे नेते लोकदलाचे चौधरी चरणसिंग यांच्याबाबत मात्र एकदम नरमाईचे धोरण स्वीकारून आहेत. चौधरीच्या सामर्थ्याचा वापर करून स्वतःच्या पक्षाची ताकद वाढवता आली तर ती त्यांना हवी आहे. लोकदलामधील या अकस्मिक घटनांनी आघाडीची स्वप्ने पहाणारे जनता पक्षाचे व शरद कॉंग्रेसचे नेते आश्चर्यचकित झाले आहेत. भाजपशी सूत जमण्यासारखे नाही. स्वतःजवळ पुरेशी ताकद नाही. आणि ज्याच्याबरोबर हातमिळवणी करावी असा मित्र उपलब्ध नसल्याने निवडणुकीला कसे सामोरे जायचे, हा त्याच्या समोर प्रश्नच आहे. प. बंगालमध्ये प्रबळ डाव्या आघाडीविरुद्ध टक्कर देण्यासाठी इंदिरा कॉंग्रेसबरोबर आघाडी करणे आणि हरियाना, हिमाचल प्रदेशमध्ये स्वतःची पुरेशी ताकद नसल्याने बघ्याची भूमिका घेणे, यापलीकडे हे पक्ष काही करू शकत नाहीत. चौधरी चरणसिंग यांची राजकारणनिवृत्ती ही औटघटकेची घोषणा ठरल्याने आणि स्वतःच पाडलेली फूट चौधरींनी लगोलग सांधून घेतल्याने चंडीगढमधील आघाडी प्रयत्नांना मोठा तडा गेला असून लोकदल–भाजप युतीला ही बदललेली परिस्थिती अनुकूल ठरणार आहे.

## □ गोकाक समिती अहवालावरून उठलेले वादळ

प्रादेशिक भावनेला फुंकर घातली गेली की, कसा आगडोंब उसळतो याचे ताजे उदारण म्हणून कन्नड भाषेच्या वापराबाबत गोकाक समितीने जो अहवाल दिला आहे त्यावरून कर्नाटकमध्ये उठलेल्या वादाळाचा उल्लेख करता येईल. गोकाक समिती नेमली त्या वेळी या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी केली जाईल असे सुस्पष्ट आश्वासन कर्नाटक शासनाने दिले होते. या समितीने संपूर्ण प्रादेशिक दृष्टिकोन स्वीकारून देशाच्या एकात्मतेला तडा जाईल अशा अनेक शिफारसी केल्या. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत दिरंगाई होऊ लागताच वातावरण तापू लागले. मातृभाषेची थोरवी गाण्यात आली आणि समितीचा अहवाल जसाच्या तसा अंमलात आणला जावा यासाठी चळवळ उभी करण्यात आली. हे निमित्त साधून कन्नड चित्रसृष्टीमधील ज्येष्ठ अभिनेता राजकुमार याने या आंदोलनात उडी घेतली. केवळ राजकुमार नव्हे तर त्याच्या नेतृत्वाखाली कन्नड चित्रपटव्यावसायिकांनीही या आंदोलनाला उचलून धरले. उपोषणाच्या फेऱ्या झडल्या. गोकाक समितीचा अहवाल शासनाने जसाच्या तसा स्वीकारावा अशी मागणी करण्यासाठी बंगलोरमध्ये एक मोठा मोर्चा निघाला. आजवर राजकारणापासून दूर असलेला अभिनेता राजकुमार याने या मिरवणुकीचे नेतृत्व केले. घटना इतक्या झपाट्याने घडल्या की, आधीच अकार्यक्षम असलेले शासन पूर्णपणे गांगरून गेले ! द. भारतामधील चारही राज्यांतील चित्रसृष्टीमधील मान्यवर अभिनेते राजकीय, सामाजिक चळवळीमध्ये उतरलेले दिसतात. केरळमध्ये प्रेम नझिर क्रियाशील राजकारणात उतरला आहे. तामिळनाडूच्या राजकारणावर एम्. जी. रामचंद्रन या अभिनेत्याची हुकमत आहे आध्रमध्ये एन. टी. रामराव याच्या नवीन प्रादेशिक पक्षाने जोरदार उभारी घेतली आहे. आपण राजकारणापासून दूर राहू असे काल–परवापर्यंत म्हणणाऱ्या राजकुमाराने कन्नड भाषेच्या पुरस्कारासाठी जी वावटळ उठवण्यात आली आहे त्या वावटळीत उडी घेतली आहे. त्याची आजचीभाषा पहाता तो लवकरच राजकीय–सामाजिक व्यासपीठावर उभा राहील असे वाटते. गेल्या सप्ताहामध्ये बंगलोरमधील मेळाव्यानंतर झालेल्या सभेमध्ये त्याने जोरदार भाषण ठोकले. आपल्या भाषणात तो म्हणाला, 'कन्नड भाषा आणि कर्नाटकामधील प्रजा याचे नाते माय–लेकराचे आहे. कर्नाटकामध्ये कन्नडभाषा अग्रक्रमाने सन्मानित झाली तर तो तमाम कन्नडियाच्या भावनेचा गौरव मानावा लागेल. कन्नडभाषा ही शासकीय व्यवहाराची भाषा झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे !' असे सांगून हा फिल्मी सितारा म्हणतो, 'माझ्या कन्नड बाधवांनो, मला राजकीय महत्त्वाकांक्षा नाही. केवळ मातृभाषेवरील प्रेमापोटीच मी या आंदोलनामध्ये उतरलो आहे. कन्नड भाषेच्या पुरस्कारासाठी जी मंडळी उपोषणास बसली आहेत त्याचा मला अभिमान वाटतो ! शासनाने गोकाक समितीचा अहवालाची अंमलबजावणी केली नाही तर मलाही उपोषणाचा मार्ग स्वीकाराबा लागेल ! कन्नडभाषेच्या न्याय्य स्थानासाठी छेडल्या गेलेल्या या आंदोलनासाठी मी माझे सर्वस्व पणाला लावीन !' अशा मेळाव्यानंतर भावनिक उद्रेग होऊन जमावाकडून दंगली होतात. बंगलोरमध्येही नेमका हाच प्रकार पहावयास मिळाला. राजकुमारच्या भाषणानंतर परतणाऱ्या जमावाने दगडफेक करून किमान ३० इमारतीची नासधूस केली आणि पाच–पन्नास वाहनांना आगी लावल्या ! जे बंगलोरमध्ये घडले त्याचे पडसाद राज्यामध्ये अनेक ठिकाणी उमटले. त्यातच राजकुमारला अटक झाल्याची आवई उठली. प्रत्यक्षात केवळ त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याला पोलीसव्हॅनमधून नेण्यात आले; पण त्याबाबतची खरी परिस्थिती न समजल्याने जमाव संतप्त झाला आणि जाळपोळीला व दंग्याला प्रारभ झाला. गोकाक समितीने केलेल्या शिफारशींची अमलबजावणी करण्यासाठी छेडल्या

गेलेल्या या आंदोलनाला विरोध करण्यासाठी एक प्रति–आंदोलन उभारण्यात आल्याने या दोन गटांमध्ये चकमकी उडू लागल्या.

गोष्टी अगदी पराकोटीला पोचल्याखेरीज कोणत्याही गोष्टीवर निर्णय घ्यायचा नाही, असा जो शासकीय कारभाराचा खाक्या असतो त्याची प्रचीती या गोकाक समिती अहवालाबाबतही पहावयास मिळाली. आता या बाबतचा निर्णय अधिक लांबणीवर टाकता येणार नाही, अशी खात्री पटल्यावरच राज्यशासनाने या अहवालाबाबत काही निर्णय घेतले. १९ एप्रिल रोजी घेतल्या गेलेल्या या निर्णयाप्रमाणे कर्नाटक शासनाने गोकाक समितीच्या अहवालामध्ये काही सुधारणा करून व या समितीने केलेल्या काही शिफारशी नाकारून याबाबत अखेरचे निर्णय घेतले आहेत. त्या निर्णयाप्रमाणे समितीची कन्नड ही राज्यामधील एकमेव संपर्कभाषा असावी, ही शिफारस फेटाळून लावण्यात आली आहे. मात्र कन्नड भाषिक नसलेल्या परंतु कर्नाटकमध्ये वास्तव्य असलेल्या इतर भाषिक मंडळींच्या मुलांना कन्नड भाषा सक्तीची करण्यात आली आहे. तीन भाषांचा एक गट करण्यात आला असून या गटामध्ये कानडी किंवा मातृभाषेखेरीज मराठी, इंग्रजी, संस्कृत, अरेबिक, पर्शियन यांपैकी एक भाषा विद्यार्थ्यांना शिकावी लागेल. कर्नाटकमध्ये एस. एस. सी. ला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला कानडी भाषेचा शंभर गुणांचा एक पेपर द्यावाच लागेल. या निर्णयामुळे सर्वांचे समाधान होईल, अशी राज्याच्या मुख्यमंत्र्यांची अपेक्षा असून गोकाक समिती अहवालावरून जी आंदोलने छेडली गेली होती ती थंडावतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. कानडी भाषा पहिल्या वा दुसऱ्या गटात स्वीकारावी लागणार असल्याने कानडी शिकवणाऱ्या शिक्षकांची गरज निर्माण झाली असून कानडी माध्यम नसलेल्या शाळांतून अशा शिक्षकांची त्वरित नेमणूक करण्याचे आदेश कर्नाटक शासनाने दिले आहेत. कन्नड भाषा शिकण्याची सक्ती अल्पसंख्यांकांवर करण्यात आली असल्याने कर्नाटकमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाला कानडी लिहिता-बोलता आलेच पाहिजे, अशी आंदोलकांची जी प्रमुख मागणी होती ती मान्य करण्यात आली आहे. संस्कृतचे महत्त्व बरेच कमी करण्यात आले असून मातृभाषेच्या गटामध्ये ज्या अकरा भाषांना मान्यता देण्यात आली आहे त्यामधून संस्कृतला वगळण्यात आले आहे.


**मी आलेयू 'मिंटी', अेक खारोटी**

स्वभाव माझा जागरूक,
वृत्ती माझी संचयी,
चालणे माझे चपळ,
वागणूक माझी निगर्वी,
सेतू बंधनात आपला वाटा उचलून
रामाचा आशीर्वाद मिळवलेली
आजहि थोरांमोठ्यांचे
आशीर्वाद असेच आहेत पाठीशी,
माझं घर होतं दूर रानांत
झाडांच्या ढोलींत—
आता मात्र माझं घर खेड्यात, शहरात
महाबँकेच्या शेकडो शाखांत.

मी आलेय 'मिंटी' मी म्हणजे महाबँक



**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी: "लोकमंगल" शिवाजीनगर
पुणे-४११ ००५

R.A.ADVTG.

कानडी साहित्य परिषदेने शासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. या परिषदेचे अध्यक्ष श्री. एच. नागराज यांनी शासनाने कानडी भाषेला योग्य स्थान दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. अशाच स्वरूपाची प्रतिक्रिया राज्य साहित्य समितीचे अध्यक्ष डॉ. एच. एम. नायक यांनी व्यक्त केली आहे. गोकाक समितीच्या शिफारसीमधील अतिरेकीपणाला फाटा देऊन कानडी भाषेला योग्य तो न्याय मिळाल्याची भावना आंदोलकामध्ये असली तरी अल्पसंख्याकावर कानडी शिकण्याची जी सक्ती करण्यात आली आहे त्याचे पडसाद इतर राज्यात उमटल्यावाचून रहाणार नाहीत. अर्थात गोकाक समितीच्या शिफारशीवरून वातावरण एवढे तापले होते की, त्वरित निर्णय घेतले गेले नसते तर यापेक्षा मोठा आगडोंब उसळला असता. अतिरेकी मंडळीही आता थोडा-फार समजूतदारपणा दाखवून वातावरण निवळण्यासाठी हातभार लावतील, अशी अपेक्षा आहे. घेतले गेले हे निर्णय जर वेळीच घेतले गेले असते तर या अहवालाच्या अंमलबजावणीमुळे जो गोंधळ उडाला तो उडाला नसता. शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे आता वातावरण निवळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. राजकीय महत्त्वाकांक्षा नसल्याचे सांगून या कानडी भाषिकांच्या व्यासपीठावर उभा राहिलेला लोकप्रिय कानडी अभिनेता आता पुन्हा तोंडाला रंग लावून या क्षेत्रातून कायमचा बाजूला होतो, की काही ना काही काढून आपली वाटचाल चालू ठेवतो, हे आता पहायचे.

## ❑ केंद्रीय मंत्र्यांना वेतनवाढ

महागाई चाळीस रुपयांनी वाढली की केन्द्रीय कर्मचाऱ्याना वीस रुपयानी महागाई भत्ता वाढवून मिळतो. बँक कर्मचाऱ्यांइतके किंवा आयुर्विमा कर्मचाऱ्याइतके त्याचे लाड होत नसले तरी वाढत्या महागाईला तोंड देण्यास हातभार लागावा इतपत सहाय्य या महागाई भत्याच्या हप्त्यांच्या रुपाने देण्यात येते. अगदी अलिकडेच महागाई भत्याचे चार हप्ते केन्द्रीय कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यात आले. त्याच वेळी ज्येष्ठ अधिकारी, लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांना एकरकमी पंधराशे रुपयाचा वाढीव भत्ता देण्यात आला. या वाढीमुळे केन्द्रीय मंत्रालयाच्या सचिवाचे मासिक वेतन दरमहा पाच हजार रुपयांपर्यंत वाढले. हे सचिव ज्या मंत्र्यांकडे काम करतात त्याचे वेतन मात्र दोन हजार सातशे पन्नास रुपये आहे. वाढती महागाई जशी इतरांना भासते तशीच ती मंत्र्यांनाही भासत असल्याने मंत्र्याच्या वेतनातही लक्षणीय सुधारणा करण्यात येत असून कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याचे वेतन पाच हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात येणार आहे. आज मंत्र्यांना प्रत्यक्षात पगार कमी असला तरी बहुविध सुविधा त्यांना उपलब्ध असतात. त्यामध्ये फर्निचरसह बंगला, टेलिफोन व शासकीय वाहन या सुविधा असतात. खेरीज, प्रत्येक मंत्र्याच्या घराचा काही भाग हा कचेरीसारखा समजला जात असल्याने त्या भागाची देखभाल करण्यासाठी वेगळा कर्मचारी वर्ग असतो. मंत्र्यांचे देशांतर्गत दौरे स्वयंनिर्णित असतात आणि या दौऱ्याच्या वेळी त्यांना मोठा भत्ता मिळतो. या अप्रत्यक्ष फायद्याचे पैशामध्ये मोल करायचे झाले तर कॅबिनेटस्तरीय मंत्र्यांवर सरासरी महिना १५ हजार रुपये खर्ची पडतात. वेतनामधील वाढ लक्षात घेतली तर ही रक्कम वीस हजार रुपयावर जाईल. राज्यस्तरीय पातळीवरील मंत्री स्वतंत्रपणे आपले खाते सांभाळत असला तर त्याला कॅबिनेट मंत्र्याएवढाच पगार मिळतो. हा मंत्री जर कॅबिनेट मंत्र्याच्या हाताखाली काम करत असेल तर त्याला ५०० रुपये कमी मिळतात. उपमंत्र्याचे वेतन हे सहाय्यक सचिवाइतके म्हणजे केवळ १,७५० रुपये असते. अर्थात त्यानाही मंत्र्यांना मिळणाऱ्या अन्य सर्व सुविधा उपलब्ध असतात. त्याचे देशातर्गत दौरे हे सबंधित मंत्र्याच्या पूर्वसंमतीने आखले जातात. उपमंत्र्यानी आपल्या खात्याच्या मंत्र्याकडे दौऱ्याबाबत विचारणा केली तर सर्वसाधारणपणे नकार मिळत नाही. केवळ वेतनाचा विचार करायचा झाला तर केन्द्रीय मंत्र्याचे वेतन साधारणपणे १९६० च्या किंमत निर्देशांकाशी मिळतेजुळते असल्याने त्यामध्ये वाढ होणे अपरिहार्य आहे. विशेषतः, उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्याना वेतनवाढ दिल्यावर हे तीव्रतेने जाणवू लागले असून या वेतनवाढीचा तपशील अर्थमंत्रालयामध्ये निश्चित केला जात आहे. या वेतनाच्या संदर्भात अलिकडेच एक मजेशीर उदाहरण आढळून आले आहे. सायन्स व टेक्नॉलॉजी विभागाचे सचिव श्री. जी. के. मेनन याची अलिकडेच नियोजन मंडळाचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. श्री. मेनन यांचा हा एक प्रकारे गौरव असला तरी या नेमणुकीमुळे त्याना मोठी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. नियोजन मंडळाच्या सदस्याना राज्यस्तरीय मंत्र्याचा दर्जा असल्याने त्याचे वेतनही या मंत्र्यांइतकेच असते. श्री मेनन यांना आता हे वेतन स्वीकारावे लागत असल्याने त्यांचे वेतन सुमारे ५ हजारवरून २ हजार २५० रुपयापर्यंत खाली घसरले आहे. पण त्यांचा दर्जा मात्र केन्द्रीय सचिवापेक्षा उजवा आहे. सर्वसाधारणपणे नेमणुका व बदल्यांच्या वेळी आधीच्या जागेवरील अखेरचे वेतन संरक्षित समजण्यात येते. परंतु नियोजन आयोग सदस्य ही राजकीय नेमणूक असल्याने सेवकाला मिळणारे वेतनाबाबतचे संरक्षण या नेमणुकीच्या संदर्भात मिळू शकत नाही. परिणामी, दर्जा सुधारुनही श्री. मेनन यांना आपल्या सचिव म्हणून असलेल्या पगाराच्या निम्मेच वेतन स्विकारावे लागत आहे. अर्थमंत्रालयाकडे त्यांनी याबाबत विचारणा केली असता त्याच्या बाबतीत अपवाद करणे शक्य नाही, असे त्यांना कळवण्यात आले आहे. मात्र त्याचबरोबर नियोजन मंडळ सदस्याचे वेतन २,२५० वरुन ५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा शासनाचा विचार आहे. केन्द्रीय मंत्र्याच्या वेतनवाढीला लोकसभेकडून मंजुरी मिळताच नियोजन मंडळ सदस्यांच्या वेतनातही आपोआप वाढ होईल. या नियोजित वाढीचे समर्थन करता आले नाही तरी अशी वाढ दिली तर त्यावर फार मोठी टीका करण्यासारखे काही आहे, असेही नाही वेतनवाढीच्या या सुखद वर्षावाची अनेक मंत्रीगण वाट पहात आहेत. आपले निर्णय सचिवानी निर्भीडपणे नोंदवावे या पंतप्रधानाच्या आदेशाबरोबरच लक्षणीय वेतनवाढही पदरात पडल्याने सचिव आणि ज्येष्ठ अधिकारी झटून काम करत असून शासकीय कार्यक्षमतेवर त्याचा अनुकूल परिणाम झाला असल्याचे दिसून येते. ❑

श्यामचा संसार (कथा ३३ वी)

फिरोझ रानडे

# ओमानमधला २ ऑक्टोबर

ओमानमधल्या हिंदी वकिलातीचे सभागृह अगदी तुडुंब भरले होते. पुढले सोफा-सेटस् व मागल्या खुर्च्या वगैरे तर भरल्या होत्याच; पण बाजूचे दोन्ही जाण्यायेण्याचे मार्ग पण भरले होते. बरोबर ६ वाजता हिंदुस्थानचे ओमानमधले वकील पांढरा शुभ्र जोधपुरी घालून व तेव्हढीच पांढरी-शुभ्र तुमान चढवून व त्या दोघाइतकीच पांढरीशुभ्र गांधी टोपी चढवून मंचकावर आले. त्याच्याबरोबर वकिलीणबाई होत्या. त्यांचे रंगी-बेरंगी पातळ होते, चेहरा पण रंगी-बेरंगी होता. त्यांचे एक रंगी होते ते फक्त बॉब केलेले व डाय केलेले केस ! वकिलांच्या पोषाखाच्या बाबतीत सरकारी नियम धारा आहेत. पण वकिलीणबाई कोणताही पोषाख घालून येऊ शकतात. नाही तरी त्यांचा व गाधीचा-म्हणजे महात्मा गांधीचा हो. अर्थाअर्थी काय संबंध आहे ? असो.

बरोबर ६ वाजून ५ मिनिटानी वकील-साहेब बोलायला उठले व हातातले रंगीत कागद वाचू लागले. 'आज आपण राष्ट्रपिता महात्मा गाधीचा जन्मदिवस साजरा करण्याकरता जमलो आहोत. महात्मा गांधी-बद्दल मी काही सागावे असे नाही. गरिबांकरता त्यानी केलेले कष्ट, हरिजनाकरता त्यानी केलेले प्रयत्न हे सर्वांना माहीत आहेतच; पण महात्मा गांधीचे सर्वांत मोठे कार्य म्हणजे देशाला त्यानी रक्ताचा एकही थेंब न सांडू देता स्वातंत्र्य मिळवून दिले हे होय ! ... भाषण संपल्यावर टाळ्याचा मोठा कडकडाट झाला.

सभा संपताच वकील व वकिलीणबाई तातडीने निघून गेले. कारण त्याना कोणाकडे तरी कॉकटेल पार्टी होती म्हणे.

लेखाचा मथळा व वरचा मजकूर वाचून मस्कतमधल्या गांधी-जयंतीचे हे वर्णन असावे असा कोणाचाही समज होईल; पण मस्कतला दोन ऑक्टोबरला जर गांधी-जयन्ती साजरी झाली असती तर असे वर्णन झाले असते, ह्याची वाचकांना कल्पना यावी म्हणून फक्त वरचे वानगीदाखल वर्णन दिले आहे.

३० सप्टेम्बरला काही कामाकरता म्हणून श्यामवर हिंदी वकिलातीत जाण्याचा प्रसंग आला. ओमानला आल्यापासून तो प्रथमच तेथे जात होता. साधारण सकाळी ९।।–१० च्या सुमाराला तो व त्याचा रामचंद्रन नावाचा मद्रासी सहकारी वकिलातीच्या इमारतीजवळ पोहोचले. येथली वकिलात फार मोठी नसल्यामुळे एका ४ गाळे असलेल्या दुमजली इमारतीत वकिलात स्थापन केली आहे. इमारतीच्या प्रागणात गेल्यावर त्यांच्या दृष्टीला दोन प्रवेशद्वारे दिसली. एक डाव्या बाजूचे व एक उजव्या बाजूचे.

आता उजव्यात जावे की डाव्यात ? असा प्रश्न त्या दोघाना पडला. डाव्यापेक्षा उजवे बरे म्हणून ते उजव्या प्रवेशद्वाराने आत गेले. एखाद्या गाळ्याची बाहेरची बसावयाची खोली जेव्हढी मोठी असते तेव्हढी ही होती. खोलीत एक अत्यंत मळखाऊ जाजम टाकले होते. समोरच्या भिंतीवर मध्यभागी संजीव रेड्डीचे छायाचित्र होते, व डाव्या बाजूला म्हटले तर विलायती अभिनेत्री वाटावी असे इंदिराजीचे छायाचित्र होते. राष्ट्रपती व पंतप्रधान ह्यांच्या दर्जात व अधिकारात फार फरक आहे हे दोघा छायाचित्राच्या आकारावरून, त्यांच्या लाकडी चौकटीवरून हळुवारपणे सूचित केले होते.

त्या खोलीत एक लाकडी कट्टा होता. तेथे व्हिसा मिळवण्याकरता फॉर्मस् देणारा माणूस बसला होता. उजव्या बाजूला चौकशी नावाची खिडकी होती. हिन्दुस्थानच्या पद्धतीप्रमाणे चौकशी खिडकीच्या मागे कोणी नव्हते, मग तिथली व्यक्ती कुठे आहे ह्याची प्रथम चौकशी करायला लागली. मग कळले की श्यामला त्याच्या कामाकरता स्वागत कक्षात जावे लागेल व ते डाव्या बाजूच्या प्रवेशद्वारी आहे. शाम मनाशी म्हणाला, मला वाटलंच होतं. आम्ही उजवे निवडा डावे निवडा--काही झाले तरी चुकीचे निवडतो एवढे खरे !

मग ते श्याम व राम डाव्या बाजूच्या प्रवेश-द्वाराने आत गेले. येथे १५–२० हिंदी व ओमानी लोकाची गर्दी होती. खाली काश्मिरी पण जाजमाइतके मळखाऊ कारपेट टाकले होते. भिंतीला टेकून १०–१२ पोलादी घडीच्या खुर्च्या होत्या. मध्यभागी एक मोठे चौकोनी मेज होते. त्यावर अगणित व अगणित जुनी वर्तमानपत्रे व मासिके पडली होती. भिंतीवर आग्र्याच्या ताजमहाला-पासून तो मुंबईच्या 'ताजमहाला'पर्यंत विविध व असबद्ध इमारतीची छायाचित्रे असंबद्धपणे लागली होती.

उजव्या बाजूच्या एका कोपऱ्यात एका अतिशय भिकार टेबलावर एक उंच व स्मार्ट सरदारजी स्वागताचे काम करत होता. त्याचे टेबल हिन्दी माणसाप्रमाणे ठीक होते; पण गेल्या २।।–३ महिन्यात श्यामला ओमानी कचेऱ्यातून अत्यंत खर्चिक व सुदर विलायती फर्निचर पहाण्याची व वापरण्याची सवय झाली होती. श्यामच्या घरी खुद्द हॉलंड देशातले फर्निचर दिले गेले होते. त्यामुळे फर्निचरबाबत श्यामच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्या उंचीच्या मानाने सरदारजीचे टेबल फार खुजे वाटत होते म्हणून भिक्कार वाटत होते एवढेच !

त्या उंच व स्मार्ट सरदारजीचा आवाज मोठा राठ व कर्कश होता. तरी त्याची वृत्ती सर्वांना मदत करावी अशी होती असे दिसले. कारण एक केरळीय जोडपे काही कामाकरता फार लावून आले होते व नेमका त्या बाईचा पासपोर्ट घरी विसरला होता. त्या पासपोर्ट-शिवाय काम होणे शक्य नव्हते. प्रथम सरदारजीने त्या केरळीय जोडप्याला तसे सागितले. ते ऐकताच बहुधा त्या केरळीय जोडप्याचा चेहरा काळवंडला असावा. कारण

तसा झाला असल्यास लक्षात येण्याचा संभव नव्हता. सरदारजीला त्यांची कणव आली व त्याने त्याचे काम करून दिले.

एक अतिशय क्रूर दिसणारा ओमानी त्या सरदारजीच्या 'मला वरच्या साहेबांना भेटू द्या' म्हणून मागे लागला होता. पण सरदारजी त्याच्याशी जरा कडकपणे वागून त्याला 'आठ दिवसानी ये' म्हणून सांगत होता. आमच्या चेहऱ्यावर 'असं का वागतोस त्याच्याशी?' असा भाव पाहून तो आम्हाला सांगू लागला, "अहो, हे लोक आपल्या लोकांना एका ठराविक पगारावर बोलावतात पण येथे आल्यावर त्याच्या निम्मा पगार देतात वा महिनान् महिने पगारच देत नाहीत. त्या हिंदी माणसानी तक्रार करायला वा पगार मागायला सुरुवात केली की त्यांना परत जा म्हणून सागतात. ओमानमध्ये रहावयाचे म्हणजे कोणा ओमानी माणसाची संमती लागते. त्यामुळे ते हिंदी लोक भाडूही शकत नाहीत. येथल्या मोठ्या पगाराचे 'घी' सगळे पहातात, पण हा 'बडगा' कोणी पहात नाहीत.

"तेव्हा तुम्ही येथे आलात की येथले रहाणे हे सर्वस्वी त्याच्या मर्जीवर अवलबून असते. आता ह्या ओमानी माणसाकडे दोन दोन हिन्दी माणसे कामाला आहेत. त्याना त्याने त्याचा सगळा पगार गेले सहा महिने दिला नाही आहे. हा त्यांना परत पाठवून दुसरी दोन हिंदी माणसे मागवण्याला परवानगी द्या म्हणून सागतो आहे. आम्ही म्हणतो आहोत की, त्या माणसाचे पगार आधी दे मग दुसरी माणसे!"

आम्ही सरदारजीकडे तू करतो आहेस ते अगदी बरोबर व योग्य आहे अशा नजरेने पाहिले. तो ओमानी माणसाचे काजळ घातलेले डोळे असे काय क्रूर दिसत होते की विचारू नका! श्याम रामचद्रला म्हणाला, "कसे काय ह्या माणसाकडे लोक काम करत असतील बुवा?' रामचंद्रनूला पण श्यामची भीति सहाजिक वाटली.

तेव्हढ्यात एक काळा व उंच उत्तर-प्रदेश वा बिहारकडला माणूस सरदारजीकडे आला. त्याचा चेहरा अत्यत रडवेला होता. त्याची आई फार आजारी असल्याची तार आली होती. एक दिवस सोडून दुसऱ्या दिवशी त्याला हिन्दुस्थानला जावयाचे होते. त्याबाबत काही व्हिसा वगैरे करून घेण्याकरता तो आला होता. त्याच्याशी राठ पण प्रेमळ आवाजात सरदारजी म्हणाला, 'तू काळजी करू नकोस. मी तुझे काम करतो. दुपारी दीड वाजता ये. तुझे कागद तयार असतील. मात्र आजच दीड वाजता ये, उद्यावर टाकू नकोस. उद्या व परवा सुट्टी आहे!' परवा शुक्रवार म्हणजे येथला आठवड्याच्या सुट्टीचा वार होता; पण उद्या कसली सुट्टी असावी बुवा? असा श्यामला प्रश्न पडला व तो काही सुटला नाही. ओमानमध्ये वर्षातल्या तीन ईदच्या व एक सुलतान ज्या दिवशी गादीवर आला त्या दिवशी अशाच फक्त सुट्ट्या असतात. मग ही कसली सुट्टी असावी बुवा? थोडा वेळ विचार करून श्यामने तो प्रश्न सोडून दिला.

दुसरा दिवस गुरुवार. प्रथम काही दिवस मित्राची व नातेवाकाची पत्रे येतात; पण मग पुढे बायकोशिवाय कोणी पत्र वगैरे लिहीत नाही. साधारण राधाचे पत्र दर गुरुवारी यावयाचे; पण त्या गुरुवारी काही आले नव्हते. ओमानला आल्यापासून श्यामला राधाचे व तिच्या पत्राचे व ह्या पत्रामुळे मिळणाऱ्या मानसिक सुखाचे महत्त्व कळू लागले होते. राधाचे पत्र न आल्यामुळे श्याम खजिल झाला होता व त्या खजिलावस्थेतच त्याचा गुरुवार गेला!

शुक्रवार तर काय येथला सार्वजनिक सुट्टीचा दिवस! सकाळचा वेळ असाच आळसात गेला. मग कपडे धुणे, घर साफसूफ करणे, मग जेवणे व मग झोपणे ह्या कार्यक्रमात दुपार असा सारा दिवस गेला. संध्याकाळी काही ७–७॥ च्या सुमारास–म्हणजे हिन्दुस्थानच्या ८॥–९ च्या सुमारास–त्याने रेडिओ सिलोन लावला, तर त्यावर महंमद रफीची बापूजीच्या अमर–कहानीची अत्यन्त रटाळ रेकॉर्ड लागली होती. त्यामुळे श्यामच्या डोक्यात एकदम हिंदी वकिलातीला काल सुट्टी का होती ह्याबाबत प्रकाश पडला. 'बरोबर! आज दोन ऑक्टोबर म्हणजे सरकारी सुट्टीचा दिवस; पण येथे तो शुक्रवारी पडत असल्याने वकिलातीने तो गुरुवारी घेतला होता.' हा एवढाच येथला गाधी–जयंतीचा कार्यक्रम! आणि जर रेडियो–सिलोनवाल्यानी तो गांधीबद्दलची भिकार का होईनात; पण गाणी लावून साजरी करावयाचे ठरवले नसते तर त्याला त्या दिवशी गाधी–जयन्ती आहे हे कळलेही नसते! रेडिओ–सिलोन भारतीयावर भाऊबीज, दसरा, दिवाळी, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर वगैरे साजरे करून केव्हढे उपकार करत आहे बरे? असा श्यामच्या मनात विचार आला.

गाधी–जयंतीचा येथे काहीही कार्यक्रम नव्हता. महात्मा गाधीनंतर हिंदुस्थानात इतके महत्त्वाचे गाधी होऊन गेले आहेत व होत आहेत की, महात्मा गांधी म्हणजे ह्या गाधीसमोर जसा 'चद्रा 'पुढे काजवा! आपण गाधी–जयन्तीचे काय करावे असा श्यामच्यापुढे प्रश्न पडला. त्याने परत रेडिओ लावला. आता कवी प्रदीपचे 'साबरमतीके संत तुने करदिया कमाल!' हे कमालीचे चांगले गाणे लागले होते. त्यामुळे त्याच्या मनाला हायसे वाटले व तो संध्याकाळचे जेवण बनवण्याच्या मागे लागला.

शनिवारी ऑफिसमध्ये साधारण शुक्रवारी सुट्टीच्या दिवशी तुम्ही काय केलेत? असे एकमेकास विचारण्याचा प्रघात आहे. त्या प्रघाताप्रमाणे वागून झाल्यावर श्यामच्या मनात आले की, येथे ओमानी, पाकिस्तानी, सिलोनी, इजिप्ती लोक आहेत. त्यांना का न विचारावे की बुवा, तुम्हाला गाधीबद्दल काय माहीत आहे म्हणून? त्याची त्यालाच कल्पना आवडली व तो त्या दृष्टीने विचार व आचार करू लागला.

स्त्रियास अग्रहक्क ladies first ह्या साहेबाच्या नियमाप्रमाणे तो प्रथम त्यांच्या कचेरीतल्या एका गोव्याच्या १९–२० वर्षे वयाच्या ख्रिश्चन मुलीकडे गेला. ती मोठी गोड, गोरी व प्रसन्न मुलगी होती. तिचे नाव होते मेरी. श्यामची तिची ओळख होण्याआधीसुद्धा ती श्यामकडे बघून हसून wish करत असे. त्याचे श्यामला थोडे नवल वाटले होते. मग एकदा तो तिच्या खोलीत काही कामाकरता गेला असता स्वतःची ओळख करून देऊ लागला, तर ती म्हणाली होती, 'सर, मला तुमची सगळी माहिती आहे. तुम्ही तेथे मध्यवर्ती सरकारात होतात. येथे लठ्ठ पगारावर आला आहात वगैरे.' ते ऐकून श्यामच्या लठ्ठपणात थोडी भर पडली होती. तिला हे सगळे माहीत असावयाचे कारण म्हणजे ती एकटीच इंग्रजी टंक–लेखिका होती. श्यामचा

सगळा पत्रव्यवहार तिनेच टंकित केला होता.

मग श्याम तिच्याकडे बराच वेळा गेला होता. तेथे जाताच तो 'How is my daughter?' म्हणून विचारत असे. आतासुद्धा त्याने 'How is my daughter' म्हणत सुरुवात केली. मग बोलता बोलता विचारले, 'काय ग मेरी, तुला महात्मा गांधीबद्दल काय माहिती आहे?' ह्या अनपेक्षित प्रश्न ऐकून मेरी मोठ्या बुचकळ्यात पडली व तो बुचकळा तिच्या चेहऱ्यावर दिसू लागला. श्याम तिला म्हणाला, 'मी काही तुझी परीक्षा घेत नाही आहे. फक्त एवढेच सांग की, महात्मा गांधीबद्दल तुला काय माहिती आहे?' श्याम परीक्षा घेत नव्हता तरी ती परीक्षेत उत्तर देतात तसे चाचरत उत्तर देत म्हणाली, 'तो फार मोठा माणूस होता. त्यानी गरिबांकरता फार कष्ट घेतले. आणखी काय बरे? हां, ते अगदी साधे रहावयाचे!'

'उत्तम!' श्याम म्हणाला व त्यांच्या Director–General च्या सेक्रेटरीला भेटावे म्हणून पुढल्या खोलीत शिरला.

त्यांच्या Director–General ची सेक्रेटरी इजिप्ती, अतिशय सुंदर, उंच, गोरीपान व मोहक अशी म्हटलं तर बाई, म्हटलं तर तरुणी होती. तिला बाई म्हणण्याचे कारण तिला चार मुले होती व तिचा नवरा ओमान सरकारातच मोठ्या हुद्द्यावर होता. तिचे नाव होते मश्रफा! श्यामला बऱ्याच वेळा Director–General कडे जावे लागे. कधीकधी त्याच्याकडे कोणी लोक बसले असतील तर थांबावे लागे व ते मश्रफाच्या खोलीतच! आधीच श्याम म्हणजे गोष्टीवेल्हाळ व ती मश्रफा पण तशीच! फक्त तिचा आवाज फार गोड व इंग्रजी बोबडं बोलावयाची म्हणून जास्त गोड वाटत असे.

प्रथम इकडले तिकडले बोलणे झाल्यावर श्यामने तिला विचारले, 'काय ग मश्रफा, तुला आमच्या महात्मा गांधीबद्दल काय माहिती आहे?' ती हसून म्हणाली, 'तू मला अगदी अशिक्षित समजू नकोस! मला खूप माहिती आहे त्यांच्याबद्दल. प्रथम म्हणजे ते हिंदुस्थानचे पहिले प्रेसिडेंट होते. दुसरे म्हणजे ते एवढे मोठे प्रेसिडेंट असून अगदी साधे रहात. ते कधी दारू पीत नव्हते की मास खात नव्हते. ते फक्त दूध पिऊन रहात!' श्यामने खूप हसरा चेहरा करून म्हटले की, 'खरंच खूप माहिती आहे ग तुला!' आता बिचारीने गांधीना पहिला प्रेसिडेंट केला ह्यात तिची चूक नव्हती. ह्या देशातून कोणी पुढारी असा असू शकतो की, तो प्रेसिडेंट होण्याचे सोडत नाही, ह्यावर तिचा विश्वास बसणे शक्य नव्हते.

'त्यांचा मृत्यू कसा झाला माहीत आहे?' श्यामने विचारले.

'हो, त्यांना कोणी तरी गोळ्या घालून मारले!' मश्रफा निर्विकार आवाजात म्हणाली. प्रेसिडेंट म्हणजे असा गोळी घालूनच मारला जातो असाच तिचा स्वतःच्या देशाबद्दल व आसपासच्या देशांबद्दलचा अनुभव होता.

श्यामच्या कचेरीत एक ब्रिटिश, एक इजिप्ती, दोन पाकिस्तानी व एक सिलोनी बसत असत. हा सिलोनी ३०–३१ वर्षांचा, इंग्रजी गाण्याची आवड असलेला असा श्यामच्या टेबलाजवळच्या टेबलाजवळ बसत असे. एक पाकिस्तानी पंजाबचा होता. दुसरा लखनौ व कानपूरकडला- फाळणीनंतर त्याचे कुटुंब पाकिस्तानात गेले होते. त्याचा जन्म पाकिस्तानमधला. त्याचे वय ३२–३३ असावे. त्याचे नाव होते सुलतान!

श्यामने सुलतानला हाक मारून बोलावले व आपल्या समोरच्या खुर्चीवर बसायला सांगितले. श्याम एवढे बोलावून सुलतानला काय विचारतो आहे ह्याची चंद्राला–त्या सिलोनी मुलाला–उत्सुकता वाटली व तो लक्षपूर्वक ऐकू लागला. श्याम सुलतानला म्हणाला, 'काय रे, तुला महात्मा गांधीबद्दल काय माहिती आहे?'

सुलतान काही उत्तर देण्याआधीच चंद्रा म्हणाला, 'That Ahimsa–Man no? and who is that, who started sarvodaya?' श्यामला चंद्राला गांधीबद्दल काय माहीत आहे ते लक्षात आले.

'वो बडे सिम्पल आदमी थे। बडे नेक आदमी थे। उन्होने इंडिपेन्डन्स के लिये बहुत कुछ किया। शायत उन्होनेही 'घेराव' का चक्कर चलाया.' श्याम मनाशी म्हणाला की, ह्याला घेराव म्हणजे सत्याग्रह वगैरे म्हणावयाचे असेल. मग सुलतानने पाकिस्तानी शाळेतून शिकवल्या जाणाऱ्या इतिहासात पंडित नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद वगैरेंचा कसा उल्लेख आहे ते सांगितले.

'त्यांना मृत्यू कसा आला? कोणी मारले वगैरेबद्दल तुला काय माहीत आहे?' श्यामने विचारले.

'उनको कलकत्तेमे कोई पागल आदमीने मारा!' श्याम म्हणाला, 'पागल आदमीने? फिरभी कुछ वजा होगी मारनेके लिये। पता है तुम्हे?'

'साहाब, पागल आदमी को मारने के लिये क्या वजा हो सकती है? पागल तो पागल ही होता है!'

तसा गोडसेचा व श्यामचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता; पण गोडसेला भारत सरकारने पागल ठरवून गोडसेवर अन्याय करण्याऐवजी त्या महात्म्यावरच घोर अन्याय केला होता, असे श्यामला वाटले. एका पागलने गांधीना मारले ह्या वाक्याने गांधांनी मुसलमानाकरता केलेल्या सगळ्या गोष्टीवर बोळा फिरवला गेला होता.

मग श्यामने सुलतानला गोडसे कोण, कुठला हे सांगितले. ५५ कोटी रुपये देण्याबाबत भारत सरकारने घेतलेला पवित्रा व त्याला विरोध करण्याकरता गांधीनी केलेल्या आमरण–उपवासाबाबत सांगितले. शेवटी भारत सरकारने ५५ कोटी पाकिस्तानला कसे दिले हे सांगितले व त्यामुळेच चिडून जाऊन गोडसेने त्यांची हत्या केली हे सांगितले. हे सर्व ऐकून सुलतान म्हणाला, 'ऐसी बात है? हमे पता भी नही था!'

अशा रीतीने श्यामने २ ऑक्टोबर ओमानमध्ये साजरा केला! □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य बहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# माणूस खुनी केव्हा बनतो? मानवी हत्येचे मानसशास्त्र

कि. मो. फडके, एम. ए., डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

चोप्रा भावंडाचा अमानुषपणे खून करणाऱ्या बिल्ला व रंगा या कुप्रसिद्ध गुन्हेगाराना अखेर फाशी दिल्यामुळे असंख्य लोकांनी अनेक कारणांकरिता समाधानाचा निःश्वास टाकला नसेल तोच भारतातील सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री. व्ही. आर. कृष्णा अय्यर यांनी असे म्हटले की, बिल्ला व रंगा यांची फाशी म्हणजे सरकारने केलेले खूनच आहेत! त्यांच्या मते, अशा गुन्हेगाराना फाशीची शिक्षा देण्याऐवजी त्यांना सुधारण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. निर्घृणपणे इतराची हत्या करणाऱ्या गुन्हेगाराबद्दल लोकांच्या मनातील संताप किती उग्र स्वरूपाचा असतो, याची पूर्ण कल्पना असूनही एका विद्वान, मानवतावादी न्यायाधिशाने वरील प्रतिक्रिया व्यक्त करावी, हे धाडसाचेच म्हटले पाहिजे.

अर्थात, फाशीची शिक्षा कायद्यातून रद्द करावी व, अगदी निर्ढावलेल्या गुन्हेगारांनाही सुधारण्याचे प्रयत्न करावेत, हे मत विसाव्या शतकात अनेक क्षेत्रांतील विचारवंतानी व्यक्त केले आहे आणि या विषयावर अगदी अलीकडच्या काळात आपल्याकडेही बरीच चर्चा झालेली आहे. बहुधा अशा चर्चेत कायदेपंडित, समाजशास्त्रज्ञ, नीतिशास्त्रज्ञ, मानवतावादाचे पुरस्कर्ते व इतरही विचारवंत आपापल्या भूमिकेचे अटीतटीने समर्थन करताना दिसतात. मात्र अशा चर्चेत मानवाची हत्या करणाऱ्या गुन्हेगारांची मानसशास्त्रीय चिकित्सा त्या मानाने फारशी आढळत नाही. म्हणून या लेखात अमेरिकेतील दोन विख्यात मानसोपचारतज्ज्ञानी लिहिलेल्या 'मर्डर अँण्ड अॅसॅसिनेशन' या नावाच्या ग्रंथाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न करीत आहे.

१९७१ साली प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथाचे पहिले लेखक म्हणजे विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचे संशोधक व प्रवर्तक डॉ. अल्बर्ट एलिस आणि दुसरे लेखक म्हणजे विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा अवलंब करणारे मानसोपचारतज्ज्ञ जॉन एम. ग्युलो. या दोन्ही लेखकानी खून करणाऱ्या व्यक्तीवर मानसोपचार केलेले आहेत. तसेच इतर मानसोपचारतज्ज्ञांना या पद्धतीचा उपयोग करून, खून करणाऱ्या व्यक्तीवर उपचार करण्यास शिकविले आहे. त्यामुळे त्यांच्या ग्रंथातील विचाराना प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळालेली आहे, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे.

## भावनिक असमतोल

अगदी प्रथम या ग्रंथात पिसाटाप्रमाणे अनेक खून करणाऱ्या गुन्हेगारांच्या व्यक्तिमत्त्वाचे पृथक्करण केले आहे. जो माणूस एकामागून एक असे अनेक खून करण्यास प्रवृत्त होतो तो निदान तात्पुरता तरी चित्तविकृतीने पछाडलेला असतो, असे वाटणे साहजिकच आहे. कारण, नाहीतर तो अशाप्रकारे इतरांची हत्या का करील? परंतु या अनुमानात एक तार्किक दोष आहे. तो असा की, केवळ एखाद्या माणसाने अकारण इतर अनेक माणसांची हत्या केली ही वस्तुस्थिती काही असे सिद्ध करीत नाही की, तो माणूस कोणत्या तरी गंभीर मनोविकृतीने ग्रासलेला असतो. असा निष्कर्ष काढण्यासाठी त्या माणसाच्या आयुष्यातील इतर वर्तणुकीवरूनही काही पुरावे देता येणे आवश्यक आहे. अनेक गुन्हेगारांच्या बाबतीत आता असा स्वतंत्र पुरावा उपलब्ध झालेला आहे. खून करणाऱ्या गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी जेव्हा पुरेशी मानसशास्त्रीय माहिती मिळू शकते तेव्हा बहुतेक नेहेमीच असे दिसून येते की, ते गुन्हेगार निदान गुन्हा करण्याच्या वेळी तरी गंभीर मानसिक विकृतीच्या आहारी गेलेले असतात.

असाच निष्कर्ष एखादाच खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वासंबंधीही काढता येईल काय? एखादाच खून करणाऱ्या अगदी सर्वच माणसांबद्दल वरील निष्कर्ष काढता येणार नाही. कारण क्रोध, मत्सर इत्यादी प्रक्षोभक भावनामुळे किंवा मद्यपानाच्या अतिरेकामुळे, तसेच आपण केवळ आत्मसंरक्षण करीत आहोत या समजुतीमुळे अथवा अशाच काही कारणामुळेही एखादा माणूस दुसऱ्याचा खून करतो. मात्र खून करणाऱ्या गुन्हेगाराचे वकील कारणे दाखविण्याचा प्रयत्न करतात तेवढ्या प्रमाणात काही वरील तऱ्हेची कारणे माणसाला दुसऱ्याचा खून करावयास प्रवृत्त करीत नाहीत आणि जेव्हा जेव्हा एखादाच खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी विश्वसनीय माहिती मिळाली आहे तेव्हा तेव्हा असे दिसून आले आहे की, अशी माणसेही आयुष्यभर कोणत्या तरी मानसिक विकृतीने व कधीकधी अगदी गंभीर विकृतीने पछाडलेली होती. अनेक खून करणाऱ्या किंवा एखादाच खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलच्या या अनुमानाला पुष्टी देणारा भरपूर पुरावा उदाहरणांच्या स्वरूपात या ग्रंथात सादर केला आहे.

वैयक्तिक किंवा राजकीय कारणासाठी केलेला खून हा हिंसक गुन्ह्यांपैकी एक सर्वांत अनिष्ट गुन्हा आहे; तरीही तो हिंसक गुन्हेगारीचाच एक प्रकार आहे, हे विसरता कामा नये आणि असा गुन्हा करणाऱ्या माणसाच्या प्रेरणेची मुळे त्याच्या मनातील खुनी प्रवृत्तीप्रमाणेच त्याच्या मनातील हिंसक प्रवृत्तीतही रुजलेली असतात. याचा अर्थ असा की, माणूस विध्वंसक वर्तनास का उद्युक्त होतो, हे जर आपल्याला समजले तर तो खून करण्यास कसा प्रवृत्त होतो हे समजण्यासही मदत होईल.

## समाजशास्त्रीय मीमांसा

माणूस खून करण्यास का व कसा प्रवृत्त होतो, या विषयावर आजवर विविध क्षेत्रांतील अभ्यासकांनी संशोधन केले आहे. सर्वसामान्य व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या विषयासंबंधी केलेल्या संशोधनामुळे हिंसक गुन्हे व मानवी हत्या करणाऱ्या माणसासंबंधी काही विशिष्ट माहिती संकलित झालेली आहे. उदाहरणार्थ, काही

संशोधकांना असे आढळून आले आहे की, हिंसक गुन्हेगारी व मानवी हत्या याचे प्रमाण सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अगदी खालच्या वर्गातील लोकांच्यात अधिक असते. इतर काही सर्वेक्षणावरून असे समजते की, दारिद्र्य, अत्यंत कमी जागेतील दाट लोकवस्ती अशा तऱ्हेच्या आर्थिक कारणामुळे माणूस हिंसाचारास प्रवृत्त होतो. तसेच, आपल्यावर कोणता तरी अन्याय झाला आहे, ही भावना व वैफल्याची भावना यामुळेही माणूस हिंसाचारास उद्युक्त होतो.

तथापि, हिंसक गुन्हेगारीसंबंधीच्या बहुतेक समाजशास्त्रीय उपपत्तीविषयी असे म्हणता येईल की, त्या उपपत्तीवरून हिंसाचार किंवा खून करणाऱ्या माणसासंबंधी जरी काही आर्थिक व सामाजिक माहिती मिळते तरी माणसाने असे गुन्हे करण्याचे कारण म्हणजे त्याची विशिष्ट आर्थिक किंवा सामाजिक परिस्थिती, असे म्हणता येत नाही. कारण तशाच तऱ्हेची आर्थिक व सामाजिक परिस्थिती असलेल्या माणसांपैकी एक माणूस खून करण्यास का प्रवृत्त होतो व दुसरा का होत नाही, हा प्रश्न शिल्लकच राहतो. त्यामुळे असे म्हणता येईल की, खून करणाऱ्या माणसाच्या वर्तणुकीची कारणे त्याच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीप्रमाणेच त्याच्या जैविक व मानसिक घटकांत व जीवनाकडे पाहण्याच्या त्याच्या सदोष दृष्टिकोनातही शोधावी लागतील.

## फ्रॉइडप्रणित विश्लेषण

माणसाच्या विध्वंसक व खुनी प्रवृत्तीच्या मानसिक कारणांसंबंधी सर्वसामान्य सुशिक्षित लोकापर्यंत पोचलेली माहिती म्हणजे अशा प्रवृत्तीचे फ्रॉइडप्रणित विश्लेषण ! अनेक मनोविश्लेषणतज्ज्ञानी प्रत्यक्ष खून करणाऱ्या व्यक्तीचे व हॅम्लेटसारख्या अभिजात वाङ्मयात अढळ स्थान मिळविलेल्या व्यक्तीचे मनोविश्लेषण करून दाखविणारे लिखाण प्रसिद्ध केले आहे. या सर्व मनोविश्लेषणांचा पाया फ्रॉइडच्या एका मूलभूत सिद्धांतावर आधारलेला आहे. तो सिद्धांत असा की, माणसाच्या मनातील विद्वेषाची भावना ही त्याला त्याच्या वडिलांबद्दल वाटणाऱ्या मत्सरातून व द्वेषातून जन्मलेली असते आणि माणसाला त्याच्या वडिलाबद्दल मत्सर व द्वेष का बरे वाटावा ? कारण म्हणे त्याला आपल्या आईबद्दल लैंगिक प्रेम वाटत असते व त्या प्रेमाच्या परिपूर्तीत वडील हे प्रतिस्पर्धी ठरतात म्हणून !

फ्रॉइडच्या या मूलभूत सिद्धांतावर अगदी पहिला आक्षेप असा घेता येतो की, सर्व मुलांना काही आपल्या आईबद्दल असे लैंगिक प्रेम व म्हणून वडिलाबद्दल मत्सर व द्वेष वाटत नाही. काही मुलांना वडिलांबद्दल प्रेमच वाटते, तर काही मुले वडिलाचा व आईचाही इतर अनेक कारणामुळे द्वेष करतात. शिवाय, फ्रॉइडप्रणित मानसशास्त्रात इतरही गंभीर उणीवा असल्यामुळे त्या मानसशास्त्रीय तत्त्वाच्या अनुषंगाने हिंसक कृत्ये किंवा खून करणाऱ्या माणसाच्या वर्तणुकीचा अर्थ लावणे म्हणजे वाळूचे किल्ले बांधण्यासारखे आहे !

## काही मानसशास्त्रीय उपपत्ती

खून करणाऱ्या माणसाच्या मानसिक प्रवृत्तीसंबंधी इतरही काही मानसशास्त्रीय उपपत्ती प्रचलित आहेत. त्यापैकी एक अशी की, खून करणाऱ्या माणसाच्या मनात स्वतःबद्दल दुबळेपणाची व हीनत्वाची भावना वास करीत असते आणि खून करून एक प्रकारे तो आपल्या मनातील या त्रासदायक भावना गाडून टाकून स्वतःला व जगाला असे दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो की, तो सामर्थ्यवान असून त्याची लायकी श्रेष्ठ दर्जाची आहे.

माणसाला स्वतःबद्दल वाटणाऱ्या दुबळेपणाच्या व हीनत्वाच्या भावनेची दुसरी बाजू म्हणजे, त्याला स्वतःबद्दल वाटणारी अवास्तव श्रेष्ठत्वाची शेखचिल्ली भावना ! कोणत्याही क्षेत्रात माणसाने कर्तृत्ववान व यशस्वी असणे अत्यावश्यक आहे, अशी कल्पना शिरोधार्य मानणारा माणूस स्वतःकडून कोणत्याही बाबतीत सदैव असामान्य कामगिरीची अपेक्षा करू लागतो; परंतु ज्या वेळी अशा माणसाला आपले कर्तृत्व आपल्या अत्युच्च महत्त्वाकांक्षेच्या मानाने कम-अस्सल आहे, असे जाणवू लागते तेव्हा तो स्वतःला नालायक समजून स्वत.चा द्वेष करू लागतो. इतकेच नव्हे, तर आपण नालायक नसून कोणी तरी श्रेष्ठ असामी आहोत, हे सिद्ध करण्यासाठी स्वतःकडून तो आणखीनच महान कर्तृत्वाची अपेक्षा करू लागतो. आपले अद्वितीय श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलेला असा माणूस इतर लोकांच्या हितासंबंधी कोणताही विधिनिषेध न बाळगता किंवा प्रसंगी इतर लोकांचा निःपात करूनही आपले उद्दिष्ट गाठण्यास कचरत नाही. अशा प्रकारे आपले महान श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची कल्पना जर्मनीतील नाझी पक्षासारख्या पंथाच्या अनुयायांनी सामूहिकपणे स्वीकारलेली आढळून येते आणि खून करावयास उद्युक्त झालेल्या काही माणसांच्या मनात तरी आपले महान श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची अवास्तव कल्पना दृढमूल झालेली असते, हे नाकारता येणार नाही.

परंतु खुनाच्या या उपपत्तीसंबंधी एक महत्त्वाचा प्रश्न ओघानेच उपस्थित होतो. तो असा की, इतर लोकांना कस्पटासमान लेखून, त्यांचा द्वेष करून व प्रसंगी त्याचा नायनाट करून आपण सर्व क्षेत्रात संपूर्णपणे कर्तृत्ववान व यशस्वी होणे अत्यावश्यक आहे, असा दृष्टिकोन माणूस का स्वीकारतो ? याचे उत्तर बहुधा असे संभवते की, बहुसंख्य लोकांना त्यांच्या प्रकृतिजन्य स्वभावामुळे या दृष्टिकोनाचा अंगीकार करणे अतिशय सुलभ असते. नाझी पक्षाच्या विचारसरणीकडेही माणसे आकृष्ट होण्याचे कारण त्यांच्या या नैसर्गिक प्रवृत्तीतच असावे.

एखादा माणूस मत्सरामुळे आपल्या बायकोचा खून करावयास कसा प्रवृत्त होतो, हे वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवरून नीट समजू शकते. आपली बायको आपल्याशी बेईमानी करीत आहे, असे जर त्याला वाटले तर तो असा निष्कर्ष काढतो की, आपली बायको दुसऱ्याबरोबर व्यभिचार करते, यावरून आपलीच नालायकी सिद्ध होते आणि त्यामुळे लोक आपल्याच तोंडात शेण घालतील. याचा परिणाम म्हणजे, स्वतःला जाळणाऱ्या या हीनत्वाच्या भावनेमुळे तो एक तर आत्महत्या करतो किंवा आपण नामर्द किंवा बेवकूफ नसून चांगले सामर्थ्यवान आहोत, हे सिद्ध करण्यासाठी बायकोचा खून करतो अथवा बायकोला मारून तो आत्महत्या करतो आणि निदान अशी हत्या करण्याच्या वेळी तरी तो चित्तविकृतीने ग्रासलेला असतो असे दिसून येते.

माणसाच्या विध्वंसक व खुनी प्रवृत्तीच्या मानसिक कारणांसंबंधी

आणखी दोन उपपत्ती विचारात घेता येतील. त्यापैकी पहिली उपपत्ती असे सांगते की, खून करणाऱ्या माणसाची वैफल्य सहन करण्याची क्षमता कमालीची मर्यादित असते व म्हणून त्याला जीवनातील अडचणींना तोंड देणे फार अवघड जाते. परिणामी, असा माणूस आपल्या मार्गात अडचणी निर्माण करणाऱ्या लोकांवर हिंसक प्रहार करण्यास चटकन उद्युक्त होतो. या उपपत्तीत काही सत्य असणे नक्कीच संभवनीय आहे. परंतु या उपपत्तीतील कच्चा दुवा म्हणजे, वैफल्य सहन करण्याची मर्यादित कुवत माणसाला अपरिहार्यपणे हिंसाचाराचा मार्ग अवलंबण्यास भाग पाडते, हा अध्याहृत सिद्धांत ! कारण प्रत्यक्षात मात्र अशा कित्येक माणसांच्या वाट्याला भरपूर वैफल्य येऊनही ती माणसे हिंसेचा मार्ग स्वीकारीत नाहीत, असे दिसून येते.

खून करणाऱ्या माणसाच्या प्रेरणेसंबंधीची दुसरी उपपत्ती असे सूचित करते की, खून करणारा माणूस बहुधा बहिर्मुख वृत्तीचा व भावनिकदृष्ट्या असमतोल प्रकृतीचा असतो. शिवाय, अशा माणसाला समाजातील नीतिनियम आत्मसात करता आलेले नसतात. परंतु या उपपत्तीसंबंधीची मुख्य अडचण अशी आहे की, कित्येक गुन्हेगार व अगदी खुनीही अतिशय अंतर्मुख वृत्तीचे असून त्यांनी समाजातील नीतिनियमाचे काटेकोरपणे पालन केल्याचे पाहण्यातयेते!

## खुनी माणसाचे व्यक्तिमत्त्व

उपलब्ध असलेल्या एकूण सर्व माहितीवरुन खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख तयार करावयाचा झाला तर असे म्हणता येईल की, अशा माणसात स्वतःबद्दल हीनत्वाची भावना व त्या भावनेवर मात करण्यासाठी जोपासलेली अवास्तव श्रेष्ठत्वाची शेखसल्ली भावना वास करीत असतात. त्याची वैफल्य सहन करण्याची कुवत अतिशय मर्यादित असते स्वत.ला शिस्त लावून घेणे त्याला जमत नाही, तसेच इतरांबरोबर मैत्रीचे किंवा सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणेही त्याला जमत नाही. असा माणूस त्याच्या व्यक्तिमत्त्वातील या उणिवांचा उगम त्याच्या बालवयातील वातावरण व त्याला त्याच्या आई-वडिलांकडून मिळालेल्या असमाधानकारक वागणूकीतही शोधता येते. कारण त्याच्या आई-वडिलांचे व्यक्तिमत्त्वही भावनिकदृष्ट्या विचलित झालेले असू शकते, परंतु केवळ अशा बाह्य परिस्थितीमुळेच माणूस खून करावयास प्रवृत्त होईल असे म्हणता येणार नाही. अनिष्ट वर्तन करणे व स्वतःच्या जीवनात अनावश्यक अडचणी निर्माण करणे या गोष्टी निदान काही अंशी तरी खून करणाऱ्या माणसाच्या जन्मजात स्वभावाचाच भाग असतात आणि हा जन्मजात स्वभाव म्हणजे त्याला त्याच्या आई-वडिलाकडून मिळालेला जैविक वारसा असू शकतो. किंवा आईच्या उदरात असताना, नाही तर जन्म घेत असताना घडलेल्या काही अपघातामुळे असा जन्मजात वारसा त्याच्या नशिबी येऊ शकतो. खून करणाऱ्या माणसाच्या आई-वडिलांसंबंधी जेव्हा पुरेशी माहिती मिळालेली आहे, तेव्हा वरील कल्पनेला वस्तुस्थितीचा आधार मिळाला आहे.

आता राजकीय कारणासाठी खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी थोडा विचार करणे इष्ट ठरेल. राजकीय कारणासाठी केलेल्या खुनाचे स्वरुप अर्थातच वेगळे असते. परंतु राजकीय पुढाऱ्याचा खून करणारा माणूसही मूलभूत चित्तविकृतीने ग्रासलेला असतो असे म्हणता येईल. कारण अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ. केनडी, मार्टिन लूथर किंग, सिनेटर रॉबर्ट एफ. केनडी इत्यादी पुढाऱ्याचे खून करणाऱ्या माणसांसंबंधी उपलब्ध असलेल्या माहितीवरून असे खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर बराच प्रकाश पडतो. बहुधा असा माणूसही स्वतःच्या भावनिक प्रक्षुब्धतेमुळे जीवनात त्याला हव्या असलेल्या गोष्टी प्राप्त करून घेण्यास असमर्थ असतो. त्याची वैफल्य सहन करण्याची कुवत फार मर्यादित असते. त्याला स्वतःबद्दल हीनत्वाची भावना वाटत असते व इतरांबद्दल असूया आणि द्वेष वाटत असतो. स्वत.च्या मनातील न्यूनत्वावर मात करण्याच्या खटाटोपातून जन्मलेल्या श्रेष्ठत्वाच्या शेखसल्ली भावनेने तो प्रेरित झालेला असतो तसेच, भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्धपणे वर्तन करण्याची त्याला सवयच असते आणि कित्येकदा अगदी खून करण्यापूर्वीच त्याच्या जीवनात काही प्रक्षोभक घटना घडलेल्या असतात. म्हणजे, सकृद्दर्शनी राजकीय कारणासाठी केलेल्या खुनालाही खून करणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वातील काही वैयक्तिक कारणे जबाबदार असतात.

## अविवेकी जीवन–तत्त्वज्ञान

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेतली तर खून करण्यास प्रवृत्त होणाऱ्या माणसाच्या रोगट व्यक्तिमत्त्वासंबंधी जरी बरीच माहिती मिळते, तरी खुनाचे मानसशास्त्र समजावून घेण्यासाठी त्यात एका महत्त्वाच्या घटकाचा अंतर्भाव करावयास हवा. तो घटक म्हणजे, खून करणाऱ्या माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन. त्याला मिळालेल्या विशिष्ट जैविक वारशामुळे व तो ज्या परिस्थितीत वाढला त्या परिस्थितीतून त्याच्या वाट्याला आलेल्या अनुभवामुळे त्याने एक अविवेकी जीवन-तत्त्वज्ञान कळत नकळत आत्मसात केलेले असते आणि जीवनाकडे पाहण्याच्या त्याच्या या सदोष दृष्टिकोनामुळे तो प्रसंगी खून करण्यासही प्रवृत्त होतो. तेव्हा आता या अविवेकी जीवन-तत्त्वज्ञानाचे स्वरूप पाहणे क्रमप्राप्त आहे मुख्यतः खाली दिलेल्या अविवेकी कल्पना त्याच्या मनात इतक्या पक्क्या रुजलेल्या असतात की,त्यामुळे तो अतिशय शिरजोरपणे व इतरांची कोणतीही पर्वा न करता विकृत वर्तन करू शकतो आणि अशा वागण्याचे अंतिम टोक म्हणजे अर्थातच इतरांचा खून करणे !

१) माझ्या सभोवतालच्या जवळजवळ प्रत्येक माणसाने मला शाबासकी व प्रेम देत राहणे अत्यावश्यक आहे.

२) मी सर्व क्षेत्रात संपूर्णपणे निष्णात व यशस्वी असणे अत्यावश्यक आहे.

३) जीवनातील घटना मला हव्या तशा प्रकारे घडत नाहीत ही एक कमालीची घोर आपत्ती आहे.

४) माझे दुःख सभोवतालच्या परिस्थितीने माझ्यावर लादलेले आहे व मी म ह्या जाचकारक भावनावर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा त्यांच्यातून माझी सुटका करून घेण्यासाठी काहीच करू शकत नाही.

५) काही माणसे दुष्ट, दुर्गुणी, नीच व पाजी असतात आणि म्हणून अशा माणसांना त्यांच्या कृत्यांबद्दल कठोर शिक्षा केलीच पाहिजे.

६) मी स्वतःला शिस्त लावून जगातील अप्रिय परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आयुष्यातील काही अडचणी व जबाबदाऱ्या टाळाव्यात हेच उत्तम !

ज्या माणसाच्या जीवन–तत्त्वज्ञानात मुख्यत. वरील अविवेकी कल्पना दृढमूल झालेल्या असतात तो माणूस जीवनातील अपयशाला व अडचणींना धैर्याने तोंड कसे देणार ? म्हणजे त्याला अगदी थोडेसुद्धा वैफल्य सहन करता येत नाही, याचे कारण त्याच्या या सदोष जीवन–तत्त्वज्ञानात शोधता येते आणि त्याच्या या अविवेकी जीवनतत्त्वज्ञानामुळे खून करणारा माणूस आपला बराच वेळ व शक्ती, अ) स्वतःमधील उणीवा व स्वत.चे अपयश यांच्याबद्दल स्वतःला, ब) इतराच्या दोषामुळे त्याना व क) जगातील अडचणी व कटकटीबद्दल जगाला शिव्याशाप देऊन जळफळत बसण्यात वाया घालवीत असतो. अशा वेळी जर का त्याच्या सभोवतालच्या परिस्थितील काही घटनांमुळे त्याच्या मर्यादित सहनशीलतेवरील ताण वाढला तर मग त्याच्या मनात धुमसणाऱ्या जळफळाटाचा भडका उडतो व तो खून करावयास धजू शकतो. म्हणजे गुन्हेगारीस प्रवृत्त झालेला माणूस व विशेषत. खुनासारखा गंभीर गुन्हा करणारा माणूस स्वतः कळत-नकळत स्वीकारलेल्या अविवेकी दृष्टिकोनामुळे भावनिकदृष्टचा प्रक्षुब्ध झालेला असतो व त्यामुळे स्वत.च्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे हे काम बऱ्याच अंशी त्याच्या हाताबाहेर गेलेले असते.

सर्वसामान्य माणूसही काही बाबतीत अशाच प्रकारे वागत असतो. प्रमाणाबाहेर धूम्रपान, मद्यपान किंवा खादाडी करणाऱ्या माणसाला त्याच्या या सवयीचे दुष्परिणाम माहीत असले तरी स्वत.च्या अनिष्ट सवयीचा बीमोड करणे त्याला जमत नाही. खरे म्हणजे, स्वतःची अनिष्ट सवय बदलणे त्याला अशक्य नसते; परंतु स्वत च्या अनिष्ट सवयीनुसार वागणे त्याला फार सोपे जात असते व अनिष्ट सवय सोडून देणे अतिशय अवघड वाटत असते. म्हणून तो बहुधा आपली सवय सोडून देत नाही त्याचप्रमाणे बहुतेक गुन्हेगारांना त्यांच्या जन्मजात स्वभावामुळे चोरी करणे, इतराना फसविणे किंवा त्यांच्यावर हल्ला करणे हेच अधिक सोपे जात असते. शिवाय, असे वर्तन नजिकच्या दृष्टीने फायदेशीर ठरत असल्यामुळे त्या अनिष्ट वर्तनाचे समर्थन करणेही त्यांना त्यांच्या स्वभावामुळेच सहज शक्य होत असते. म्हणजे, नजिकच्या सुखासाठी दूरवरच्या हिताला रामराम ठोकणे ही सर्वसामान्य माणसामधील प्रवृत्ती गुन्हेगारांमध्ये फार तीव्र स्वरूपात प्रत्ययास येते, असे म्हणता येईल.

## शिक्षा की सुधारणा ?

या सर्व विवेचनाचा अर्थ असा नाही की, समाजाने गुन्हेगारांकडे कानाडोळा करावा किंवा फक्त भूतदयेने प्रेरित होऊन त्यांचे सर्व अनिष्ट वर्तन दुर्लक्षणीय समजावे व त्यांना मोकाट सोडावे; परंतु गुन्हेगारांच्या कृत्याबद्दल त्यांना योग्य ते शासन करताना खालील तत्त्वे विचारात घेता येतील.

१) गुन्हा करणारा माणूस मानसिकदृष्टचा प्रक्षुब्ध झालेला असतो, त्यामुळे त्याचा स्वत च्या वर्तनावर फारसा ताबा राहिलेला नसतो.

२) जो माणूस इतरांना दु.ख देतो त्यानेही तसे दुःख सोसलेच पाहिजे, असा काही या विश्वातील त्रिकालाबाधित सिद्धांत नाही. हा न्याय असेल तर तो मानवाने निर्माण केलेला आहे व तो भावनिकदृष्टचा विकृत माणसाबद्दल अमलात आणण्याचे कारण नाही.

३) शासन करण्यामुळे माणूस काही शिकतोच असे नाही किंवा शासनाच्याच्या भीतीमुळे माणूस गुन्हा करण्यापासून परावृत्त होतो असेही नाही.

४) शासन केल्यामुळे काही फायदे होतात. त्यामुळे गुन्हेगारांना तुरुंगात ठेवून त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करणे फलदायी ठरेल.

५) मानसिकदृष्टचा विकृत नसलेल्या माणसाने जर क्रोधाच्या भरात स्वत.च्या बायकोचा खून केला तर त्या कृत्याच्या विपरित परिणामांमुळे तो इतकी हाय खातो की, परत तसे कृत्य करण्यास तो कधीही धजावत नाही. अशा माणसाला योग्य शासन करणे काही वेळा शहाणपणाचे ठरेलही; परतु त्याच्या अविवेकी दृष्टिकोनामुळे जीवनातील वैफल्य सहन करण्याची त्याची कुवत फार मर्यादित झालेली असते व म्हणून त्याच्यावर मानसोपचार करणे जास्त परिणामकारक ठरेल. उलट, त्याला कठोरपणे शिक्षा केली तर तो अधिकच बिघडू शकेल.

६) माणसाला त्याच्या वर्तनाबद्दल शासन करणे आणि माणसाचा व्यक्ती म्हणून द्वेष व धिक्कार करून त्याला शिक्षा करणे यात फरक आहे माणसाचे वर्तन कितीही अनिष्ट असले तरी त्यावरून त्या संपूर्ण माणसाचे मूल्यमापन करून त्याचा व्यक्ती म्हणून तिरस्कार करणे तर्कसंगत ठरत नाही.

७) माणूस प्रमादशील असतो. त्यामुळे माणसाने चूक करताच कामा नये व त्याने चूक केलीच तर त्याची पूर्णपणे निर्भर्त्सना करून तो जणू काही नरकात फेकून देण्याच्या योग्यतेचा माणूस आहे, असे समजणे हे अवास्तव विचारसरणीचे द्योतक आहे.

८) माणसाचा तिरस्कार करून त्याला शिक्षा केली तर त्याचे वर्तन सुधारण्याऐवजी अधिकच बिघडते असे वारंवार प्रत्ययास येते. शिवाय गुन्हेगारांना तुरुगात क्रूर स्वरूपाच्या अनेक बेकायदेशीर शिक्षा देण्यात येत असतात, हे काही मोठे गुपित नाही.

९) माणूस अनिष्ट वर्तन करण्यास उद्युक्त होतो याच्या मुळाशी सामान्यतः तीन कारणे संभवतात. ती तीन कारणे म्हणजे, माणसाची बौद्धिक मर्यादा, अज्ञान व भावनिक प्रक्षुब्धता. त्यामुळे अनिष्ट वर्तन करणाऱ्या माणसाचा तिरस्कार करून बहुधा त्याच्यात काहीच सुधारणा घडून येत नाही.

१०) माणसाला स्वत.बद्दल अथवा इतरांबद्दल वाटणारा विद्वेष हा बहुतेक सर्व तऱ्हेच्या भावनिक प्रक्षुब्धतेस कारणीभूत असतो आणि खून करणारा माणूस भावनिकदृष्टचा कमालीचा प्रक्षुब्ध असल्यामुळे त्याचा द्वेष करून त्याला शिक्षा केली तर तो ज्यानी त्याला शिक्षा केली असेल त्यांचा अधिक द्वेष करू लागतो अशा प्रकारे अधिकच प्रक्षुब्ध झाल्यामुळे तो पुन्हा गुन्हा करण्यास प्रवृत्त होतो.

साराश, माणसाने केलेल्या गुन्ह्याबद्दल त्याचा व्यक्ती म्हणून तिरस्कार करून त्याला शिक्षा करणे जसे बरोबर नाही तसेच एखाद्या गुन्हेगाराने दुसऱ्या माणसाचा खून करून त्या माणसाचा जगण्याचा अधिकार नष्ट केला म्हणून समाजाने उलट त्या गुन्हेगाराला फाशी देऊन त्याचा जगण्याचा अधिकार नष्ट करावा हे योग्य नाही शिवाय

माणसाचा कोणताही एखादा गुणविशेष अथवा वर्तन इतके गर्हणीय असते की, त्यामुळे त्या संपूर्ण माणसाचा नायनाट करणे समर्थनीय ठरते, हे तत्त्व मान्य केले तर फार धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ शकते. कारण माणसाच्या कोणत्या गुणविशेषाबद्दल अथवा वर्तनाबद्दल त्याला फाशी देऊन त्याचा जगण्याचा अधिकारच नष्ट करणे न्याय्य आहे, हे कोण ठरवणार ? किंबहुना, वरील तत्त्व मान्य केले तर आपल्यापैकी कोणता माणूस सुरक्षित राहील ? म्हणून खून करणाऱ्या गुन्हेगाराला काही शासन करून बंदिवासात ठेवले तरी त्याच्यावर योग्य उपचार करून त्याला सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## समंजस दृष्टिकोण

फाशीची शिक्षा योग्य नाही, असे मत व्यक्त केले की, काही लोकाना असे वाटते की, असे मत फक्त हस्तिदंती मनोऱ्यात बसून बोलणाऱ्यानाच सुचू शकते. परंतु ज्या माणसाचा खून होतो त्याच्या नातेवाइकाना व इतर आप्तेष्टांना असा विचार कधीच सुचणार नाही ! उलट, हा आक्षेप वस्तुस्थितीवर आधारलेला नाही, असे काही उदाहरणांवरून दिसून येते. रॉबर्ट एफ. केनडी यांचा खून करण्याबद्दल सिऱ्हान या गुन्हेगाराला जेव्हा मृत्युदंडाची सजा फर्माविण्यात आली तेव्हा सिनेटर एडवर्ड एफ. केनडी यांनी न्यायालयाला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते की, आपला मृत्यू ही गोष्ट दुसऱ्या माणसाचा जीव घेण्याचे कारण व्हावी ही घटना माझ्या भावाला रुचली नसती.

या संदर्भातील दुसरे उदाहरण अधिक बोलके आहे. १९५९ साली पेनिसिल्व्हानिया विद्यापीठातील प्राध्यापक ॲनातोल होल्ड यांच्या साडेतीन वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून तिला ठार मारून टाकणाऱ्या गुन्हेगाराला जेव्हा पकडण्यात आले तेव्हा त्यांनी 'फिलाडेल्फिया बुलेटिन' या नावाच्या नियतकालिकात लिहिलेले पत्र फारच उद्‌बोधक आहे गुन्हेगाराला न्यायालयात उभे करावे, त्याच्यावर मानसोपचार करावा, परंतु त्याला फाशी देऊ नये, असे मत त्यांनी व्यक्त केले. कारण त्यांच्या मते, त्यांच्या मुलीची हत्या करणारा गुन्हेगार विकृत माणूस असला पाहिजे व स्वतःबद्दल वाटणाऱ्या न्यूनत्वाच्या व हीनत्वाच्या भावनेमुळेच त्याने असे कृत्य केले असले पाहिजे. आणि पुढे ते असेही म्हणतात की, जर तो गुन्हेगार ते निंद्य कृत्य करताना मला सापडला असता तर त्याला ठार मारावे असे मला वाटले असते. परंतु आता जी गोष्ट घडली आहे ती बदलता येणार नसल्यामुळे मी आता त्या गुन्हेगाराला मदत करू इच्छितो. आपण आपल्या मनात सूडाच्या रानटी भावनेला थारा देता कामा नये. इतके ज्याने मानवी—म्हणजे प्रमादशील—वर्तन केले आहे त्याला आपण मदत करू या.

## परिवर्तन-स्वप्न की सत्य ?

आता अखेर एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करावयास हवा. तो प्रश्न म्हणजे, गुन्हेगारावर मानसोपचार करून त्यांना सुधारता येणे शक्य आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विविध तऱ्हेचे उपचार करून काही गुन्हेगाराना कसे सुधारण्यात आले आहे, त्याची माहिती या ग्रंथात दिली आहे अर्थात, विवेकनिष्ठ मानसोपचार पद्धतीचा अवलंब करून खून करणाऱ्या गुन्हेगारांवरही उपचार करण्याचे तंत्र विशद करण्यावर लेखकानी अधिक भर दिलेला आहे.

एखादा माणूस त्याच्या जन्मजात स्वभावामुळे व त्याने कळत नकळत स्वीकारलेल्या कमालीच्या अविवेकी जीवन-तत्त्वज्ञानामुळे प्रक्षुब्ध होऊन खून करावयास कसा प्रवृत्त होतो, हे आपण पाहिलेच आहे. साहजिकच त्याच्यावर उपचार करावयाचा म्हणजे, प्रथम त्याला त्याच्या मनातील अविवेकी जीवन-तत्त्वज्ञानाची जाणीव करून देणे. त्यानंतरची पायरी म्हणजे, त्याच्या सदोष जीवन-तत्त्वज्ञानावर हल्ला करून ते कसे अविवेकी आहे, हे त्याला समजावून देऊन त्याला त्याच्या या अविवेकी जीवन-तत्त्वज्ञानाचा त्याग करावयास मदत करणे. आणि अखेरची पायरी म्हणजे, त्याला अधिक विवेकी जीवनतत्त्वज्ञान अंगीकारण्यास मदत करणे.

अर्थात, मानसोपचाराची ही पद्धत वापरून गुन्हेगारांच्यात काही एकदम चुटकीसरशी सुधारणा घडवून आणता येत नाही. म्हणून खून करणाऱ्या गुन्हेगारांवर या पद्धतीने उपचार करण्याच्या तंत्राची उकल करून दाखविण्यासाठी तीन गुन्हेगारावर उपचार कसे केले त्याची विस्तृत माहिती या ग्रंथात दिली आहे. या विस्तृत माहितीत विवेकनिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ व गुन्हेगार याच्यातील प्रत्यक्ष संवादाचा अंतर्भाव केला आहे. या तीन उदाहरणापैकी एका स्त्री-गुन्हेगारात परिवर्तन घडून ती परत सर्वसामान्य माणसांसारखे जीवन जगत आहे, असे दिसते. उरलेल्या दोन गुन्हेगाराच्या बाबतीच काही कारणामुळे मानसोपचाराची मजल प्राथमिक अवस्थेपुढे जाऊ शकलेली नाही, असे दिसून येते. तथापि विवेकनिष्ठ मानसोपचाराचे तंत्र समजावून घेणाऱ्या दृष्टीने ही तिन्ही उदाहरणे फारच उपयुक्त ठरतात.

डॉ. अल्बर्ट एलिस व जॉन एम. ग्युलो याच्या ग्रंथातील मुख्य आशयाची रुपरेषा ही अशी आहे. या अगदी स्थूल रुपरेषेवरूनही फाशीची शिक्षा रद्द करावी व खून करणाऱ्या गुन्हेगारालाही सुधारण्याचे प्रयत्न करावेत, या मताला विवेकनिष्ठ मानसोपचारशास्त्राच्या दृष्टिकोणातून कसा दुजोरा मिळतो हे समजण्यास मदत होईल, अशी आशा वाटते. □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. विवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पुस्तके

# एका राष्ट्राचा मृत्यू

## – अफगाण डायरी

भारतीय सीमेवरच्या अफगाणिस्तानात घुसून कम्युनिस्ट रशियानं ह्य ह्य म्हणता तो देश घशात घातला. हे आक्रमण वा तथाकथित ' लाल क्रांती ' घडत असताना मराठी लेखिका प्रतिभा रानडे या खुद्द काबूलमध्येच होत्या. एका ' राष्ट्राचा मृत्यू ' डोळयानं बघत होत्या. घडणाऱ्या भीषण घटना डायरीत टिपून ठेवीत होत्या. त्या डायरीवर आधारलेलं पुस्तक म्हणजे– ' अफगाण डायरी !' मुखपृष्ठावर या पुस्तकाची करून देण्यात आलेली ही ओळख आणि यातूनच अफगाणिस्तानमधील घडामोडीबाबत लेखिकेचा दृष्टिकोन स्पष्टपणे विशद होतो.

' ज्यांनी फार फार सोसलंय, अजूनही सोसत आहेत, त्या माझ्या अफगाण मित्र-मैत्रिणींना ' हे पुस्तक अर्पण करून, लेखिकेनं आपल्या पुस्तकाची सुरवात केली आहे. प्रथमच अफगाणिस्तानमध्ये गेल्यावर, तेथील रीतीरिवाज, लोकसंस्कृती, जीवनमान याबद्दल जाणवलेला नवेपणा हळुवारपणे मांडून लेखिकेनं या देशाचं ऐतिहासिक, राजकीय–सामाजिक चित्रण विस्तृतपणं रेखाटलं आहे.

यानंतर पुस्तकाच्या मूळ गाभ्याला सुरवात होते. सोविएत आक्रमणाच्या वर्णनाची मालिका अतिशय सविस्तरपणे मांडून लेखिकेनं त्यात विविध प्रसंग उभे केले आहेत. रशियाचं पहिलं आक्रमण, खुनाची मालिका, क्रांतीचे दिवस, क्रांतीची वाटचाल आदी प्रकरणातून अफगाण सत्ताधिशामधील सत्तासंघर्ष व त्यातील सोविएत सैन्याचा प्रभाव आदींचा बारीकसारीक तपशील देऊन मांडणी केली आहे. तेथील सर्वसामान्य जनता या सत्तासंघर्षापासून पूर्णतः अलिप्त होती; किंबहुना या सत्तासंघर्षाबाबत जनतेत घृणा, तिरस्कार निर्माण झाल्याचं वर्णन लेखिकेनं विविध उदाहरणं मोठ्या चपखलपणे देऊन केलं आहे.

विशेषतः, सोविएत सैन्य काबूलमध्ये जेव्हा दाखल झालं, तेव्हा शहरातील परिस्थिती मोठ्या रंजकपणे लेखिकेनं उभी केली आहे; परिस्थितीतील अनेक बारकावे अचूकपणे टिपले आहेत. तेव्हाचं वातावरण तर अगदी जिवंतपणं उभं केलं आहे. सोविएत सैन्याबद्दलही बरंच सविस्तर लिहिलेलं आहे. त्यातील अनेक बाबी मोठ्या हिकमतीनं टिपल्या असल्याचं लिखाणात जाणवतं. याशिवाय, तेथील अनेक वृत्तपत्रं, रेडिओ, टीव्ही या प्रचारमाध्यमातून येणाऱ्या विविध वार्तांचे सातत्यानं अर्थ लावून, परिस्थितीचा अंदाज घेत राहण्याचं कामही लेखिकेनं केलं आहे.

या काळातील तेथील आपल्या प्रदीर्घ वास्तव्यात प्रतिभा रानडे यांनी, अनेक ' कॉमन मॅन्स 'शी जवळीक साधली; त्यांची या क्रांति–प्रक्रियेबाबतची मतं अजमावली; त्यांच्याशी सागोपाग चर्चा केल्या. त्यांना बोलतं केलं. लेखिकेचा पती मुकुंद रानडे यांची, विविध प्रकारे तेथे मदत झाल्याचे संदर्भही पुस्तकात आहेत. या साऱ्या जिवंत माणसांच्या बोलण्यातून तेथील परिस्थितीचं मूल्यमापन करण्याचा प्रयत्न लेखिकेनं केला आहे.

त्यांनी सातत्यानं लिहिलेल्या रोजनिशीच्या आधारावर हे पुस्तकरूपी लिखाण पूर्ण केल्यानं, एकूण लेखनशैलीस ' डायरी लिखाणाचा ' स्पर्श मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो. लिखाणाची शैलीही खूप ओघवती आहे. तसंच, विविध संभाषणामुळं ही डायरी ' जिवंत 'ही वाटते !

मात्र या साऱ्या लिखाणात, तेथील घडामोडीबाबतचा दृष्टिकोन सातत्यानं डोकावत राहतो. अफगाणिस्तानमध्ये सोविएत सैन्यानं आक्रमण केलं आहे हा लेखिकेचा आधारभूत दृष्टिकोन असल्यानं, निवडलेले प्रसंग व बातम्या यांनाही मर्यादा पडल्या आहेत. संपूर्ण लिखाणाचा वैचारिक एकसुरीपणा कायम राखण्यासाठी काही अंशी अशा पद्धतीची मर्यादा स्वीकारली जाणं अपरिहार्य मानलं तरी संपूर्णतः अशा पद्धतीची मर्यादा स्वीकारणं, हे तत्कालीन परिस्थितीचं सम्यक दर्शन घडविण्याच्या प्रक्रियेत निश्चितपणे अडथळा आ णणारं असतं. त्यामुळेच, बिगरकम्युनिस्ट विकसित देशामध्ये, अफगाणिस्तानबाबत ज्या तऱ्हेचं वृत्तलेखन प्रकाशित झालं आहे वा होत आहे, त्याच पद्धतीचं हे पुस्तक लिहिलं गेल्याचं मानावं लागतं. तसंच, एका ' राष्ट्राचा मृत्यु' असा खोल व गंभीर आशय पुस्तकास देऊन तेथील संपूर्ण घडामोडींचं चित्रण व वर्गीकरण करताना, काही सैद्धांतिक पातळीवर त्याचा ऊहापोह होणंही आवश्यक असतं. त्याचा या पुस्तकात अभाव आढळतो.

### महासत्तांमधील संघर्ष

मध्यपूर्वेच्या देशांमध्ये गेला काही काळ उलथापालथ सुरू आहे, संघर्ष सुरू आहेत. अरब विरुद्ध इस्रायल, तेल निर्यात करणारे देश विरुद्ध सर्व बिगरकम्युनिस्ट जग, इराण मधील रक्तरंजित क्रांती, अमेरिकन ओलीस प्रकरणी इराण–अमेरिका संघर्ष, लेबाननमधला ख्रिस्ती व डाव्या गटामधला संघर्ष आणि अफगाणिस्तान या साऱ्यांतून असं दिसतं की, जगातल्या संघर्षाचा बिंदू आग्नेय आशियातून आता मध्यपूर्वेत सरकला आहे. काबूलमध्ये घडणाऱ्या घटना केवळ अफगाण लोक आणि सोविएत युनियन यांच्यातली बाब नाही. त्याच्यात अमेरिका, पाकिस्तान, इराण व चीन गुंतलेले आहेत.अफगाणिस्तानमधल्या सोविएत हस्तक्षेपाचा अर्थ लावायचा तर दोन गोष्टी पाहिल्या पाहिजेत. एक तर, अफगाण जनतेच्या दृष्टीनं या घटनाचा अर्थ काय होतो आणि दुसरं म्हणजे, आंतरराष्ट्रीय सत्ता-संघर्षाच्या संदर्भात त्याचा अर्थ काय होतो ?

अफगाण जनतेच्या दृष्टीनं पाहिलं तर तिच्यासमोर दोन पर्याय आज आहेत. एकीकडे सरंजामी मागासलेपणा व जुलूम, बुर-

सटलेल्या धर्मवेडाची व मुल्लांची सत्ता, जी आधीच मुस्लिम जगतातल्या इराण, पाकिस्तान इत्यादी देशांमध्ये आपलं क्रूर स्वरूप उघड करून आज दाखवत आहे; दुसरीकडे, शोषणाच्या जुन्या पद्धतीचा नायनाट, अन्न, वस्त्र, निवारा, औषधपाणी व शिक्षण यांची सोय, नोकरीची हमी; आधुनिकीकरण व औद्योगिकीकरण ! या दोन्ही पर्यायांमध्ये जनतेची खरीखुरी लोकशाही नाही, समाजवादाकडे खरी वाटचाल नाही, पण प्रत्यक्ष जीवनात निवड ही आत्ता, या क्षणी व प्राप्त परिस्थितीतच करावी लागते.

दुसरा भाग म्हणजे, आतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात बघतानादेखील जोपर्यंत महासत्तांमधला झगडा, प्रभाव-क्षेत्रासाठी चाललेली त्याच्यातील स्पर्धा ही एक जगातल्या राजकारणातील वस्तुस्थिती आहे तोपर्यंत आपण या संदर्भात नि.पक्षपाती राहूच शकत नाही. एकीकडे अमेरिकेच्या दबावाला शरण जाणं व तिच्या भू–राजकीय धोरणांना पाठिंबा देणं म्हणजे मूलत: शोषणावर आधारित साम्राज्यवादाचा स्वीकार करणं किंवा निदान त्याच्याशी समन्वय साधणं होईल; तर दुसरीकडे, सोविएत युनियन समाजवादी समाजाच्या कल्पनेतला आदर्श देश नाही. जगातल्या कित्येक कम्युनिस्टांना, सोविएत युनियनला आपल्या क्रातिकारक लढ्यातला बंधू म्हणून स्वीकारणं मान्य होण्यासारखं नाही, यातही काही शका नाही. सोविएत युनियनचे परराष्ट्रधोरण मुख्यत: स्वत.च्या राष्ट्रीय हितसंबंधाच्या जोपासनेभोवती फिरते, हेही खरे. पण वस्तुनिष्ठदृष्ट्या हेदेखील खरंच आहे की, जगातल्या जनतेच्या लढ्याना सर्वत्र सोविएत युनियनने मदत केली आहे. आफ्रिकेत अंगोला, मोझांबिक, इथिओपिया, दक्षिण आफ्रिका व ऱ्होडेशिया, मध्यपूर्वेत झिऑनिस्ट इस्राएली शक्तिविरुद्धचा पॅलेस्टाइनी जनतेचा लढा आणि आशियातील व्हिएतनामचा साम्राज्यवादाविरुद्धचा गौरवशाली लढा ही उदाहरणं या वास्तवाची साक्ष आहेत.

### एकांगीपणाची झालर !

आतरराष्ट्रीय पातळीवरील वर्गसघर्षानं व राजकारणानं आज गुतागुतीची परिस्थिती निर्माण केली आहे नवेच प्रश्न अभ्यासासाठी उभे केले आहेत. पण अभ्यास चालूच असतो. प्रश्न फक्त, इथे लगेच भूमिका घेण्याचाच असतो आणि मग आज निवड एवढीच उरते– एकीकडे अमेरिका, नाटो, खोमेनी, शिया, लष्करशाही, हुकुमशाही, मागास धर्मनिष्ठा, बुरसटलेपणा व सामाजिक प्रगतीचा अभाव; आणि दुसरीकडे अफगाणिस्तानात आज घडत आहे त्या प्रकारचे परिवर्तन ! अफगाणिस्तानात जनतेची खरोखरी क्रातिकारक चळवळ नव्हती व आजही नाही; अशा स्थितीत तिसरा पर्याय उपलब्ध नाही.

असा हा व्यापक राजकीय मूल्यमापनाचा प्रयत्न प्रतिभा रानडे यांच्या 'अफगाण डायरी'त दिसून येत नाही त्यामुळेच त्यास वैचारिक एकांगीपणाची झालर लागली आहे. तरीही असं म्हणता येईल की, अफगाणिस्तानमधील त्या काळातील घटनाची माहिती मराठीत या पुस्तकामुळं बऱ्याच मोठ्या प्रमाणात मिळते; शेवटी या घटनांच्या व लेखनमांडणीच्या आधारे अर्थ काढण्यास प्रत्येकजण मोकळा आहेच !

*

**अफगाण डायरी**
लेखिका : प्रतिभा रानडे
प्रकाशक : कॉन्टिनेंटल प्रकाशन
पृष्ठे : २१५. किंमत २३ रु.

## फिनिक्स निवड

# Books In Offing

प्रेसिडेंट रीगन यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी एक आत्मचरित्र लिहिले होते. त्याचे नाव 'Where Is The Rest of Me ?' असे होते. आता अर्थात् ते अध्यक्ष झाल्यानंतर रीगन यांच्या पुस्तकाला मागणी वाढल्यानंतर प्रकाशकाने दुसरी आवृत्ती काढण्याचा लगेच निर्णय घेतला, पण गंमत काय ? अमेरिकेत ग्रंथालयीन व्यवस्था चोख व कार्यक्षम असूनही त्या पुस्तकाची एकही कॉपी सापडेना ! रीगननी हे पुस्तक रीचर्ड जी. हब्लर यांच्या साहाय्याने लिहिले होते. अर्थात् ते १९६५ च्या कालखंडापर्यंत आहे; शेवटी तिकडील एकाद्या 'फिनिक्स'मध्ये (म्हणजे अॅरिझोनातलं नव्हे !) कशीबशी एक कॉपी मिळाली. एव्हाना 'डेल' या प्रख्यात पेपरबॅक प्रकाशकाने काढलेली या नवीन पुस्तकाची आवृत्ती विक्रीला आली असेलही.

श्रीमती रीगन यानीही एक आत्मचरित्र लिहिले आहे. त्याचं नाव आहे 'नॅन्सी'. ते या महिन्यातच बाजारात येणार आहे. त्याच्या आत्मचरित्रात श्रीमती रीगनना 'आफ्टर थॉटस्' आल्याने त्यांनी एक नवीन प्रकरण टाकले आहे.

माजी 'पी-नट प्रेसिडेंट' जिमी कार्टर यांना पुस्तकीय बाजारात फार भाव आला आहे. त्याच्या आठवणी १९८२ च्या अखेरीला बॅंटम ही प्रकाशनसंस्था प्रकाशित करणार आहे. १९८३ मध्ये त्यांच्या या आठवणीचे पेपरबॅक निघेल. पेपरबॅकचे हक्क दिल्यानंतर लेखकांना बरकतच बरकत असते ! कार्टर हे R & D (Research & Development) या क्षेत्रात सल्ला ,मिळविण्यासाठी प्रीस्टन येथे गेले होते. तिथे त्यानी पाच हजार पानाची टिपणे केली होती. त्याचा गोपनीय अहवाल या पुस्तकात असेल !

पॉल अर्डमन हे एक अमेरिकेतील 'हाय फायनान्स'वर लिहिणारे लेखक. त्यांची 'द क्रॅश ऑफ सेव्हंटी–नाइन,' 'सिल्व्हर बेअर्स' व 'बिलियन डॉलर कीलिंग' ही अत्यंत गाजलेली पुस्तके ! जगप्रसिद्ध 'फॉर्च्यून' मासिक ज्याना आवडतं, त्याना अर्डमन याची पुस्तकं तर अत्यंत आवडतात. थ्रिलर्समध्येही आता स्पेशलायझेशनचे युग सुरू झाले आहे ! ऑकल्ट थ्रिलर्स, पोलिटिकल थ्रिलर्स, फायनान्शियल थ्रिलर्स, सायंटिफिक थ्रिलर्स, सायकॉलॉजिकल थ्रिलर्स, मेटाफिजिकल थ्रिलर्स असे कैक थ्रिलर्स बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असतात ! यातील थ्रिलरचा अमुक एकच प्रकार अधिराज्य गाजवतो, असे नसते; परंतु लेखकाच्या कौशल्यामुळे तो विषय अधिराज्य गाजवत असतो. 'एक्झॉर्सिस्ट' हे ऑकल्ट थ्रिलर ब्लॅटिंगमुळे गाजले. अर्डमनची फायनान्शियल थ्रिलर्स त्याच्या लोभस शैलीमुळे व कथानकामुळे गाजली. त्याच्या नवीन पुस्तकाचे नाव असेल 'द लास्ट डेज ऑफ अमेरिका !' हे एक अत्यत गमती-

दार, विश्वसनीय व ऑथेंटिक पुस्तक होणार आहे, यात वाद नाही. ज्याच्यामुळे आर्थिक गंडांतर येते त्याची ही एक कथा आहे. बोर्ड व बँक-रूम्समध्ये जेथे उच्चस्तरीय आर्थिक विषयावर निर्णय घेतले जातात त्यांची वर्णनें अत्यंत वाचनीय आहेत. आर्थर हेली वाचून वाचून ' पुरे झाला आर्थर हेली आता ', असे म्हणणाऱ्या वाचकांसाठी पॉल अर्डमन हे लेखक उदयास आले आहेत.

' जेव्हा जेव्हा अराजक माजेल तेव्हा तेव्हा एक महापुरुष जन्माला येतो ', असा एक समज आहे. साहित्य क्षेत्रातसुद्धा कधीकधी अराजक घोघावते. कुठे गेलेत हे आर्यावग वॅलेस, अॅलीस्टेअर मॅक्लिन, आर्थर हेली ? एके काळी ज्याच्या पुस्तकांचं अधिराज्य होतं त्या सर्व लेखकाना काय झालं ? आटलेत ते ? म्हातारे झाले ? पुष्कळ चागलं लिहून दमलेत ? अर्ल स्टॅनले गार्डनर, लेस्ली चार्टेरीसच्या पाऊलवाटेने ते गेले ! आता त्याना निवृत्त होऊ द्या. यंग ब्लडना जागा द्या ! साहित्याच्या क्षितिजावर अनेक नवनवे तारे उगवत आहेत. .The old order changeth, giving place to the new, या न्यायाने आम्ही ' फिनिक्स 'मध्ये नवीन लेखक धुडाळत असतो.

बेल्वा प्लेन (काय पण नाव !) हिचे वर्णन एक अप-अँड-कमिंग लेखिका असेच करावे लागेल. त्याच्या ' एव्हरग्रीन ' व 'रँडम विन्डस् ' या दोन कादंबऱ्याना पुष्कळ 'उठाव' होता. त्यांची ' एव्हरग्रीन ' कादंबरी ही एका ज्यू बाईची रॅग्ज टू-रिचेस कथा आहे, तर ' रॅन्डम विन्डस् ' ही एक सर्वंकष डॉक्टर-कुटुंबाची कहाणी आहे. ज्या घरात अती डॉक्टर आहेत, त्यानी हे पुस्तक अवश्य वाचावे. यात एक न्यूरोसर्जन आपले करिअर डॉक्टर बापाची साधी प्रॅक्टिस साभाळण्याकरिता झुगारून देतो. आपल्या गावातील सर्वांत श्रीमंत माणसाच्या सुदर मुलीच्या प्रेमात तो पडतो; परंतु ती पुढे एका गर्भश्रीमत इंग्रजाशी लग्न लावते. ही अप्रतिम कथा तिसऱ्या पिढीत घुसते. ती वाचकाला इतकी अपीलिंग वाटते की, एका समीक्षकाने या पुस्तकाला ' द फॉरसाइट सागा ' व ' एरो स्मिथ ' या दोन पुस्तकाचा अपूर्व सगम, असे संबोधले होते. या कादंबरीमागील वैद्यकीय पार्श्वभूमी खरी आहे. सौ. बेल्वा प्लेनचे वडील व यजमान, दोघेही डॉक्टर आहेत.

श्री. आयर्विंग स्टोन यांच्या पुढच्या पुस्तकावर वाचकाचे डोळे रोखलेले असतात. त्याच्या चरित्रात्मक कादबऱ्या नेहमीच वादग्रस्त व्यक्तीशी निगडित असतात. विन्सेंट व्हान गॉग, सीग्मंड फ्रॉइड, मायकेलँजेलो या व्यक्तीवरील त्याच्या कादबऱ्या बहुतेक वाचकाना माहिती आहेतच. श्री. स्टोन सध्या पंचाहत्तरीचे असतील. ते एक पुस्तक लिहायला सुमारे चार वर्षे खपतात. या वयात त्यानी 'डबल-डे' या प्रकाशनसंस्थेशी आणखीन दोन–तीन पुस्तके लिहून देण्याचे कॉन्ट्रॅक्ट केले आहे. हे तसे नियतीशीच केलेले कॉन्ट्रॅक्ट आहे ! अजून दहा–बारा वर्षे तरी ही पुस्तके लिहिण्यासाठी ते जगोत ! त्याचे पुढील पुस्तक चार्लस डार्विनवर (' सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट 'वाले) आहे. त्यानी ह्या पुस्तकाचे हस्तलिखित ' डबलडे 'कडे पाठवलेही आहे. त्याचे नाव आहे ' दि ओरिजिन्स : अ बायोग्राफिकल नॉव्हेल ऑफ चार्लस डार्विन.' ही कादंबरी ' फिनिक्स 'मध्ये दाखल होणार आहे. वयाच्या बाविसाव्या वर्षी डार्विन कॅंब्रिज सोडून ' द बीगल ' या संशोधन करणाऱ्या बोटीवर एक बोटॅनिस्ट म्हणून कामाला लागले. ही बीगल त्या वेळेला लॅटिन अमेरिकेमध्ये नकाशे काढण्यासाठी निघाली होती. दोन वर्षांकरता निघालेली ही तुकडी तेथे पाच वर्षे राहिली. डार्विन जे परतले ते फेमस होऊनच ! युकेडोरजवळच्या गलापागोस बेटावर डार्विनने सशोधन केले. तेथे त्यानी सबध मानवजातीच्या उत्क्रांतीच्या इतिहासालाच गवसणी घातली. ' गलापागोस ' हा स्पॅनिश शब्द आहे. त्याचा अर्थ ' कासव ' असा होतो. जायन्ट टॉरटॉइझ आता फक्त इथेच शिल्लक आहेत.

१९ व्या शतकात डार्विन, हक्स्ले आणि वेजवुडस् ही तिन्ही विचारवत कुटुबे या ना त्या नात्याने जोडलेली होती

ही सर्व माहिती गोळा केल्यावर इ. स. १९८२ मध्ये ' फिनिक्स 'ने बरीच पुस्तके विकत घेण्याचे ठरवले आहे. पुस्तक निर्मितीचा व खरेदीचा (अर्थात बजेटमुळे) ग्राफ अशा काही इरॅटिक पद्धतीने खाली-वर होत असतो की, कधीकधी पुस्तकनिर्मितीला उतरती कळा लागली आहे, का या क्षेत्रात बरकतच बरकत आहे, हे कळेनासे होते.

— जे. एन्. पोंडा

दोन खास विशेषांक

## येवले तालुका विशेषांक

येवल्याच्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयाने काढलेला ' येवले तालुका विशेषांक ' वाचला. अंक खरोखरच विशेष आहे. खेड्यातल्या भारताची ओळख या विशेषांकाच्या निमित्ताने करून दिली आहे या विशेषांकाच्या संपादकीय लिखाणात म्हटले आहे, ' इतिहास घडविणारी शक्ती असते, काबाडकष्ट करणारा सामान्य माणूस. कारण त्याच्या श्रमातून नि घामातून तो निर्माण करतो संपत्ती. त्याचा आनंद आणि आक्रोश यातून उभी रहाते संस्कृती. '

संपत्ती आणि संस्कृती निर्माण करणाऱ्या सामान्य माणसाच्या, कष्टकऱ्याच्या जीवनाचा हा विशेषांक आहे. तो ज्या उत्पादनाच्या हत्यारानी पोट भरतो ती साधनं' ग्रामीण जातिव्यवस्था त्याला जो आर्थिक, सामाजिक दर्जा देते तिचे स्वरूप, सांस्कृतिक संघर्ष आणि समन्वय व्यक्त करणाऱ्या देव आणि धर्मश्रद्धा याचा वेध घेण्याचा प्रयत्न या विशेषांकात केला आहे.

विशेषांकाची सुरुवात होते येवल्याच्या इतिहासापासून. अंकाई–टंकाईचे किल्ले नि जैन लेणी म्हणजे येवल्याच्या इतिहासाचे पाषाणरूप शिल्प सरंजामी समाजव्यवस्थेतील राजकीय आणि लष्करी प्रेरणातून ' एणकाई दुर्ग ' उभा राहिला. तर महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक जीवनात जैन धर्माने उसळवलेल्या धर्मप्रेरणा घेऊन जैन लेणी आकाराला आली. एणकाई दुर्गाची आणि जैन लेण्याची छायाचित्ररूपाने ओळख करून देऊन विशेषांक तालुक्याच्या चेहऱ्यामोहऱ्याकडे वळतो.

तालुक्याच्या विकासात त्याची भौगोलिक रचना अर्थातच महत्त्वाची आहे. येवल्याच्या भौगोलिक रचनेचे या अंकात अतिशय बारकाईने चित्रण केले आहे. तालुक्यात बारमाही नदी नसल्यामुळे पाणीपुरवठा विषम स्वरूपाचा आणि खडित झालेला आहे, हे सिद्ध करणारे कित्येक नकाशे आणि आलेख या भागात आहेत. कोणताही झटपट निष्कर्ष न काढता पूर्ण माहितीच्या आधारावर

दिलेला हा भौगोलिक रचनेचा आलेख वाचनीय आहे. संपूर्ण माहिती मिळवण्यासाठी घेतलेले प्रयत्न पानापानावर जाणवतात. भूगोलाने विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण केले आहेत का आणि त्यावरील मार्ग काय, याचा विचारही या भागात केला आहे.

यानंतरचा भाग आहे, खेड्यातील सामाजिक जीवन. सरंजामी समाजव्यवस्थेच्या उबरठ्यावर उभ्या असलेल्या या तालुक्यात जातवार वस्त्या आहेत. या भागात नायगव्हाण, वाघाळे व हडपसावरगाव यांच्या वस्ती-रचनेच्या आकृती वानगीदाखल दिल्या आहेत. 'विखरणीला कुंभार, धनगर, मारवाडी, शेलार आणि इतर मराठे यांच्या वस्त्या परस्पराना खेटून आहेत. हडपसावरगावी माळी वस्ती व कोल्हयांची वस्तीच्या आळधा आहेत. सुताराचे एकच घर रिकामे व पडके गावाच्या काठावर आहे,' अशा प्रकारच्या वर्णनात्मक चित्रणातून सामाजिक रचनेची तत्काळ ओळख होते.

समाज आणि संस्कृती यांचं अविभाज्य नातं लक्षात ठेवून होळी, दसरा, आखाडी यासारख्या सांस्कृतिक सणाची माहिती, संस्कृती ज्यांनी नाकारली त्या दलिताचा मंदिरप्रवेश आणि एक पाणवठ्याची चळवळ या भागात आहे. तालुक्यातील अस्पृश्यता चित्रित करणारी असंख्य बोलकी छायाचित्रे मजकुरातली वास्तवता अबाधित राखतात.

या विशेषाकातला तिसरा महत्त्वाचा भाग म्हणजे 'खेड्यातील भारत'. तालुक्यातील खेड्याची स्वतंत्र ओळख या भागात आहे. खेड्यातील भारत विशेष लक्षात रहातो, तो सुरवातीच्या छायाचित्रांमुळे. कुंभार, सुतार, चांभार, चऱ्हाट व दोर वळणारे माग, मोटा विकणारे आणि चामडे कमावणारे डोहार. तालुक्यातली सर्वांत मोठी भटकी जमात म्हणजे वडारी, पारंपारिक शेतीव्यवस्थेत मालकी नसल्याने मजूर म्हणून जगणारे गोसावी, घिसाडी, जुने कपडे विकणाऱ्या कोमटी स्त्रिया हे खेड्यातले असंघटित कारागीर. सुरवातीच्या छायाचित्रातून हे व्यावसायिक जग प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभे रहाते. याशिवाय मुखेड, बाभुळगाव, कोटखेड, अंगुलगाव, नेऊरगाव, मैतापूरवाडी, मुरमी या व यासारख्या येवले तालुक्यातील बहुतेक सर्व छोट्या-मोठ्या खेड्याची सामाजिक, आर्थिक, भौगोलिक रचना समजावून देण्याचा यशस्वी प्रयत्न अकात केला आहे.

'येवले तालुका विशेषाक' वाचल्यावर वाटतं, या अंकात काय नाही ? येवल्याची बारीकसारीक माहिती ज्या खुबीने या अंकात गुंफली आहे ते पाहून अक्षरशः थक्क व्हायला होतं. कोणीही हा अंक मन लावून वाचावा आणि सरळ येवल्याचे रहिवासी बनून जावे.

या विशेषांकाची भूमिका मांडताना येवल्याच्या विद्यार्थी आणि शिक्षकांपुढे दोन-तीन प्रश्न होते. एक म्हणजे महाविद्यालयीन नियतकालिकांना आलेले कर्मकांडाचे स्वरूप. हे कर्मकांड बहुतेक वेळा फक्त 'उरकले' जाते. 'कर्मकांडा'ची ही रूढ चाकोरी नियतकालीके तोडू शकतील का ? दुसरी गोष्ट म्हणजे, शोषितांच्या जाती-जमातीच्या कथा आणि व्यथा बोलू लागल्या आहेत. या जखमी शब्दांना महाविद्यालयीन नियतकालिके आसरा देतील का ? आणि तिसरी गोष्ट म्हणजे, नियतकालिकाचा परिवर्तनाचे हत्यार म्हणून वापर करता येईल का ? दरवर्षी सक्तीने निर्माण कराव्या लागणाऱ्या या छापील मजकुराबद्दल येवल्याच्या मंडळीनी आस्थापूर्वक विचार केला. फक्त विचारच केला नाही तर त्या दृष्टीने सर्वांगीण प्रयत्न करून हा माहितीपूर्ण प्रबोधनात्मक विशेषाक उभा केला. हे सारं घडलं येवल्याच्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील उत्साही तरुण मुलं-मुली आणि त्यांना प्रोत्साहून देणारे शिक्षक यांच्या संघटित प्रयत्नातून ! खेड्यातला भारत प्रबोधनाच्या पाऊलखुणा जपतो आहे, याचंच हे प्रतीक नाही का ? ◻

## कलकत्याचा 'सागर'

महाराष्ट्राबाहेरच्या गावातून आणि शहरातून निर्माण झालेली 'महाराष्ट्रमंडळे' या स्वतत्र संस्था आहेत. एकीकडे मराठी मन जपण्याचा प्रयत्न, तर दुसरीकडे त्या त्या शहरातली सामाजिकता आत्मसात करण्याची धडपड. या समन्वयवादी भूमिकेतून ही महाराष्ट्र मंडळे आकाराला येतात.

कलकत्याच्या महाराष्ट्र मंडळातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'सागर' या वार्षिकाचा आठवा अक नुकताच प्रकाशित झाला. १९७४ पासून सातत्यानं 'सागर' प्रकाशित होत आहे. 'सागर'च्या या अंकाच्या सपादक आहेत मधुवंती शिदोरे. आपल्या संपादकीय लिखाणात त्या म्हणतात, 'कलकत्त्याच्या नवोदित लेखकाच्या लेखनगुणाना उत्तेजन देण्याचे तर आमचे धोरण होतेच, परंतु 'सागर' साहित्यिक व वैचारिक पातळीवर जास्तीत जास्त संपन्न करावे, हाही उद्देश होता.' या संपादकीय धोरणाशी 'सागर'चे व्यक्तिमत्त्व जुळणारेच आहे.

कलकत्त्यातले मराठी मन बंगाली भूमीत रुजले आहे, फुलले आहे. र. ग. महाजन यांच्या 'बंगाली-मराठी म्हणीची,नाती-गोती' या लेखातून हा दुवा सहज लक्षात येतो. प्रसिद्ध बंगाली कवयित्री स्नेहलता चट्टोपाध्याय यांच्या बंगाली कवितेचा मृणालिनी केळकर यांनी केलेला अनुवादही त्याचेच उदाहरण आहे. तसेच बंगाली व इतर भाषांमधून, मराठी साहित्याचे स्वरूप कितपत विस्तृत प्रमाणावर स्पष्ट झाले आहे, याची कल्पना देणारा डॉ. प्रभाकर माचवे याचा लेख, समर्थ रामदासांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त 'समर्थ-साहित्यावर' वेगळा प्रकाश टाकणारा श्री. बा. जोशी यांचा लेख, तर अपंग बालकाच्या व्यथित जीवनाची कल्पना देणारा कमल पालकर यांचा 'कोमजलेली फुले' हा लेख. वरील तीन लेखांनी 'सागर'ची वैचारिक घडण केली आहे.

'सागर'चं ललित आणि काव्यांगही वाचनीय आहे. ललित तरीही अर्थपूर्ण, असा वीणा आलासे यांचा 'अर्थवेधाचे आवर्त' हा लेख सुंदर उतरला आहे. कलकत्यातले दोन मराठी कलाकार म्हणजे चित्रकार वसंत पंडित आणि गायक श्रीकात बाम्मे. श्रीकांत बाम्म्याची ओळख नलिनी जोशीनी करून करून दिली आहे, तर 'चित्रकार मी असा झालो' असं वसंत पंडित स्वतःच सांगतात. याशिवाय विशेष उल्लेख करावा असे काही लेख म्हणजे, वसुधा जागिरदाराचा 'पिंपळ'. शि. म. निंबकरांचा 'जीवेत् शरदः शतम् !' आणि सरिता धनेश्वराचा १९८१च्या साहित्य शिबिराचा आढावा घेणारा लेख.

'सागर'च्या काव्यांगाबद्दल बोलायचं तर कवितांची संख्या मर्यादित वाटते; पण ज्या काही ७/८ कविता प्रसिद्ध केल्या आहेत त्या निश्चितच प्रत्ययकारी आहेत. 'तुझ्यासाठी', 'नव काव्य', 'एकच क्षण' आणि 'हायकू' विशेष लक्षात रहातात.

असे हे 'सागर'चे अंतरंग. ८१ च्या सागरच वैशिष्टय म्हणजे या वर्षी प्रथमच सर्व लेखकांची छायाचित्रे आणि परिचय दिले आहेत. त्यामुळे डॉ. प्रभाकर माचवे, वीणा आलासे यासारख्या बहुधा कधी न दिसणाऱ्या साहित्यिकांना या अंकात पहायला मिळालं.

'सागर' १९८१ मध्ये विविध साहित्य-प्रकारांचे पडसाद उमटावेत, असा संपादकाचा प्रयत्न दिसतो, परंतु या अंकात कविता, ललितलेखन, वैचारिक लेख आणि नर्म विनोदी साहित्याच्या हजेरीत दर्जेदार कथांची अनुपस्थिती मात्र जाणवते. ◻

## : कथासूत्र :

एरणगावच्या अप्पासाहेब चव्हाणांच्या मुलानं-मुकुंदरावानं कल्पनाच्या सौंदर्याला भुलून तिच्यावर जबरदस्ती केली. धास्तावलेलं देसाई कुटुंब मुंबईला दाखल झालं. गोळेच्या रूपाने त्यांना वेळोवेळी मदत करणारा मित्र भेटला. गोळेकडून आपल्या नवऱ्याने उसने पैसे घ्यावेत, हे कल्पनाला पटत नव्हतं. एकदा गोळेने ठेवायला म्हणून दिलेल्या हजार रुपयात शंभराची एक नोट जास्त आली. श्यामकांतच्या पोस्टाच्या हिशेबात घोटाळा झाल्याने ती नोट कल्पनाने श्यामकांतला दिली. हळूहळू आणखी दोन-तीन नोटा घरखर्चासाठी वापरल्या गेल्या. गोळे आला तर त्याला काय सांगायचं, या विचारानं कल्पना धास्तावलेली होती. एक दिवस तो कल्पनाला आणि नीलूला सिनेमाला नेण्यासाठी आला. त्याने पैशाची मागणी करू नये म्हणून ती अनिच्छेनेच त्याच्याबरोबर गेली. गोळेनं थिएटरमध्ये तिच्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला म्हणून ती संतापाने तिथून निघून गेली आणि कायमची अस्वस्थ झाली. तिची अस्वस्थता दूर करण्यासाठी शेजारच्या बढेकाकूंनी तिला अंगात येणाऱ्या सातोस्करकाकूंच्या मुक्तेश्वराच्या देवळात नेलं. तिथं जायला लागल्यापासून दोन-तीन शुक्रवार गेले तोच कल्पनाच्याही अंगात यायला लागलं. कल्पना लोकांना साक्षात देवी वाटू लागली ! नारळ, प्रसाद, साड्या, दक्षिणा सगळं ओघानं आलंच. या नवीन प्रकारामुळं कल्पनाची आर्थिक परिस्थिती मात्र सुधारली. त्यामुळेच त्या शुक्रवार-प्रकरणाकडे श्यामकांतही हळूहळू दुर्लक्ष करू लागला....

# सबला

### माधव शिरवळकर

## : तीन :

त्या रात्री सहानीने जबरदस्त बाजी मारली. ही गोष्ट गोळेनंही कबूल केली. त्याला कबूल करावी लागली. श्यामकांताच्या घरून संतोष आगरवालच्या गाडीतून ते निघाले ते तडक सपना क्लबमध्येच गेले. तेथे आपापल्या ठरलेल्या जागा पकडून त्यांचा तीन पत्त्यांचा डाव सुरु झाला. फटाफटा आपटत, पत्ते पिसत सहानी म्हणाला—

'गोळे, आज मैं जितेगा, तू मायनस होगा.'

गोळे म्हणाला. 'ये तो तू हरवक्त बोलते रहता है, इसमे कौनसी नयी बात है ?'

सहानी पत्ते टाकत म्हणाला, 'आज देख ले.'

रात्रभर खेळ चालत राहिला. जमिनीवरून हातात, हातातून पुन्हा कॅटमध्ये पत्ते फिरत राहिले. काही तरी फंदफितुरी व्हावी त्याप्रमाणे सहानी जिंकत राहिला. पहिल्यांदा गोळेला वाटलं की, सहानी काही तरी फसवेगिरी करीत असावा. पण त्याच्या सराईत डोळ्यातून ते सुटलं नसतं. त्याने आपली जागा बदलून पाहिली, कमी-अधिक प्रमाणात पत्ते काढून पाहिले, पत्ते तपासून पाहिले. पण छे, सहानी डावावर डाव जिंकत होता. नोटा हडप करीत होता. सकाळी गोळेने नेहमीपेक्षा लवकर डाव संपविला आणि तो निघाला. मनःस्थिती ठीक नव्हती. बरोबर सहानी होता. पण त्याने त्याच्याकडे लीफ्टही मागितली नाही आणि व्हिस्कीही मागितली नाही.

क्लबच्या जिन्यावरून उतरताना गोळे सहानीला म्हणाला, 'यार, खेलमें तो हार-जीत होती ही है, मगर ताज्जुब ये है, कि आज तू चॅलेंज दे कर जिता है. ये कैसे हुआ ?' सहानीने हा प्रश्न झटकला. त्याने फोन करून घरून कार मागवून घेतली आणि तिची वाट पाहत तो गप्प उभा राहिला. सहानीने आत्मविश्वास सांगून जुगार जिंकावा, ही गोष्ट गोळेला लागली. त्याने ह्या गोष्टीच्या रहस्यासाठी सहानीचा पिच्छा पुरविला. शेवटी आपलं गुपित सांगायला तो तयार झाला. पण त्याने दोन अटी मांडल्या, एक म्हणजे हे गुपित समजल्यानंतर गोळेनं कधीही सहानीशी जुगार खेळायचा नाही आणि हे गुपित इतर कोणालाही सांगायचं नाही.

गोळेच्या दृष्टीने अटी तशा जाचक होत्या. कारण पलशला सहानी हा चांगला बकरा होता. पण शेवटी गोळेनं विचार केला, सालं हे गुपित गुपित म्हणजे तरी काय आहे, ते एकदा समजून घेऊ, म्हणजे मनाचं समाधान होईल. गोळेनं दोन्ही अटी मान्य केल्या. सहानी पुन्हा पुन्हा गोळेला त्याच्या अटी समजावत राहिला. गोळे धडपडून पुन्हा पुन्हा 'मान्य आहेत. सिक्रेट काय ते सांग', म्हणून विचारु लागला.

शेवटी अत्यंत शांतपणे सहानीने खिशात हात घातला. ही शांत हालचाल पहाताच गोळे मोठ्याने ओरडला, 'दगाबाज, फ्रॉड करता है क्या ? निकाल क्या है जेब में? निकाल। खड्डे में गयी तेरी कंडिशन। निकाल क्या है ?' गोळेनं एका हाताने सहानीची कॉलर पकडली

होती आणि दुसऱ्या हाताने तो त्याच्या खिशातला हात बाहेर खेचत होता. ही गडबड ऐकून 'क्या हुआ, क्या हुआ' करीत क्लबवरची चार-दोन रिकामटेकडी गुंडमंडळी धावत आली. गोळे त्यांना ओरडून म्हणाला, 'ये मादरचोत डुप्लिकेट कार्ड जेब में रखकर आता है क्लबमे ! रातमे मैं सातसो मायनस हुआ, ये हो नही सकता।'

वातावरण गरम झालं. सहानी बावरला. गुंडांना पाहून थोडा घाबरला. गोळेला समजवण्याचा प्रयत्न करीत तो काही तरी बोलू लागला, पण गोळे ओरडला, 'पहिले, जेब दिखा तेरा, बाकी गया झम्नम में, गुंड सहानीच्या जवळ आले. गोळेनं सहानीच्या खिशात हात घातला. त्याने रात्री जिंकलेल्या नोटा एका खिशात होत्या. दुसऱ्यात मागच्या बाजूला पाकीट होतं. त्यात पत्ते नव्हते. तिसऱ्या खिशात एक बंद पुडी होती. त्याच खिशात सिक्रेट दाखवण्यासाठी सहानीने हात घातला होता. त्या पुडीकडे आणि सहानीकडे संशयाने पहात गोळेनं हळूहळू पुडी उघडायला सुरुवात केली. गुंडांचं औत्सुक्यही ताणलं जात होतं. पत्ते सापडले असते तर सहानीवर लाथा-बुक्क्यांचा पाऊस कोसळला असता. गोळेनं पुडी उघडली. आत चमचाभर अंगाऱ्याची राख होती. गोळे चपापला. सहानीकडे दुसरं काहीच सापडलं नाही. गोळेची मान खाली झाली. गुंड आल्यापावली 'फोकटका तमाशा साला,' म्हणून वैतागून निघून गेले. एवढं होऊनही सहानी शांतच होता. गोळे खाली मान घालून म्हणाला 'आय ॲम सॉरी, सहानी मैं गलत समझा।'

तेवढ्यात सहानीची कार समोर येऊन थांबली. सहानी म्हणाला 'अब इसके बाद फिर कभी मुह मत दिखाना तेरा। मैं डुप्लिकेट कार्ड नही, भगवान का परशाद जेब में रखकर खेला इसिलिये जिता समझे? मेरे बापजादोंने हमे फ्रॉड करना नहीं सिखाया।' सहानी धाडकन दार लावून कारमध्ये बसला. आणि निघून गेला. सपना क्लबखाली गोळे एकटाच उरला होता. त्याने टॅक्सी बोलावली तो तडक घराच्या दिशेने निघाला. आज पहिल्यांदाच तो एवढ्या मायनस मनाने घरी चालला होता. त्याचं मन म्हणत होतं,' उगाच सहानीच्या खिशावर ब्लाइंड खेळलास.'

□

श्यामकांत, कल्पना आणि नीलू तिघेही फिरायला निघाले होते. सूर्य अस्ताला जाण्याच्या तयारीत होता. दिवसभराचा उष्माही त्याच्याबरोबरच मावळत होता. तिघेही एका गजबजलेल्या बगिच्यात आले. जवळची घसरगुंडी पाहून नीलू खेळायला गेली. श्यामकांत आणि कल्पना तिच्याकडे लक्ष ठेवीत गप्पा मारू लागले. दिवस शनिवारचा होता. दुसऱ्या दिवशी श्यामकांतला सुट्टी होती. तो थोडासा मोकळ्या मूडमध्ये होता.

नीलूकडे पहात तो म्हणाला,

'नीलूला जाताना कपडे घ्यायचेत. थोडं लौकरच निघू या!'

'त्याला नाही वेळ लागायचा हो, आयताच घेऊ या चांगलासा फ्रॉक!' कल्पना म्हणाली.

'तिला तो पंजाबी ड्रेस पण हवाय ना?' श्यामकांतानं विचारलं.

'हो, तोही घेऊ या की, सध्या आहेत पैसे देवकृपेने. तिचे तरी लाड पुरवू या!' कल्पना म्हणाली.

'श्यामकांतानं इकडे तिकडे पहात थोडा विचार केला आणि मग विचारलं,' का ग कल्पना, तुझ्या अंगात येण्याचा तुला काही त्रास नाही होत, म्हणजे तुला कसं वाटतं अंगात आल्यानंतर?'

श्यामकांताच्या ह्या प्रश्नावर कल्पना किंचित हसली. मग श्यामकांताकडे थोडं अधिक रेलून म्हणाली, 'खरं सांगू, मला काहीच कळत नाही. आपण बराच वेळ झोपलो होतो, असं वाटतं. बडेआजी म्हणतात, त्या वेळेला माणसाला तसं काही अस्तित्वच नसतं.!'


श्यामकांत पुन्हा गप्प राहिला. विचार करू लागला. कल्पना म्हणाली 'पण, तुम्हाला काय वाटतं माझ्या अंगात येण्याबद्दल?'

'काय वाटणार?' त्याने प्रश्न उलटा केला.

'म्हणजे चांगलं वाटतं, की वाईट?' तिनं प्रश्न स्पष्ट केला.

'वाटण्या न वाटण्याने काय होणार? तुझ्या-माझ्या हातात काही आहे का?' श्यामकांत म्हणाला,

'तसं नाही हो, ही तुम्हाला दैवी देणगी नाही वाटत? नाही म्हटलं तरी माझ्या अंगात यायला लागल्यापासून आपली ओढाताण



किती कमी झालीय. लक्ष्मीनेच जणू काही आपली प्रार्थना ऐकली!'

'पण कल्पना, तुझं ते प्रसादाची पातळं, नारळ विकणं म्हणजे लोकांना 'अंगात येण्यावर पण हे लोक धंदा करतात,' असं वाटतं. लोक बोलतात बाहेर.'

'लोक बोलतात. माहितेय मला. तशा सातोस्करकाकू नाही विकत? शिवाय लोकांचं बोलायला काय जातं? कुणी पदरचे पाच रुपये नाही काढून द्यायचे कशाला. मी पर्वा नाही करत लोकांची! त्यांना काय, मी सबंध चाळीला नारळ वाटून टाकले तर हवेच आहेत. कुणाचं चांगलं बघवायचं नाही लोकांना!' कल्पना रागाने किंचित जास्तच गुलाबी झाली.

श्यामकांत ह्यावर मनातल्या मनात म्हणाला, 'कधी कधी माझं डोकंच बधीर होऊन जातं, ह्या साऱ्याचा विचार केला म्हणजे'

गोळेला आश्चर्य वाटतं होतं ते सहानीच्या खिशातल्या त्या अंगाऱ्याच्या पुडीबद्दल. शुक्रवारी तो आगरवालबरोबर कल्पनाकडे आला होता. आगरवालची आणि त्याची चांगली जानपछान होती. आगरवाल कल्पनाचा भक्त होता, हे सगळं ठीक होतं; पण नवलाची गोष्ट म्हणजे सहानीसारखा अट्टल जुगारी कल्पनाकडे आला कसा? आला तर आला; तो तिच्याकडून अंगाऱ्याची पुडी घेतो काय आणि रात्रभर फ्लॅशमध्ये जिंकतो काय, सगळंच अघटित होतं! सहानी इतका आस्तिक असेल असं गोळेला कधीही वाटलं नव्हतं. गोळेनं सहानीला ओळखण्यात चूक केली होती आणि सहानी कायमचा गमावला होता!

गोळेच्या डोक्यात सहानी गमावल्याचा पश्चात्ताप फार काळ राहिला नाही. त्याला आणखी एक कोडं सुटत नव्हतं आणि ते म्हणजे, कल्पनाच्या अंगाऱ्यात खरोखरीच इतकी ताकद असेल काय की, रात्रभर तो जुगार जिंकून देईल? गोळेला उत्तर सापडत नव्हतं. पण समोर सहानीचा धडधडीत पुरावा होता! सहानीनं ती रात्र अक्षरशः पादाक्रांत केली होती. ह्या कोड्यावरच गोळे फार फार विचार करीत राहिला. शेवटी पिंजलेल्या डोक्याने वैतागून गेला. आणि स्वत:शीच म्हणाला, 'सालं एकदा प्रयोग केलाच पाहिजे.'

ठरवल्याप्रमाणे गोळे स्वतःहून एका शुक्रवारी श्यामकांताकडे गेला. श्यामकांत घरी नव्हता. संध्याकाळची वेळ नेहमीप्रमाणे गजबजलेली होती. गोळे तडक आत गेला. घाईघाईने त्याने कल्पनाला वाकून नमस्कार केला. नंतर अत्यंत नम्रपणाने म्हणाला, 'देवी, मला प्रसाद द्या. मला यश हवंय.' कल्पनाने त्या वेळी त्याच्या हातात जवळच्या तबकातील चमचाभर अक्षता दिल्या. आणि 'जा' अशा आविर्भावाने हाताची हालचाल केली. गोळे गोंधळला आणि श्यामकांताच्या टेबलावरचं जुनं वर्तमानपत्र टरकावून त्या कागदात पुडी करून त्याने अक्षदा खिशात ठेवल्या. एवढं झाल्यानंतर गोळे जायला म्हणून निघाला आणि त्याने चार पावलं टाकलीसुद्धा! पण तेवढ्यात त्याला सहानीच्या अंगाऱ्याची आठवण झाली. तो पुन्हा आत गेला. आत मदतीला उभ्या असलेल्या एका म्हातारीकडून त्याने चमचाभर अंगारा घेतला. त्याची पुडी केली आणि ह्या एकंदर दोन पुड्या घेऊन गोळे चाळीचा जिना धवाधव उतरून खाली आला. समोरच्या टॅक्सीला एंगेज करून तो ताज क्लबच्या दिशेने निघाला. तो मुद्दामच ताज क्लबकडे निघाला, कारण तिकडे सहानी त्याला भेटला नसता.

एकंदरीत गोळे येऊन, पाया पडून, प्रसाद आणि अंगारा घेऊन गेला. याचा पत्ता देसाई कुटुंबात अन्य कोणालाही लागला नाही!

□

त्या दिवशी गोळेनं पोस्टात फोन केल्याचं पाहून श्यामकांताला आश्चर्य वाटलं. काही सांगायचं असेल तेव्हा गोळे स्वतः घरी येऊन भेटत असे आज प्रथमच त्याचा फोन पोस्टात आलेला होता. गोळेचा फोनवरचा आवाज श्यामकांत प्रथमच ऐकत होता. गोळेमध्ये काही तरी क्रांतिकारक बदल होतोय, हेच त्या आवाजातून जाणवत होतं. प्रथम गोळेनं फोन केला ह्या कारणासाठी श्यामकांताला आश्चर्य वाटलं आणि दुसरं आश्चर्य होतं ते नेहमी तोंडावर 'रोख भाव ठोक', बोलणारा गोळे आज कोड्यात बोलत होता. साफ-साफ काही सांगत नव्हता.

त्या दिवशी श्यामकांताने फोन घेतला.

'हॅलो!'

'मिस्टर देसाई प्लीज!' पलीकडून नम्र आवाज आला.

'स्पीकिंग.'

'अरे काय, आवाज ओळखला नाही काय?' गोळे पलीकडून ओरडला.

'आवाज?...नाही ब्वॉ...' श्यामकांत गोंधळला.

'गोळे बोलतोय. काय हे साहेबा, साधा आवाज ओळखत नाही?'

'फोनवर आपली पहिल्यांदाच ओळख होतेय नं, म्हणून.' श्यामकांत म्हणाला, 'बोल, आज काय विशेष की पोस्टात फोन केलास?'

'तसंच खास घडलंय म्हणून.' गोळे सावकाशपणे म्हणाला.

'म्हणजे? मी नाही समजलो.' श्यामकांत विचारात पडला.

'आज संध्याकाळी ये ऑफिस सुटल्यावर घरी!'

'अरे, पण खास काही तरी घडलंय म्हणालास ते काय सांगशील का नाही?'

'ते सांगता नाही येणार. प्रत्यक्ष दाखवावंच लागेल!'

'काय ते सांग नं साफ. उगाच आडवळणं. —'

'आडवळणं नाही. एक जबरदस्त वस्तू आणलीय घरात, तू चाट पडशील पाहून!'

'वस्तू?'

'तू असं कर नं. ये संध्याकाळी, फोनवर बोलण्यापेक्षा प्रत्यक्षच बोलू. आज बरंच महत्त्वाचं बोलायचंय तुझ्याशी. वाट बघतो मी! ओ के?'

'ठीक आहे,' पण — श्यामकांतचं बोलणं चालू असतानाच गोळेनं टेलिफोन बंद केला. संभाषण तिथंच तुटलं. गोळेनं अशी कोणती वस्तू आणली असेल की त्यानं खास फोन करून बोलवावं? श्यामकांताला कोडं पडलं. सर्व अद्ययावत यंत्रांनी त्याची डबलरूम सज्ज होती. आता आणखी नवी वस्तू कोणती? श्यामकांतानं डोकं खाजवलं. ते कोडं डोक्यातून काढून टाकून तो पोस्टाच्या कामाला लागला. त्याच्या डोक्यात घरघरू लागलं तो थेट गोळेकडे जाण्यासाठी निघाला!

□

गोळेमध्ये घडलेला अफाट बदल पाहून श्यामकांताचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. त्याच्या आश्चर्याला पारावार उरलेला

नव्हता. तेहतीस वर्षांच्या आयुष्यानंतरही माणसं इतकी बदलू शकतात ? श्यामकात हा प्रश्न स्वत:ला विचारत होता. गोळेसारखा अनिर्बंध जगणारा माणूस इतका बदलू शकतो ? गोळेच्या एकदर वागण्या-बोलण्यानं श्यामकांताला वारंवार धक्के बसत होते. गोळे आपल्या घरात कधी देव-देव्हाऱ्याची स्थापना करेल, हा विचारच श्यामकांतानं कधी केला नव्हता.

पण ते घडलं होतं. शिसवी लाकडाचा चागला औरस-चौरस आणि काळ्या रंगाचा प्रशस्त देव्हारा त्या दिवशी सकाळीच गोळेनं आपल्या घरात बसवून घेतलेला होता. लगोलग त्याच्यात देवांची स्थापना करून तऱ्हतऱ्हेच्या फुलांनी तो देव्हारा त्यानं सुशोभित करून टाकलेला होता. देव्हाऱ्याच्या बाहेर चार-दोन देव-देवतांचे फोटोही भिंतीला अडकवले होते. स्वत: चंदन उगाळून दुपारी गोळेनं त्यांची मनोभावे पूजा केलेली होती. गोळेमधला हा एकंदर बदल पाहून सुंदरलालशेठही म्हणाला, 'गोळे सुधरला !'

'गोळे, हे एकदम कसं काय घडलं ?' श्यामकांतानं अधीर होऊन विचारलं.

'एकदम नाही दोस्ता. मोठ्या प्रक्रियेनंतर घडलं सगळं. फक्त त्या प्रक्रियेचा कालपर्यंत मला पत्ता नव्हता !' नेहमीचा दिलखुलास गोळे गंभीरपणे बोलत होता.

'मला काही कळत नाही तुझं बोलणं. काय ते स्पष्ट बोल !' श्यामकाताला अजूनही काही उमजलेलं नव्हतं. गोळे सागू लागला.

'तारा गल्यापासून श्यामकांत, स्वास्थ्यच हरवलं होतं. ऑफिसात जाऊन खुर्चीत बसलो की समोर फायली नको वाटायच्या. घरी येऊन बसलो की ऑफिसच्या पेंडिंग कामाची काळजी वाटायची. आयुष्यात आपण असेच पोखरले जाणार आणि एक दिवस किडा-मुंगीसारखे कुठे तरी चिरडून जाणार, असं वाटत रहायचं. चित्र-विचित्र स्वप्न पडायची. पहाटेपर्यंत झोप यायची नाही. नंतर झोप लागली म्हणजे डोळ्यांसमोर प्रेतं दिसायची. किती तरी दिवस असं चाललं होतं.'

'मग ?' श्यामकात लक्षपूर्वक ऐकत होता.

'केळकरशास्त्र्यांनी उपाय सुचवला. विश्वास नव्हता माझा; पण करून पाहू हाही प्रयोग, असं मनाशी म्हणून गेलो. केळकरशास्त्री म्हणाले, मनालाही एक आकार असतो. मनाचाही एक जीव असतो. त्याचेही रोग असतात. त्यालाही अशक्तपणा येतो. त्यासाठी उपाय करावे लागतात ते मनावर. पोटात औषध घेऊन उपाय होऊ शकतो, पण शरीरावर; मनावर नाही. श्यामकांत, मला त्याचं म्हणणं पटलं. मला त्यांनी चित्त-संवर्धन मंत्र दिला. त्याचा पंधरा दिवस जप करायला सांगितला आणि सागायची गोष्ट म्हणजे, आय ॲम ओके नौ ! तेव्हापासून केळकरशास्त्री आपले गुरु झाले. त्यांनीच सागितलं, घरात कुलदेवतेची स्थापना कर. लगेच तातडीने हा देव्हारा बसवून घेतला !' गोळेनं सहजपणे सगळं सांगून टाकलं. श्यामकांत भावावल्यासारखा झाला. गोळेला त्या केळकरशास्त्र्याकडे नेलं कोणी ? हा प्रश्नही श्यामकातानं त्याला विचारला नाही. झाला बदल मात्र त्याला क्रांतिकारक वाटला; पण त्यावर नेमकी काय प्रतिक्रिया व्यक्त करावी, हे त्याला कळेना.

गोळेचा काळ्या रंगाचा शिसवी देव्हारा डोक्यात नाचवत श्यामकांत त्या दिवशी घरी पोहोचला. रात्री जेवताना ही एकूण हकीकत त्याने कल्पनाला सागितली. त्यावर कल्पनानं शिताफीनं विषय बदलल्याचं त्याच्या ध्यानात आलं नाही.

¤

गोळे नास्तिक असताना किती टोकाला जात होता हे त्याच्या बहुतेक परिचितांना माहीत होतं; परंतु गोळे आस्तिक झाल्यावरही तसाच किती टोकाला जाऊ शकतो, ह्याचं प्रत्यंतर श्यामकांताला आलं. घरात देव्हाऱ्याची स्थापना झाल्यानंतर फुलपुडीवाला रोज हारफुलाची चांगली जाडजूड पुडी गोळेच्या घरात टाकत होता; परंतु गोळेनं त्यापुढचीही पायरी गाठली होती. दर शुक्रवारी संध्याकाळी न चुकता तो श्यामकांताच्या घरी जायचा आणि अंगात आलेल्या कल्पनाच्या पायाला स्पर्श करून अंगाऱ्याची पुडी आठवणीनं मागून घ्यायचा. शुक्रवारी अशा तऱ्हेनं त्याला महालक्ष्मीचं दर्शन घेतल्याचा आनंद मिळे; पण सातोस्करकाकूंच्या वाड्यावर जाऊन तेथे मुक्तेश्वरीदेवीचं दर्शन घ्यायलाही तो चुकत नसे. गोळेनं आस्तिक झाल्यावर एवढ्या टोकाला जावं, हे शामकांताच्या मनाला पटत नव्हतं; पण प्रत्येक गोष्टीतला गोळेचा आत्यंतिक नादिष्टपणा त्याला माहीत होता. तो गोळेचा स्वभावच होता.

¤

त्या शुक्रवारी श्यामकांताची आणि गोळेची अशीच घरी भेट झाली. गोळे दर्शन घेऊन बाहेर आला. शामकांत नुकताच पोस्टातून घरी आलेला होता. भक्तगणाची ये-जा चालू होती. आतला धुपाचा वास आणि धुपटपणा बाहेरच्या खोलीतही जाणवत होता. कपाळाला अंगारा लावून भक्तिभावानं बाहेर आलेला गोळे पाहून श्यामकाताला हसावंसं वाटलं. मग गोळेनंच विषय काढला-

'आत्ता येतोयस की काय पोस्टातून ?'

'मुद्दामच उशीर करतो असा दर शुक्रवारी. गर्दीत आणखी आपली गर्दी नको !' श्यामकात चिडचिडला होता.

'अरे, सुदैवी आहेस तू ! दर शुक्रवारी लक्ष्मीचा वास आहे तुझ्या घरात !' गोळे मनःपूर्वक म्हणाला. श्यामकातानं नुसती मान उडवली. मग थोडा वेळ अशांत गेला.

'घराला रंग लावून घे बाबा एकदा. आतल्या खोलीत नुसता तेलकटपणा पसरलाय्. ती जागा कशी प्रसन्न पाहिजे !' गोळे सूचना करीत म्हणाला.

'आत तेलकटपणा आणि बाहेरच्या खोलीत भिंतीवर नीलूची चित्रकला, ह्यामुळं घराची तर आर्ट-गॅलरीच होऊन गेलीय. लाज वाटते कधीकधी !' श्यामकांत खरोखरीच चिडचिडला होता.

'हे बघ, असं कर. मस्त रग लावून घे. माझ्या माहितीचा एक चागला कॉंट्रॅक्टर आहे. त्याला पाठवतो तुझ्याकडे-'

'ते सर्व ठीक आहे रे. हे आत काय चाललंय पाहतोयस नं. त्यातून

## हे बघ, असं कर. मस्त रंग लावून घे घराला....

सुटका होईल तेव्हा मग रंग बिंग !'

'तू असं का करीत नाहीस ?' गोळे आठवल्यासारखं करून म्हणाला.

'काय ?' श्यामकातानं गोळेच्या चेहेऱ्याकडे पाहिलं.

'मी जातोय ह्या शुक्रवारी गावाला. मामांचंही पत्र आलं होतं. माझी जागा रिकामी आहे. ह्या शुक्रवारी. वहिनी इथे बसण्याऐवजी माझ्या देव्हाऱ्याजवळ बसतील. दरम्यान आठएक दिवसात तू रंग-रंगोटी आटपून घे ! काय ?'

गोळे एकूण आस्तिक मनानंच बोलतोय, हे श्यामकांताच्या ध्यानात आलं. मनातल्या मनात तो हसला. गोळेला स्वतःच्या घरात लक्ष्मीचा वास झालेला आवडला असता किंवा मनातून त्याला तेच हवं होतं, हे श्यामकांताच्या लक्षात येत होतं. त्यानं गोळेची ती इच्छा पूर्ण करण्याचं ठरवलं. स्वतःच्या घराला रंगरंगोटी करायचं ठरवलं.

□

ठरल्याप्रमाणे गुरुवारी सकाळपासून श्यामकांताच्या जागेत रंग-रंगोटीचं काम सुरू झालं. गोळेच्या ओळखीमुळं कॉंट्रॅक्टर खूपच स्वस्तात पटला. गुरुवार सकाळपासून त्यानं आपले मजूर लावले आणि देसायांच्या बिऱ्हाडातलं सामान अस्ताव्यस्त होऊन गेलं. बाहेरच्या खोलीत मजूरमंडळी पॉलिशपेपरनं भिंती घासून गुळगुळीत करू लागली. श्यामकांतानं ह्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी चार दिवसाची रजा टाकली.

गोळेच्या जागेत जायला कल्पना मनातून नाखूष होती. चित्रपटगृहात घडलेल्या 'त्या' घटनेपासून कल्पनाला गोळेचं तोंड पहायची इच्छा नव्हती. त्याचं नाव डोळ्यासमोर नको होतं; पण श्यामकांताला समजावून सांगायचं कसं ? गोळेला तर तो उपकारकर्ता समजत होता, जिवलग मित्र म्हणून त्याला मान देत होता. एक आगळं व्यक्तिमत्त्व म्हणून त्याच्यातल्या गुणांची स्तुती करीत होता. कल्पनाला श्यामकाताचं मन मोडता आलं नाही. घराला रंग लावणंही आवश्यक होतं. कल्पना गोळेच्या घरात त्या शुक्रवारी जाण्यास तयार झाली, कारण गोळे त्या दिवशीच गावाला निघून जाणार होता. त्याच्या खोलीची एक चावी गोळेनं बुधवारीच श्यामकाताकडे देऊन ठेवलेली होती. शुक्रवारी त्याच्या घरात त्याच्या अनुपस्थितीत लक्ष्मीचा वास होणार होता !

आदल्या दिवशी, म्हणजे गुरुवारी संध्याकाळी पूजेचे सामान आणि इतर उपकरणी घेऊन बढेआजी खास टॅक्सीनं गोळेकडे गेल्या. त्याच्या नव्या कोऱ्या आणि भव्य देव्हाऱ्याकडे पाहून त्या आनंदून गेल्या. शुक्रवारची आवश्यक ती सर्व तयारी त्यांनी अगोदरच करून ठवली. ते त्यांचं एक आवडीचं काम होतं. त्यात माणसांवरची श्रद्धा किती होती आणि देवावरची किती होती, हे त्यांचं त्यांनाही सांगता आलं नसतं.

शुक्रवार उजाडला. उजाडण्यापूर्वीच कल्पनाला आणि बढेआजींना घेऊन श्यामकांत गोळेच्या जागेत गेला. मग पुन्हा स्वतःच्या बिऱ्हाडात येऊन रंगवाल्याची वाट पहात बसला. नेहमीसारखी कल्पना तेथे घुमू लागली. तिचं दर्शन घ्यायला सुदरलालशेठची शेठाणी आपली पैंजणं हलवत डुलत डुलत आली. सुंदरलालशेठ ढेरीवर बटणांचा कोट बाधून आला आणि दर्शन घेऊन गेला. त्या भागातील इतर काही मंडळी आली आणि देवी पाहून गेली. सुदरलालशेठनं दुपारी बढेआजी आणि कल्पना या दोघीनाही जेवायला वर बोलावलं आणि आपलं मारवाडी जेवण आस्थेनं जेवू घातलं.

संध्याकाळी काही भक्तमंडळी तेथे येऊन गेली. बऱ्याचजणांनी बदलेला पत्ता आडवाटेवर आहे, म्हणून त्या दिवशीचं दर्शन हुकवलं. काहीजणाना बदलेला पत्ता मिळालाच नाही! एकूण नेहमी होते तशी गर्दी गोळेच्या डबलरूममध्ये झाली नाही. रात्री साडेआठच्या सुमाराला कल्पना त्या काळधा देव्हाऱ्याच्याजवळ एकटीच बसून घुमत होती. बढेआजी सुदरलालशेटच्या फुलबागेतल्या कळधा बेताबेतानं खुडत होत्या. त्याच वेळी आपल्या घरी शामकांत स्वतःच्या घरात सामानाची इकडे तिकडे हलवाहलव करत होता. दोन तासांपूर्वीच रंगवाले मजूर हात धुऊन काम संपवून गेले होते. त्यानंतरची जुजबी सफाई आणि इतर कामं यात शामकांतानं लक्ष घातलं होतं.

ध्यानीमनी नसताना वाड्याचं गेट ढकलून गोळे आत आला. फुलझाडाच्या कळ्या खुडणाऱ्या बढेआजींचं तिकडे लक्ष गेलं आणि त्या चकित होऊन म्हणाल्या,

'हे काय, तुम्ही गावाला ना गेला होतात ?'

'छे हो, रद्द केलं आयत्या वेळेला ! रिझर्व्हेशन मिळालं नाही. उभं राहून कोण जाणार ? काल रात्री मित्राचं लग्न होतं, तिथंच थांबलो रात्रभर ! तिथंनच सकाळी ऑफिसला गेलो आणि आता आलो ऑफिसमधून !' गोळे म्हणाला.

'तुमची खोली मोकळी होईलच एवढ्यात. साधारण साडेनवाला जातं त्यांच्या अंगातलं हो !' बढेआजींनी माहिती पुरवली.

'आत बरेच लोक आहेत का ?' गोळेनं विचारलं.

'छे हो. एकट्याच आहेत आत. लोकांना मिळालं नाही तुमच घर. नाही तर हीऽ गर्दी लोटली नेहमीसारखी !' बढेआजी आपला सुरकुतला हात हलवत म्हणाल्या.

'बाय द वे बढेआजी, मी आता सातोस्करांकडे जाऊन दर्शन


# टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती

लेखिका : सुमती देवस्थळे

किंमत : ५५ रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

घेऊन आलो. तिकडे कोणी तरी शोधत होतं तुम्हाला. गर्दी म्हणालात तेव्हा आठवण झाली. मला वाटतं, सास्तोस्करकाकू काही तरी विचारत होत्या अगात आल्यावर तुमच्याबद्दल !' गोळेनं घड्याळाकडे नजर टाकत म्हटलं.

'माझ्याबद्दल ? मी जाऊन येऊ का हो तिकडे ?' बढेआजी अधीर झाल्या.

'पाहून या हवं तर...'

'पण इकडे तर त्या...'

मी आहेच इकडे, काही लागलं तर पहायला.' गोळे म्हणाला. बढेआजीचा चेहरा खुलला. खुडल्या कळ्या ओच्यात टाकून त्या परस्पर गेटबाहेर पडल्या. त्याना सातोस्करकाकूंच्या घरचे वेध लागले होते. त्या लगबगीनं बसस्टॉपवर जाऊन उभ्या राहिल्या. इकडे गोळेनं व्हरांडतल्या बाकावर बसून शांतपणे बूट काढले आणि हात-पाय धुऊन तो देव्हाऱ्यापाशी गेला. कल्पना शांतपणे घुमत बसली होती. तिच्या कपाळावरचं लालजर्द कुंकू तिच्या चेहऱ्यावर लक्ष्मीचं तेज वाढवत होतं. समोर मिणमिणणाऱ्या समयांच्या ज्योती ते तेज पाहून दिपल्यासारख्या तोंड लपवू पहात होत्या.

¤

घराला सुंदर निळा रंग देऊन झाल्यानंतर घरात बदल जाणवू लागला. वातावरण पूर्वीपेक्षा प्रसन्न झालं. इतर चाळकरी येऊन घर पाहून गेले. बढेआजींनी रंगाचं तोंड भरून कौतुक केलं. शामकांताला फार बरं वाटलं. चार दिवसांची रजा कारणी लागली, असं वाटलं. अजून गोळेनं येऊन रंग पाहिलेला नव्हता.

त्या दिवशी पोस्टातून त्यानं गोळेच्या ऑफिसला फोन केला; पण गोळे आजारीपणाच्या रजेवर आहे, असं त्याला कळलं. गोळे खरोखरीच आजारी आहे की, आणखी कशासाठी, त्यानं 'सिक लीव्ह'चा उपयोग केलाय, हे शामकांताला कळेना. त्या शुक्रवारी रात्री दहा वाजता तो स्वत: कल्पनाला टॅक्सीनं घरी सोडून गेला होता. तेव्हा ओझरतीच भेट झाली होती. तो घाईत असल्यासारखा वाटला. त्याची तब्येत कशी आहे, हे जाणून घ्यायला हवं होतं.

त्या संध्याकाळी शामकांताला आणखी एक धक्का बसला. गोळेच्या वागण्याला, आचाराला काही अधिष्ठान आहे की नाही हे कळत नव्हतं. त्याच्या वागण्यापुढं दुसऱ्याची तर्कबुद्धी चालत नव्हती. संध्याकाळी शामकांत मुद्दाम गोळेच्या घरी गेला. गोळे घरीच होता. दार उघडंच दिसत होतं. शामकांतानं आत डोकावलं. गोळे बाहेरच्या खोलीत नव्हता.

'गोळे, अरे घरात आहेस का ?' शामकांतानं बाहेरून हाक मारली.

'ऑ, अरे, ये, ये !' आतल्या खोलीतून गोळेनं आवाज दिला

'काय करतोयस आत बसून ?' शामकांत बोलत बोलत आत गेला आणि आतल्या गोळेला पाहून आश्चर्याने थक्क होऊन गेला ! त्याच्या थक्क होण्याला कारणही तसंच जबरदस्त होतं.

गोळेनं नवा डबलबेड खरेदी केला होता. त्यावरच्या मऊ मऊ गादयांवर पडून गोळे आरामशीरपणे काही तरी वाचत होता. नेहमी पातळ अंथरुणावर झोपणाऱ्या गोळेनं एकदम डबलबेड खरेदी करून पलंगाच्याही पुढची पायरी गाठावी, ह्यामुळंच शामकांत थक्क होऊन गेला होता. बराच वेळ त्यानं त्याच्याशी गप्पा छाटल्या आणि तो घरी परतण्यासाठी निघाला. जाता जाता शामकात गोळेला म्हणाला, 'एक एक धक्के असे देतोयस की, लवकरच तू लग्नाची पत्रिकाच हातात आणून देणार, असं वाटायला लागलय !' त्यावर गोळे नुसता खळखळून हसला. शेंगाचे दाणे हातात घेऊन टरफल उडवून द्यावं तसं ते हास्य होतं.

¤

नवरात्र तोंडावर येऊन ठेपलं होतं. नेहमीप्रमाणे नवनाथाच्या मठात गडबड सुरू झालेली होती. कार्यकर्ता मंडळी वर्गणी गोळा करण्यात गर्क होती. देणग्या गोळा होत होत्या. 'सालाबादप्रमाणे' ह्या शब्दाचा मान ठेऊन यंदाही महालक्ष्मीचा उत्सव साजरा होणार होता. नेमेप्रमाणे अष्टमीला महालक्ष्मीचा मुखवटा, सुवासिनींची दूर्वांच्या तातूची पूजा, अंगात येण्याचा, घागरी फुंकण्याचा कार्यक्रम हे एकूण वेळापत्रकही सालाबादप्रमाणेच होत. यंदाच्या कार्यक्रमात कल्पना हे अष्टमीचं सर्वांत मोठं आकर्षण होतं. त्या मानानं सातोस्करकाकूना आता तेवढी 'डिमांड' नव्हती.

होता होता प्रतिपदा लागली. मठात घटस्थापना झाली. महिषासुरमर्दिनीची आरती आणि भजनं सुरू झाली. म्हाताऱ्या, रिकामटेकड्या बायका मठात जमून गप्पा टप्पा करू लागल्या. दिवसामाजी आकाशात चंद्राचा आकार बदलू लागला. एक एक तिथी मागे पडू लागली. नवनाथाच्या मठात घाईगर्दी वाढत गेली. स्वयंसेवक मंडळीचा धावपळीने घाम गळू लागला.

नवरात्रातला सर्वांत महत्त्वाचा दिवस उजाडला. सप्तमी मागं सरली. अष्टमी दिमाखानं उगवली. सकाळपासून नवनाथाचा मठ लोकांच्या वर्दळीने गजबजू लागला.

¤

रात्रीचे साडेअकरा झाले होते. सातोस्करचं हृदय लाह्या फुटाव्यात तसं फुटत होतं. अंगाखांद्यातून घाम गळत होता. हाता-पायातून वीज निघून जावी तसे हातपाय थरथरत होते. सातोस्कर प्रचंड घाबरला होता. नवनाथाच्या मठातून चक्क पळत सुटला होता. रात्री साडेअकरा वाजता मठाबाहेरच्या डाबरी रस्त्यावर एखादीच तुरळक मोटार लाल दिवे वळवून निघून जात होती. सातोस्कर आपला लेंगा फडफडवत आणि पायातल्या रोठ चपला धणधपा वाजवत रस्त्यानं वेड्यासारखा पळत सुटला होता.

सातोस्करला टॅक्सीनं जाण्याचही भान उरलेलं नव्हतं. एखादं वाहन पकडून चटकन जावं, हेही आयत्या वेळेला त्याच्या डोक्यात आलं नाही. एखाद्या घाबरट मुलासारखा तो श्यामकांताच्या घराच्या दिशेने पळत सुटला होता.

घरात नीलू झोपली होती. श्यामकांतही थकून बिछान्यावर पडला होता. चाळीत आजूबाजूला अजून जाग होती. श्यामकांताच्या घरा-

---

**सकाळपासून नवनाथांचा मठ लोकांच्या वर्दळीने गजबजू लागला.**

---

तही अजून दिवा होता. रात्री बारा वाजता तो नवनाथांच्या मठात जाणार होता. तेव्हाच कल्पनाच्या अंगातलं जाणार होतं. मग घागर फुंकून दमछाक झालेल्या कल्पनाला घेऊन श्यामकांत घरी येणार होता. नवनाथाच्या मठात घुमणारी कल्पना डोळ्यांसमोर आणत आढ्याकडे पहात श्यामकांत शांतपणे बिछान्यावर पडला होता. डोळे तसेच उघडे होते.

सातोस्कर धापा टाकत जिना चढला. त्याला पाय उचलत नव्हते. घामानं त्याचे काळे-पांढरे केसही भिजून चिंब झाले होते. गालफडा-वरून घामाचे ओहोळ गळ्यापर्यंत आले होते. शर्टाचं वरचं बटण घाईगर्दीत सुटलेलं होतं सातोस्कर तशा स्थितीत श्यामकांतच्या बंद दाराशी पोचला आणि आपला हात कडीवर जोरात आपटून तो भात्यासारखा श्वासोच्छ्वास करु लागला. मग एकापाठोपाठ पुन्हा पुन्हा कडी वाजवत राहिला. त्याचा धीर सुटला होता. एक भयकर काम त्याला करायचं होतं.

दणादणा वाजणारी कडी ऐकून बिछान्यावर शांत पडलेला श्याम-कांत दाणकन उठला. सातोस्करचा वाजणारा श्वासही त्याला बंद दारातून स्पष्ट ऐकू आला आपला पट्ट्यापट्ट्याचा लेंगा झटकून आणि गंजिफ्रॉक सारखा करून त्यानं दार उघडलं.

श्यामकांताला समोर पहाताच सातोस्करचे पाय लटालटा कापू लागले. आता आपण पायरीतच कोसळणार, असं त्याला वाटू लागलं. त्याचा श्वास आणखी जोराने वाजू लागला.

'काय हो सातोस्कर ?' श्यामकांताने विचारलं. 'साहेब,' सातो-स्करला पुढे बोलवेना. त्याला रडू कोसळलं. डोळ्यातून चक्क पाणी वाहू लागलं. तो मुसमुसून रडू लागला.

'काय झालं ? अं ? श्यामकांताने सातोस्करच्या पाठीला आपल्या हाताचा आधार दिला.

'साहेब, कसं सांगू तुम्हाला मी ?'

'शांत व्हा. सातोस्कर, आत या बघू, पाणी हवयं का तुम्हाला ?'

'साहेब, त्या अर्जुन गोळ्याचा खून झाला हो,' एवढं बोलून सातो-स्कर श्यामकांताच्या पायाशीच कोसळला.

'काय ?'

'काय ?' श्यामकांताला भयंकर हादरा बसला होता. पुतळ्या-सारखा तो जागच्या जागी गोठून गेला. त्याचे बारीक हात व पाय मोठ्या जिकीरीनं ताकद सांभाळून उभे होते. सातोस्कर हुंदके आव-रून मोठ्या मुष्किलीनं उठला.

दोघेही एकमेकाना सावरत घटनास्थळी निघाले. एव्हाना चाळी-तही बरीच खळबळ उडाली होती. सातोस्करच्या कोसळण्यामागे एक अशी पार्श्वभूमी उभी होती की, ज्याची कल्पना श्यामकांताला गोळेच्या मृत्यूपेक्षाही भयानक वाटली असती.

(क्रमश.)


## अभ्यासकास उपयुक्त
## शेतकऱ्यास प्रेरक

"श्री. विजय परुळकर यांनी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहिराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्याबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्‌मयात भर टाकणारे आहे."

—प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

# योद्धा शेतकरी

**ले. : विजय परुळकर**

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : रुपये छत्तीस

नेत्याची व आंदोलनाची छायाचित्रे
पचरंगी मुखपृष्ठ

मराठी चित्रपटमहोत्सव

### सातासमुद्रापलीकडे मराठी चित्रपट । मराठी चित्रपट अटकेपार !

# गंगेत घोडं न्हालं !

अखेर मराठी चित्रणाच्या सुवर्णमहोत्सवाचा झेंडा अटकेपार फडकला. अर्थात ही कल्पना काढून, त्यासाठी आवश्यक ती धडपड करून ती रुजविण्याचं श्रेय जातं ते सुधीर फडके याना ! कारण गेले सहा महिने अविश्रांत कष्ट करणाऱ्या बाबूजीपुढे चित्रपट-महोत्सवाखेरीज दुसरा शब्दच नव्हता. वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, ह्यूस्टन, शिकागो, डेट्राइट आणि कॅनडा अशा आठ शहरात हा महोत्सव साजरा होणार आहे !

एकंदरीतच मराठी चित्रपटाचा सुवर्णमहोत्सव निरनिराळया कारणानी भलताच गाजला कोल्हापूरमध्ये या सुवर्णमहोत्सवप्रसंगाच्या गलथान कारभाराचे किस्से सगळ्यांनीच वाचले. सुवर्णमहोत्सवासारखा चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक महत्वाचा आणि मानाचा प्रसंग ! त्यामुळे या महोत्सवाची सारी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन चित्रपटमहामंडळाने या समारंभाच्या निमित्ताने विविध योजना, नवनवीन कल्पना वगैरेंची भरीव यादी वेळोवेळी जाहीर केली. त्यावरून महोत्सवाविषयीच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या; पण ऐनसुवर्णमहोत्सवात मात्र महोत्सवापेक्षाही परस्परातील हेवेदावे, गलिच्छ राजकारण, मान—अपमान याच गोष्टींचं प्रदर्शन अधिक घडलं. एकंदरीतच कार्यक्रमात जाणवणारी कमालीची अव्यवस्था, सुसंयोजन तर राहोच पण साधं सयोजनही नाही आणि काही कलावंतांनी हजर न राहून प्रदर्शित केलेली उदासीनता, तर या समारंभास कौतुकानं हजर असलेल्या कलावताविषयी अनास्था यामुळं या समारंभातील शानच निघून गेली.

त्या वेळेला त्याविषयी आरडाओरड झाली खरी; पण याच पार्श्वभूमीवर सुधीर फडके यानी चित्रपटमहोत्सव परदेशात साजरा करण्याची घोषणा केली. यामागचा हेतू खरोखरच कौतुक करण्याजोगा आहे अलीकडे परदेशांतील भारतीयाचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे आणि कितीही नाही म्हटलं तरी मराठी माणसाला अमराठी मुलखात गेल्यानंतर मग फारच 'कवतिक' वाटायला लागतं. त्यामुळं या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्तानं या लोकांनाही चांगले—वागले जुने—नवे मराठी सिनेमे एकत्रितपणे पाहायला मिळावेत हा यामागचा हेतू आहे. अर्थात परदेशांत चित्रपटमहोत्सव साजरे होणं ही गोष्ट नवीन नाही. कारण एक झाला की एक असे सतत कुठले न कुठले महोत्सव चालूच असतात; पण बहुतेक सगळया महोत्सवामध्ये मक्तेदारी असते ती, सत्यजित रे मृणाल सेन वगैरे बगाली बाबूच्या सिनेमाची. त्याखालोखाल मग वाव मिळतो तो आपल्याकडच्या आर्ट फिल्म-आर्ट फिल्म म्हणून उदोउदो झालेल्या शाम बेनेगल, सईद मिर्जा याच्या आर्ट फिल्मना ! यातून मराठी चित्रपटाना कुठे आणि कसा वाव मिळावा ? अर्थात चकवा लागल्यासारखं त्याच त्याच कथाविषयात घुटमळत राहणाऱ्या आपल्या मराठी सिनेमाला जागतिक चित्रपटमहोत्सवात चान्स मिळण्याची शक्यता कमीच हा वेगळा मुद्दा ! नाही म्हणायला 'सत तुकाराम' 'आक्रीत' सारखे चित्रपट जागतिक महोत्सवात चमकून आले. १९३७ साली संत तुकारामाची जगातील तीन उत्कृष्ट चित्रपटात गणना केली गेली होती, तर अमेरिकेत सर्वात् पहिल्यांदा चमकलेला मराठी बोलपट म्हणजे 'संत ज्ञानेश्वर' आणि 'कुंकू', 'माणूस' हे प्रभातचे गाजलेले चित्रपट तिकडच्या लोकानी खास मागवून घेतले होते. एवढच नाही तर त्या वेळचा श्रेष्ठ दिग्दर्शक फ्राक काप्रा यानं प्रभातचित्राची स्तुती करणारा एक लेखही सिनेमाटोग्राफमध्ये लिहिला होता; पण त्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत मराठी सिनेमानी परदेशाचं तोंडही पाहिल नाही ! त्यानंतर आता फक्त मराठी सिनेमाचा महोत्सव परदेशात साजरा करण्याचा मान मराठी सिनेमालाच पहिल्यांदा मिळत आहे. एका मराठी माणसानं पुढाकार घेऊन या महोत्सवाचा पाया घातला हे विशेष महत्त्वाचं आहे

या महोत्सवाचं निश्चित झाल्यानंतर त्याप्रमाणे सुधीर फडके यांनी तिकडच्या विविध संस्थांशी संपर्क साधून 'मराठी फिल्म फेस्टिव्हल कोऑर्डिनेशन समिती' स्थापन केली आणि महोत्सव जास्तीत जास्त व्यवस्थितपणे पार पडावा या दृष्टीने हालचालीही सुरू झाल्या. मध्यवर्ती किंवा राज्यसरकारने मदतीचा हात पुढे करणं तर राहोच; पण याबाबतीत फारशी उत्सुकताही दाखविली नाही; पण बँक ऑफ महाराष्ट्राने ५०,००० रु. ची देणगी देऊन आणि एन. एफ. डी. सी. ने युद्धपातळीवर काम करून चित्रपटाच्या प्रिंटस् तत्परतेनं काढून दिल्या. यानंतर खरा वाद निर्माण झाला तो चित्रपटाच्या निवडीवरून !

नॉन्टेज चित्रपटमहोत्सवात ३ कॉन्टिनेन्टस् अवॉर्डस मिळवणारा 'आक्रीत' चित्रपटमहोत्सवातून वगळल्याने कैक जणांची निराशा झाली. 'अंधश्रद्धेवर आधारित असलेल्या या चित्रपटामुळे परदेशातील भारताची प्रतिमा डागळण्याचा संभव आहे' असं सांगून माहिती आणि नभोवाणीमंत्री वसंत साठे यानी 'आक्रीत 'ला विरोध केला म्हणजे 'घाशीराम कोतवाल 'च्या वेळचा वाद परत एकदा उकरून काढला गेला; पण 'घाशीरामच ' काय झाल ? सगळ्याच्या नाकावर टिच्चून हे नाटक आपला परदेशदौरा यशस्वीपणे आटोपून परतलं. कुठे प्रतिमा—बितिमा डागळली ? आणि भारताची 'प्रतिमा' डागळण्याजोग्या इतर अनेक गोष्टी आहेतच की ! याच पार्श्वभूमीवर श्याम बेनेगल, पु. ल., श्रीराम लागू वगैरे १८ नामवत प्रभृतीनी 'आक्रीत 'चा समावेश न केल्याबद्दल निषेधाच्या तारा पाठवल्या ! तेव्हा साठे यानी 'हे माझं वैयक्तिक मत आहे व ते मी शासनावर लादू इच्छित नाही. तेव्हा शासन कोणताही निर्णय घेण्यास मुक्त आहे ' असं सांगून यातून अंग काढून घेतलं. त्यानतर बरेच दिवस उलट—सुलट चर्चांनी हे प्रकरण रंगल आणि शेवटी गंगेत घोडं न्हालं ! खरं—खोटं राम जाणं; पण असं म्हणतात की, सत्यजित रे यानी इंदिरा गाधीना फोन केला म्हणूनच 'आक्रीत 'चा समावेश झाला !

तसंच जब्बार पटेलाचे 'सिंहासन ' आणि 'उंबरठा ' असे एक सोडून दोन चित्रपट. तर ज्याच नाव घेतल्याशिवाय मराठी चित्र-

पटसृष्टीच्या इतिहासाला वजन प्राप्त होणार नाही, अशा भालजी पेंढारकरांच्या चित्रपटांची अनुपस्थिती–ही गोष्ट मराठी मनाला निश्चितच खटकणारी ! भालजीचे चित्रपट न जाऊ शकण्याला केवळ आर्थिक परिस्थितीच कारणीभूत आहे, हे उघड दिसत असूनही सरकारने स्वीकारलेली 'थंडी भूमिका' म्हणजे कळस झाला !

मराठी चित्रपटांचा महोत्सव असं याचं प्रातिनिधिक स्वरूप असतानाही दादा कोंडकेंनी फक्त स्वतःच्या सिनेमांचा वेगळा महोत्सव साजरा करण्याचा घाट घालावा हे पटत नाही.

ते काहीही असो. मार्गात येणाऱ्या अनेक अडचणीवर मात करत, त्याच्यातूनच मार्ग काढत आपली मंडळी एकदाची तिकडे पोचली! आता तिथं काय होतं ते बघायचं ! ¤

## खास बात

दिवसेंदिवस आपल्याकडच्या तरुण पिढीचा परदेशी नृत्याकडे वाढत जाणारा ओढा पाहिला की वाटतं, भारतीय नृत्याचं भविष्य काय ? जिथे पिकतं तिथे विकत नाही, अशातलाच हा प्रकार ! कारण आपण सध्या 'डिस्को दिवाने' झालो आहोत, तर परदेशी लोकाची भारतीय नृत्याबद्दलची आत्मीयता वाढायला लागली आहे. मारी ल्यूइस फिशा नावाच्या एका जर्मन तरुणीने इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्य भरतनाट्यम्‌चा कार्यक्रम सादर करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला इन्डॉलॉजीसारख्या विषयात म्युनिच युनिव्हर्सिटीची डॉक्टरेट मिळवणारी मारी भरतनाट्यम्‌बरोबर 'बॅले' या परदेशी नृत्यप्रकारातही अतिशय प्रवीण आहे. भरतनाट्यम्‌च शिक्षण तिने दिल्लीच्या नाना केसर आणि तामीळनाडूच्या के. जे. गोविंदराजन पिल्लई याच्याकडून घेतलं आहे. याशिवाय ती पेंटिंगही उत्तम करते.

अभिनय ही गोष्ट अलीकडे 'कलेची सेवा' वगैरे उच्च विचाराच्या भावनिक चौकटीतून केव्हाच बाजूला झाली. हल्ली बऱ्याच नटनट्यांचं उपजीविकेचं साधनच अभिनय झालं आहे. त्यामुळं हे कलावंत दिवसातून अक्षरशः तीन तीन शिफ्टस करून ढोरमेहनत करतात. पण यावर अखिल भारतीय चित्रपट निर्माता समितीने 'एका शिफ्टपेक्षा जास्त वेळ काम करणाऱ्या कलाकारावर बंदी घालण्याचा फतवा' काढून कलावंतांच्या व्यवसाय–पद्धतीवर गदा आणली आहे. असा नियम करण्याचं मुख्य कारण म्हणजे हावरटासारखे अनेक चित्रपट एकाच वेळेस साइन करून आयत्या वेळेस प्रचड घोळ करणाऱ्या नटामुळे लाखो रुपयाचं नुकसान निर्मात्याला सहन करावं लागतं. अर्थात यापूर्वी आर्टिस्टस असोसिएशननेही फक्त सहाच चित्रपट स्वीकारण्याचं बंधन घातलं होतं. काही दिवस या नियमाची अमलबजावणी योग्य प्रकारे होते आहे की नाही, हे अगदी डोळ्यात तेल घालून पाहिलं गेलं पण थोड्याच दिवसात 'ये रे माझ्या मागल्या' असा प्रकार सुरू झाला. निर्माता समितीने मात्र या नियमाची सर्व कलमं निश्चित केली असून १५ ऑगस्ट १९८२ पासून या नियमांची कडक अंमलबजावणी केली जाईल. म्हणजे दरम्यानच्या काळात कलावंतांना हाती असलेले चित्रपट पूर्ण करता येतील असं समितीचे अध्यक्ष श्रीराम बोहरा यानी सांगितलं. ¤

आपल्या 'दोस्ताना' या चित्रपटाच अनधिकृतपणे प्रक्षेपण केल्याचा आरोप या चित्रपटाचे निर्माते यश जोहर यानी दूरदर्शनमधील अधिकाऱ्याच्यावर केला, तर हा आरोप निखालस खोटा आणि निरर्थक असल्याचं दूरदर्शनवरील अधिकाऱ्याचं म्हणणं आहे. झालं काय की, इतर काही का विधायक कार्य होईना, पण नभोवाणीमंत्र्याना रंगीत दूरदर्शनाची कोण घाई झालेली आणि नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या एशियाडच्या निमित्ताने साठ्यानी ही इच्छा प्रत्यक्षात आणण्याचं ठरवलं. आता रंगीत दूरदर्शन येणार म्हटल्यानतर त्याच पहिल बाळतपण नीट उरकायला हवं, म्हणून दूरदर्शनवरून रंगीत फिल्म्स प्रक्षेपित करण्याचे प्रयोग केले जात आहेत. रंगाची गुणवत्ता, दूरदर्शनवर दिसणारे रंग वगैरे गोष्टींचं या प्रयोगातून बारीक निरीक्षण केलं जात आहे व त्यासाठी हिंदी सिनेमाचं प्रक्षेपण फक्त २–३ मिनिटांसाठी केलं जातं. अर्थात हे प्रक्षेपण 'डमी' अॅन्टेनावर होत असल्याने ते घरोघरच्या टी व्ही वर जाण्याचा प्रश्नच येत नाही अस दूरदर्शनच्या अधिकाऱ्यांचं मत ! टी. व्ही. तर्फे अशी कारणपरंपरा देण्यात येऊनही यश जोहर अडेलतट्टाप्रमाणे खटला भरण्याच्या आपल्या मताला चिकटून आहेत ! ¤

मध्यंतरी पूनम आणि रमेश तलवार यांचा विवाह होणार असल्याच्या बातम्यांचं पीक आलं होतं. त्यातही एका मासिकानं खास पापा ढिल्लन याची मुलाखत छापून खळबळ उडवली. कारण 'खानदानकी इज्जत मिट्टीमें मिलने नही दूंगा' या धर्तीवर पापा ढिल्लननी 'ती कशी काय रमेश तलवारशी लग्न करते ते बघतो' असे ठणकावन सांगितले अलीकडे त्या दोघांनी लग्न केल्याची बातमी सगळीकडे पसरली. यासंबंधी काही पत्रकारानी पूनमला छेडल तेव्हा मात्र ती पुरती वैतागली आणि म्हणाली, 'पहिल्यांदा प्रेमप्रकरण मग लग्न सारी तुमचीच करणी ! आता काही दिवसानी आम्ही घटस्फोट घेतल्याची बातमीही तुम्हीच सगळीकडे पसरवून टाका म्हणजे या सगळ्या लफड्यातून तरी माझी सुटका होईल !'

—शुभदा रानडे